।। श्रीशंकर ।।

# श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्र

## सानुवाद

## (जपव्रत, पूर्वाङ्ग आणि फलश्रुति यांसह)




संपादक

**अनंत दामोदर आठवले**



**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे.**

**प्रकाशक :**
अध्यक्ष,
**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान,**
‘प्रतीक’ ४०३/१, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
संपर्क : २४४९ २४९७/९९७५९ ६६१८१
Website : http:\\radhadamodar.org

© सर्वाधिकार सुरक्षित

**अकरावी आवृत्ती**
प्रकाशन काल :
वसंत पंचमी
माघ शु. ५ शके १९३८
( १ फेब्रुवारी २०१७ )

**मूल्य : ५० रुपये**

**मुद्रणस्थळ :**
बालोद्यान प्रेस,
१३५८ अ, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

**।। श्रीशंकर ।।**

# अकराव्या आवृत्तीच्या निमित्ताने

सानुवाद श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्र या ग्रंथाची अकरावी आवृत्ती प्रकाशित होत आहे याचा सार्थ अभिमान वाटतो. या अकराव्या आवृत्तीमुळे सानुवाद श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्र ग्रंथाची थोरवी, उपयुक्तता आणि जनमानसात या ग्रंथाचा असलेला आदर सिद्ध होत आहे; तसेच ब्रह्मीभूत स्वामी वरदानंद भारती यांची लोकप्रियताही दिसून येत आहे.

श्रद्धेने या स्तोत्राचे पठण करणाऱ्याचे इहलोकी वा परलोकी कधीही काहीच अशुभ होत नाही हे प्रत्यक्ष भगवंताचेच वचन आहे. एवढेच नव्हे तर या स्तोत्र पठणाचा अधिकार चारही वर्णांना असून पठण करणारा ब्राह्मण तत्त्ववेत्ता होईल, क्षत्रिय सर्वत्र विजयी होईल, वैश्याला धनसमृद्धी लाभेल आणि शूद्राला सर्व प्रकारचे सुख लाभेल. स्तोत्र पाठ करणारा पूर्णपणे निर्भय होईल.

अशा या ग्रंथाची काही वैशिष्ट्ये आहेत ती अशी -

१) पू. प्राचार्य आठवले (स्वामी वरदानंद भारती) यांची मौलिक प्रस्तावना. व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत सर्वांचे हित साधून देणारे स्तोत्र - हा त्यांचा मुख्य विचार. त्यांनी भगवान विष्णूच्या काही नावांची - शब्द संहतींची - जी स्पष्टीकरणे प्रारंभीच दिली आहेत ती अभ्यासाच्या दृष्टीने मार्मिक आहेत. स्वतः त्यांनी संन्यासोत्तर संजीवन समाधी घेईपर्यंत या स्तोत्राचीच साधना केली. माझे त्याने पदोपदी रक्षण केले असे त्यांनी म्हटले आहे.

२) १००० नावांचा सामान्य माणसाला कळेल असा अर्थ व स्पष्टीकरण केलेले आहे.

३) मूळ संस्कृत फलश्रुतीसह तिचा अर्थ सोप्या भाषेत मांडला आहे. सामान्य माणसांना त्यामुळे स्तोत्राचे महत्त्व जाणवते.

४) विष्णुसहस्रनामाबरोबरच विष्णूच्या २८ नावांचेही काही महत्व आहे त्यामुळे येथे ते अठ्ठावीस नावांचे स्तोत्रही दिले आहे. अगदी कमी वेळ उपलब्ध असेल तेव्हा ते छोटे स्तोत्र म्हणता येते.

५) ग्रंथाच्या शेवटी संस्कृतातील मूळ नावे वर्णानुक्रमाने दिलेली आहेत. त्याचा फायदा असा होतो की कोणतेही नाव चटकन् शोधता येते. अर्थ समजणेही त्यामुळे सुकर होते.

६) जेव्हां या स्तोत्राचे अनुष्ठान करायचे असते (विशिष्ठ वेळात विशिष्ठ पाठसंख्या) त्यावेळी त्यातील नावांच्या अर्थाने आपल्या शरीरातील अवयवांत त्या त्या देवतेची स्थापना करायची असते. म्हणून तसे आवश्यक अंगन्यास व करन्यास दिलेले आहेत. अर्थ स्पष्ट करताना त्यांच्या कृतीही दिल्या आहेत. हे सर्व म्हणजेच **रुद्रशाप विमोचन विधी** त्याचेही सुंदर स्पष्टीकरण दिलेले आहे. धर्मराज युधिष्ठिर, भीष्म, वेदव्यास व त्यांचे शिष्य वैशंपायन अशा सर्वांनी केलेला हा संवाद असल्याने त्याचे स्वरूप अलौकिक आहे.

परसवर्णानुसार ग्रंथातील सर्व नामांची रचना झाल्यामुळे उच्चारण-सुलभता लाभली आहे. हे कार्य पुण्याच्या वैय्याकरणी आणि भांडारकर प्राच्य-विद्या-संशोधन मंदिराचे जुने अधीक्षक असलेल्या कै. विद्यावाचस्पती ग. बा. पळसुले यांचे. आज ते आपल्यात नाहीत म्हणूनही हा उल्लेख आवश्यक वाटतो. प्रतिष्ठान त्यांचे कृतज्ञ आहे. बालोद्यान प्रेसचे श्री. उत्तमराव सहस्रबुद्धे व त्यांचे कर्मचारी या सर्वांचे प्रतिष्ठान आभारी आहे.

अशा मौलिक प्रकाशनाचा भाविकांनी अवश्य लाभ घ्यावा व आत्मिक समाधान प्राप्त करून घ्यावे अशी नम्र प्रार्थना.

**अध्यक्ष**

**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान**

**।। श्रीशंकर ।।**

# प्रथमावृत्तीचे प्रकाशकीय

आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गांत साधकाने जे जे व ज्या ज्या तऱ्हेचे प्रयत्न अत्यंत सातत्याने करावेत असे अधिकारी-मंडळी सांगतात, त्या साधनात श्रीविष्णुसहस्रनामांच्या पाठांचे महत्त्व फार गौरविले गेले आहे. श्रीसंत सद्गुरु दासगणूमहाराज आणि प.पू. ती. आप्पा (श्री. अनंतराव आठवले) या उभयतांनी आणि इतर अनेक संतांनी या विष्णूसहस्रनाम पाठांची अखंड पारायणे चालू ठेवून, खरोखरीच एक अत्यंत सोपा आणि आदर्श असा मार्ग सर्वांना दाखवून दिला आहे. एरव्ही,

**वाणीस शोभें कवित्व । कवित्वा खुलवी रसिकत्व ।**
**रसिकत्वाचें वाढे महत्त्व । परतत्वाच्या स्पर्शे जसें ।।,**

(अनु. ज्ञानें. १८-४००)

हे घडून येतेचना !

सहस्रनामांचा हा छोटा ग्रंथ आज आपले हाती देण्यांत येत आहे. यांत जपव्रत, पूर्वांग आणि फलश्रुति यासह मूळ संहिता, विषयांचे आकलन व्हावे यासाठी प.पू. आप्पांनी लिहिलेली प्रस्तावना, नामावलींतील प्रत्येक नामोच्चाराचा अर्थ व त्यावर निर्देशिलेली संख्या, अर्थाविषयी वेगळ्या टिप्पण्या व शेवटी नामसूची, अशा तऱ्हेची मांडणी मुद्दाम केली असल्याने सामान्य अभ्यासकालाही, या ग्रंथाचा अभ्यास आणि पाठांतर करणे सहज सुलभ होईल असे वाटते. असो.

हा ग्रंथ अगदी अल्पशः कालावधीत आपले हाती मिळण्याचे संपूर्ण श्रेय सौ. विमलाताई काळे, चि. गार्गी देशपांडे यांच्या सक्रिय प्रोत्साहनास आणि आयुर्विद्या मुद्रणालयाचे चालक श्री. गुर्जर बंधू व त्यांच्या सहकाऱ्यांना आहे.

साधकांनी या अल्पसेवेचा योग्य तो लाभ घेऊन आम्हांस उपकृत करावे ही प्रार्थना.

आपले,

**विश्वस्त, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान**

# प्रस्तावना

अत्यंत प्रभावी आणि सामर्थ्यसंपन्न म्हणून प्रसिद्ध असलेल्या स्तोत्रांमधें श्रीविष्णुसहस्रनाम हे एक महत्त्वाचें स्तोत्र आहे. त्यांत भगवंताच्या एक सहस्र गुणवाचक नांवांचा उल्लेख आहे. पांचसहस्राहून अधिक वर्षे या परमपावन स्तोत्राने कोट्यवधि व्यक्तींचे कल्याण साधून दिलेले आहे. या विष्णुसहस्रनामाच्या श्रवण-पठण-चिंतनानें मनुष्य सर्व संकटांतून तरून जातो, आणि आपले मनोरथ सिद्धीस नेऊ शकतो. या स्तोत्रांतील शब्दाशब्दांतून अशुभ नाहींसे करणारी परममंगल अशी मंत्रशक्ती भरलेली आहे असा अनेक संतमहात्म्यांचा आणि प्रज्ञावंताचा अनुभव आहे. अर्थदृष्टीनेंही हे स्तोत्र नित्यनूतन असून मनुष्याला सर्व प्रकारे मार्गदर्शन करणारे आहे.

विष्णुसहस्रनाम या स्तोत्रातील अनेक नामें समानार्थक आणि पुनरुक्त वाटली तरी समानार्थक नांवांत अर्थछटांचा सूक्ष्म भेद असतो तर कांहीं पुनरुक्त नांवांत अर्थभेदच असतो. कांही पुनरुक्त नावें वर्णाच्या विशिष्ट क्रमानें मंत्रशक्ति वाढविण्यासाठीं स्वीकारलेली आहेत, असेंही समजता येते. यांतील नांवे ऐतिहासिक चरित्र सांगणारी, रूपाचे वा अवयवाचें सौंदर्य किंवा वैशिष्ट्य प्रगट करणारी, भगवंताची वत्सलता व्यक्त करणारी अशी आहेत. यांतील प्रत्येक नांव हे कोणातरी साक्षात्कारी महात्म्याला, द्रष्ट्या ऋषीला त्याच्या तपस्येच्या बळावर स्फुरलेले आहे; व ते श्रद्धा-भावाला अनुकूल ठरून अंत:करणाला आकर्षक वाटल्याने त्याने प्रचारांत आणलेले आहे. त्या त्या नामानें त्या त्या व्यक्तीचा सर्वतोपरी उद्धार साधून दिलेला आहे. भीष्माचार्यांनीं तीच नांवे धर्मराजास सांगितली. आणि भगवान् व्यास महर्षींनी ती संकलित करून, संपादित करून कल्याण-साधन म्हणून जगताच्या हातीं दिली.

ही नांवे एकेका गुणाचे वर्णन करणारी आहेत. ब्राह्मणादि चार वर्ण, ब्रह्मचर्यादि चारी आश्रम, धर्मादि चारी पुरुषार्थ आणि कर्मभक्तिज्ञानयोग असे चारी साधनामार्ग, हे जे वैयक्तिक आणि सामाजिक

जीवनाचे आधार, ज्यामुळें व्यक्ति, समाज, आणि राष्ट्र उन्नति-प्रगति-विकास साधून घेऊं शकते, त्यांना आवश्यक असणारे सर्व सद्‌गुण या विष्णुसहस्रनामाच्या स्वरूपांत साधकापुढे उघड केले गेले आहेत. या गुणवाचक अर्थावर लक्ष केंद्रित करून त्याचे चिंतन-मनन केले, ते गुण आपल्या जीवनामधें मुरतील, आचारांत प्रगट होतील असा जर प्रयत्न त्या त्या परिस्थितींत असलेल्या मानवानें यथाशक्ति यथामतीच पण प्रामाणिकपणें केला तर त्याचे कोटकल्याण झाल्याविना राहणार नाही इतके माहात्म्य या परमपावन स्तोत्राचे आहे.

आयुर्वेदाच्या चरकसंहितेसारख्या श्रेष्ठ प्राचीन ग्रंथाने विष्णुसहस्रनामाचे ठिकाणी ज्वरादि व्याधि दूर करण्याचे सामर्थ्य असल्याचे आवर्जून सांगितले आहे. आणि ते यथार्थ आहे असा अनेकांचा अनुभव आहे.

विष्णुसहस्रनामाचे बारा पाठ प्रतिदिनीं करणें हे अत्यंत प्रशस्त मानले जाते. पण इतका वेळ देणे ज्यांना खरोखरीच शक्य नाही, त्यांनी आठ-पाच-तीन निदान एक पाठ तरी प्रतिदिनीं करावाच. त्यामुळें त्याला शारीरिक मानसिक आणि ऐहिक लाभहि होत राहतील हे निश्चित. निष्काम मनानें शक्यतो शुद्ध होऊन व राहून भगवंताकडे लक्ष केंद्रित करून विष्णुसहस्रनामाचा पाठ करणें यासारखे मनाला शांतता, समाधान, प्रसन्नता देणारे दुसरे साधन खरोखरीच नाही. दिवसांकाठी एकादा-दुसरा पाठ तरी याप्रमाणें करावा.

केवळ यांत्रिकपणे इतर कांहीं उद्योगात असतानाहि विष्णुसहस्रनाम म्हणत राहणें हे लाभदायकच आहे. आदर्शपणें चांगले कांहीं करतां येत नसेल तर जेवढें करतां येते तेवढे तरी निरलसपणें करीत राहणें हेहि चांगलेच आहे. मन लागणें, मन रमणें, ते एकाग्र होणें, श्रद्धा दृढावणें, भाव प्रगट होणें या गोष्टी साधनमार्गांत फार शेवटीं शेवटीं प्राप्त होणाऱ्या आहेत. त्यासाठीं दीर्घकालाची तपस्या आवश्यक असते. साधनमार्गांत आरंभीच हे लाभण्याची शक्यताहि नसते. तेव्हां त्यासाठीं अडून राहू नये. मन चंचलपणा सोडीत नसले तरी अगदीं

यांत्रिकपणें केलेले विष्णुसहस्रनामाचें पठणही लाभदायकच होते. मन लागणाऱ्यापेक्षां न लागणाऱ्याला अनुभव येण्यासाठीं बराच काळ धीर धरावा लागतो इतकेंच.

आवश्यक आणि अनावश्यक अशा गोष्टींचें तारतम्य राखून अनावश्यक ते शरीराच्या-मनाच्या-बुद्धीच्या पातळीवरही जितकें काढतां टाळतां येईल तेवढें प्रयत्नपूर्वक टाळीत गेले म्हणजे नको ते ओझें हलकें होत गेल्यानें मनालाहि शांत प्रसन्न होण्याच्या दृष्टीनें अधिकाधिक वाव मिळतो, हे लक्षांत घेऊन वागावें. आणि मिळेल तेवढा अधिक वेळ या नामस्मरणासाठीं द्यावा.

परमेश्वर आणि त्याचे नांव एकरूपच आहेत. नाम आणि नामी यांत भेद नाही, असे स्वानुभवी संतमहात्म्यांनी वारंवार सांगितलेले आहे. म्हणून भाविकांनी तरी श्रद्धा ठेवून विश्वासाने ही नामजपाची साधना करीत राहावी.

''स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्'' आणि ''न हि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति'' हे जे भगवद्गीतेमधे भगवंतांनी दिलेले आश्वासन आहे त्यावर भरंवसा ठेवून चालावे.

साधनेमधें दुर्बलता हा मोठा अपराध मानण्याचें कारण नाही. कारण प्रकृति परिस्थिति प्रमाणे साधकाचे सामर्थ्य त्याचे शारीरिक, मानसिक वा बौद्धिक बल उणे-अधिक असू शकते. तो खरा दोष नाही. साधनेतील खरा अपराध आहे, आळस, अनादर आणि उपेक्षा. हे दोष ठेवूं नयेत आणि साधना करीत राहावे. फल निश्चित मिळेल असें संतांनी प्रतिज्ञापूर्वक सांगितलेले आहे. या सर्व वस्तुस्थितीमुळें विष्णुसहस्रनाम हे एक सर्वजनसुलभ सर्वोपयोगी असें उत्कृष्ट साधन आहे. कुलवंताच्या कुटुंबांत याचा एक तरी पाठ सामुदायिकपणें एकत्र बसून स्पष्ट शांत-गंभीर अशा स्वरांत नित्य व्हावा. उत्सव-महोत्सवांत वा धार्मिक कृत्यांत एकत्र येणाऱ्या सर्व भाविकांनी असा पाठ समुदायानें करावा. ते फार फार लाभदायक आहे. त्यामुळें सर्व प्रकारची अनुकूलता

निर्माण होऊन शांततेला, प्रसन्नतेला बाधक होणाऱ्या गोष्टी निश्चितपणें उणावत जातात.

विष्णुसहस्रनामाची रचना फार प्रासादिक आहे. त्यांतील श्लोक मन्द्र स्वरांत संथ गतीनें म्हणत राहिले तर शरीर–मनाला अननुभूत पण सुखावह अशा संवेदना आनंदित करीत राहतात. मनाला पीडणारे चिंता क्लेश उणावतात. नष्टहि होतात.

यांतील कांहीं शब्दसंहती मोठ्या लक्षणीय आहेत, फार बोधप्रद आहेत, उदाहरणार्थ कांहीं शब्दसंहतींकडे लक्ष वेधतो.

**विश्वं विष्णु :** – सर्व विश्वच विष्णुरूप आहे. नारायणोपनिषदानें

''यच्च किंचित् जगत् सर्वं दृश्यते श्रूयतेऽपि वा ।

अंतर्बहिश्च तत् सर्वं व्याप्य नारायण: स्थित:''

हा जो संदेश दिला आहे, याचा सर्व आशय या दोन शब्दांतच समाविष्ट झालेला आहे.

**भूतभव्यभवत्प्रभु :**– परमात्मा हा भूतभविष्यवर्तमानाचा स्वामी आहे. त्यामुळें कोणीही कसल्याहि प्रकारच्या कर्तृत्वाचा गर्व बाळगण्याचे कारण नाहीं, हे लक्षात येऊ शकते.

**भोजनं भोक्ता** – उपनिषदाने 'अन्नं अन्नाद:' असे म्हणले आहे. अन्नही तोच आणि अन्न खाणाराहि तोच. व्यवहारांत हे द्वैत भासले तरी परिणामांत त्यांची एकरूपता आहे. हे प्रत्येकाच्या अनुभवास येणारे तत्त्व लक्षांत घेतले की व्यवहारत: द्वैतांत राहूनहि परमार्थत: अद्वैत जाणण्याचा मार्ग मोकळा होतो. आणि आपले हित (स्वार्थ नव्हे) साधून घेता येते.

**महोत्साहो महाबल :** – ज्याचा उत्साह मोठा म्हणजे ज्याचे धैर्य टिकून राहते, जो आरंभशूर नाही, त्याचेच बळ मोठे ठरते.

**महाबुद्धिर्महावीर्य :** – ज्याची बुद्धि मोठी त्यालाच मोठे पराक्रम गाजविता येतात.

**अग्रणीर्ग्रामणी :** – नेता तोच जो सामान्यांतल्या सामान्यांत,

खेडुतांतल्या खेडुतांत मिळून मिसळून राहतो.

**श्रीमान्न्याय:** – हा श्रीमंत आहे पण याची श्रीमंती न्यायाने मिळविलेली आहे.

**नेता समीरण:** – हा चांगल्या प्रेरणा देणारा पुढारी आहे. (तो अनुयायांना वाटेल ती गुंडगिरी करण्यासाठी प्रवृत्त करीत नाही.)

**वसुदो वसु:** – याची श्रीमंती परोपकारासाठीं उपयोगी पडणारी आहे; हा दाता आहे, केवळ स्वार्थासाठी संपत्ति सांठविणारा नाही.

**सर्वलक्षणलक्षण्य:** – कोणतेहि लक्षण यालाच व्यक्त करते. ''तुका म्हणे जे जे बोला । ते ते साजे या विठ्ठला ।।''

**सर्वदर्शी विमुक्तात्मा** – याला सगळे कांही कळते म्हणून हा कुठेच गुंतत नाही.

**मनोहरो जितक्रोध:**– याने राग जिंकला असल्यामुळें हा सगळ्यांना हवाहवासा वाटतो.

**विशोक: शोकनाशन:** – स्वत: शोकरहित असल्यामुळे दुसऱ्याचा शोक सहजपणे नाहीसा करू शकतो.

**सद्गति: सत्कृति:** – चांगले परिणाम होतात, कारण कृत्येंच चांगली असतात.

**अमानी मानदो मान्य:** – स्वत:ला मानाची अपेक्षा नसून इतरांना मात्र मान देतो आणि म्हणूनच तो सर्वांना मान्य होतो.

**नियन्ता नियमो यम:** – हा सर्वांचे नियमन करूं शकतो. कारण तो स्वत:च यमनियमस्वरूप म्हणजे यमनियमांचे यथायोग्य पालन करणारा आहे.

**अक्षोभ्य: सर्वप्रहरणायुध:** – प्रहार करण्यासाठीं योग्य अशी सर्व प्रकारची आयुधें जवळ असूनही हा क्षुब्ध होणारा नाहीं, वृत्ती समतोल ठेवणारा आहे. विष्णुसहस्रनामाचा समारोप सर्वप्रहरणायुध: या नांवाने झाला आहे. ते फार महत्त्वाचे आहे हे लक्षांत घेतले पाहिजे.

विश्वाच्या परिपालनासाठी, न्यायाच्या संरक्षणासाठीं, व्यष्टिसमष्टीच्या कल्याणासाठी अपरिहार्य होईल तेव्हां नीचांना आणि दुष्टांना शासन करण्याकरितां शस्त्र धारण करावेंच लागते व त्याचा वापरहि करावाच लागतो. अहंकारी संतापातून व्यक्त झालेली ही कांही सूडबुद्धि नव्हे. म्हणून हा विश्वं विष्णुः अक्षोभ्य असला तरी सर्वप्रहरणायुधः आहे आणि सर्वशस्त्रभृतांवर आहे.

अशा बोधप्रद शब्दसंहति शोधल्या तर आणखीहि सांपडू शकतील. उदा. विद्वत्तमो वीतभयः, चतुरस्रो गभीरात्मा इत्यादि. त्यावर चिंतन करणे हे जीवनपथावर प्रदीपासारखें उपयोगी पडणारे आहे.

वामनः प्रांशुः, अणुर्बृहत्, कृशः स्थूलः, भयकृद् भयनाशनः, यज्ञान्तकृद् यज्ञगुह्य, अनिर्विण्णः सदामर्षी इत्यादि परस्परविरोधी वा विसंगत वाटणारी नांवे कधी भगवंताच्या व्यापकतेचे उद्‌बोधन करणारी असतात तर कधी परिस्थितिसापेक्ष अशा व्यष्टिसमष्टीधर्माची वैशिष्ट्ये व्यक्त करतात. येथील कांही नांवे जोडनांवेही आहेत. निधिरव्ययः, धातुरुत्तमः येथें दोन शब्द मिळून एक संयुक्त नाम बनलेले आहे. संशोधनाच्या दृष्टीने या नामांच्या संख्येचा पुनरुक्तीचा वा संयुक्तता विभक्ततेचा विचार करणे शक्य आहे पण मी ते करीत नाही. तो माझा अधिकारही नाही.

अंतरंग–बहिरंगदृष्टीनें विष्णुसहस्रनामाचा जों जों विचार करावा तों तों त्यातील महत्ता, दिव्यता आणि गंभीरता अधिकाधिक प्रत्ययास येते. मन कौतुकानें, आदरानें, सद्‌भावनेने उचंबळून येते. आणि बुद्धि परमात्म्याच्या अलौकिक अशा असीम तेजस्वितेनें स्तिमित होऊन विनम्र होते. होणारा हा लाभ असामान्य आहे.

असें हे भव्य दिव्य विष्णुसहस्रनाम श्रीशंकराचार्यांच्या भाष्याच्या आधारे यथामति विवरून मी जनसामान्यांच्या हाती देत आहे याचे मला अत्यंत समाधान वाटत आहे.

विनीत

**अ. दा. आठवले**

ॐ नमो भगवते श्रीवासुदेवाय



॥ श्रीशंकर ॥

ॐ श्री 卐

॥ श्री ॥

श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्रम्

॥ १ ॥

॥ अथ रुद्रशापविमोचनविधिः ॥

**॥ श्रीः ॥ ॐ अस्य श्रीविष्णोर्दिव्यसहस्रनाम्नां रुद्रशापविमोचनमन्त्रस्य महादेव ऋषिः । अनुष्टुप् छन्दः । श्रीरुद्रानुग्रहशक्तिर्देवता । सुरेशः शरणं शर्मेति बीजम् । अनन्तो हुतभुग्भोक्तेति शक्तिः। सुरेश्वरायेति कीलकम्। रुद्रशापविमोचने विनियोगः ॥**

॥ अथ करन्यासः ॥

**ॐ क्लीं ह्लां अङ्गुष्ठाभ्यां नमः। ॐ ह्लीं तर्जनीभ्यां नमः।ॐ ह्लूं मध्यमाभ्यां नमः।ॐ ह्लैं अनामिकाभ्यां नमः। ॐ ह्लौं कनिष्ठिकाभ्यां नमः। ॐ ह्लः करतलकरपृष्ठाभ्यां नमः ।इति करन्यासः ।**

।। अथ षडङ्गन्यासः ।।

ॐ क्लीं ह्लां हृदयाय नमः ।ॐ ह्लीं शिरसे स्वाहा ।
ॐ ह्लूं शिखायै वषट् । ॐ ह्लैं कवचाय हुं ।
ॐ ह्लौं नेत्रत्रयाय वौषट् । ॐ ह्लः अस्त्राय फट् ।
इति षडङ्गन्यासः ।।

।। अथ ध्यानम् ।।

तमालश्यामलतनुं पीतकौशेयवाससम् ।
स्वर्णमूर्तिमयं देवं ध्यायेन्नारायणं विभुम् ।।
ॐ क्लीं ह्लां ह्लीं ह्लूं ह्लैं ह्लौं ह्लः स्वाहा ।

।। इति मन्त्रं शतवारं दशवारं वा
जप्त्वा किंचिज्जलं क्षिप्त्वा प्रार्थयेत् ।।

अस्य श्रीविष्णोः सहस्रनामस्तवस्य रुद्रशापविमोचनं भवतु । इति संप्रार्थ्य सहस्रनामपठनं कुर्यात् ।।
विष्णोः सहस्रनाम्नां यो न कृत्वा शापमोचनम् ।
पठेच्छुभानि सर्वाणि स्युस्तस्य निष्फलानि तु ।।

इत्यगस्तिसंहितायां विष्णोः सहस्रनाम्नां
रुद्रशापविमोचनविधिः ।।

।। श्रीशंकर ।।

# ।। १ ।।

# अथ रुद्रशापविमोचन विधि

सर्वच महत्त्वाच्या सामर्थ्यपूर्ण मंत्रांना आपल्या परंपरेंत एकेक शाप असल्याचा उल्लेख आहे. सर्वपरिचित अशा गायत्रीसारख्या वैदिक मंत्रालाहि तो आहे. त्या त्या मंत्राच्या अलौकिक माहात्म्याचा तोल राखण्यासाठी आपल्या उज्वल परंपरेंत या प्रकारची धारणा स्वीकारली गेली असावी असें वाटते.

मंत्रांच्या उच्चारांनी सूक्ष्म स्पंद निर्माण होत असतात आणि त्यांचा परिणाम साधकाच्या शरीर-मन-बुद्धीवर होत असतो. सर्वांचेच हे शरीरादि भाव त्या स्पंदांचा प्रभाव सहजपणें सहन करण्याइतके सबल असतातच असें नाही. सूर्याचा प्रखर प्रकाश जसा डोळ्याला सहन होत नाही, तसेंच कांहींसे हे असते. त्या मंत्रप्रभावाला सौम्यता आणून त्यांचे सामर्थ्य कार्यक्षम होईल अशासाठी जो प्रयोग अनुष्ठानाकरितां उपदेशिलेला असतो, तोच शापविमोचनविधि या नांवानें रूढ झालेला असावा. तेव्हां भाविकांनी, श्रद्धावंतांनी आपापल्या धारणेप्रमाणें स्तोत्रपाठापूर्वी या विधीचा विनियोग करणें उपयुक्त ठरणारे आहे. विशेषत: नियतकालिक अनुष्ठान म्हणून विशिष्ट संख्येनें मंत्राचा जप केला जातो, त्यावेळी तरी या शापविमोचनविधीचा अवलंब करणें श्रेयस्कर ठरणारे आहे.

सामान्यत: प्रत्येक मंत्राला वा मंत्रमय स्तोत्रादि रचनेला ऋषि, छंद आणि देवता असतात. त्यांचा उल्लेख करूनच अनुष्ठानास आरंभ करावयाचा असतो. त्याप्रमाणेंच मंत्रांच्या सामर्थ्याला प्रगट करण्यासाठी सहाय्यभूत होणारे बीज, शक्ति आणि कीलक असे भाव असतात. मंत्राचा प्रभाव व्यक्त होण्यासाठीं असणारे कांही अडथळे त्यांच्या उच्चारानें दूर होतात. भाविकांनी त्याप्रमाणें श्रद्धा ठेवून त्यांचा उपयोग करावा.

शरीरशुद्धीसाठीं करन्यास आणि अंगन्यासहि सांगितलेले आहेत. त्या त्या शब्दसंहतीचा उच्चार करून त्या त्या अवयवाला स्पर्श करावा. न्यास म्हणजे ठेवणें. त्या त्या अवयवाच्या ठिकाणीं ते ते मंत्रमय शब्द ठेवले जातात आणि त्यामुळें तो तो अवयव पापरहित होऊन शुद्ध होतो. अशा रीतीनें सर्व शरीर मंत्राच्या सामर्थ्यधारणेसाठीं कार्यक्षम होते.

॥ २ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

मङ्गलम्

शुक्लाम्बरधरं विष्णुं शशिवर्णं चतुर्भुजम् ।
प्रसन्नवदनं ध्यायेत्सर्वविघ्नोपशान्तये ॥ १ ॥
नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ २ ॥
व्यासं वसिष्ठनप्तारं शक्तेः पौत्रमकल्मषम् ।
पराशरात्मजं वन्दे शुकतातं तपोनिधिम् ॥ ३ ॥
व्यासाय विष्णुरूपाय व्यासरूपाय विष्णवे ।
नमो वै ब्रह्मनिधये वासिष्ठाय नमो नमः ॥ ४ ॥
अचतुर्वदनो ब्रह्मा द्विबाहुरपरो हरिः ।
अभाललोचनः शंभुर्भगवान् बादरायणः ॥ ५ ॥
ज्ञानदेवसमर्थादिश्रेष्ठानामादिपूरुषम् ।
व्यासं कारुणिकं वन्दे तत्त्वज्ञानप्रभाकरम् ॥६ ॥
ब्रह्मसूत्रप्रणेतारं वेदव्यासं महामतिम् ।
गीतासंपादकं वन्दे तत्कृपालब्धये गुरुम् ॥ ७ ॥

॥ २ ॥

मङ्गलम्

१. स्वच्छ पांढरे वस्त्र धारण करणारा, चंद्राप्रमाणें आह्लाददायक कांति असलेला, चार हात असणारा, ज्याचे मुख प्रसन्न आहे, अशा भगवान

विष्णूचें सर्वप्रकारच्या विघ्नांच्या परिहारासाठीं ध्यान करावे.

२. नारायणस्वरूप असा श्रीकृष्ण, पुरुषश्रेष्ठ नररूप अर्जुन आणि देवी सरस्वती यांना नमस्कार करून नंतर ज्याचे नांव जय आहे, अशा महाभारतग्रंथाचें वा त्यांतील कांहीं विभागाचें उच्चारण करावे.

३. वसिष्ठाचे पणतू, शक्तीचे नातू, पराशराचे पुत्र, शुकाचार्यांचे पिता अशा निष्पाप, तपस्वी व्यासांना मी नमस्कार करतो.

४. व्यास विष्णुरूप आहेत वा विष्णु व्यासरूप आहेत. त्यांनी वेदाची व्यवस्था लावली. या वसिष्ठकुलोत्पन्न महर्षी व्यासांना माझा पुन:पुन: नमस्कार असो.

५. व्यासांना चार मुखे नसली तरी ते ब्रह्मदेवाच्या योग्यतेचे आहेत. त्यांना दोनच हात असले तरी ते जणूं दुसरे विष्णूच आहेत. त्यांच्या कपाळावर डोळा नसला तरी ज्ञानाच्या क्षेत्रांतील त्यांचा अधिकार भगवान् शंकरांसारखा आहे. व्यास बदरिकाश्रमांत रमलेले आहेत म्हणून त्यांना बादरायण असे म्हणतात.

६. श्रीज्ञानेश्वर, श्रीरामदास यांच्यासारख्या जगत्कल्याणासाठीं अवतरलेल्या श्रेष्ठ महात्म्यांची परंपरा ज्यांच्या पासून आरंभली, जे तत्त्वज्ञानाचे जणू सूर्य आहेत त्या कनवाळू व्यासांना नमस्कार असो.

७. (उपनिषदाचें तत्त्वज्ञान सुसंगतपणे प्रगट करण्यासाठीं) ज्यांनी ब्रह्मसूत्राची रचना केली, ज्यांनी सोयीसाठीं वेदराशीचें ऋग्वेदादि चार विभाग केले, ज्यांची बुद्धिमत्ता विशाल आहे, ज्यांनी (मानवाच्या मार्गदर्शनासाठी श्रीकृष्णानें अर्जुनास केलेल्या उपदेशाचे) श्रीमद्भगवद्गीतेच्या रूपांत संपादन केले, त्या सद्गुरू व्यासमहर्षींना मी नमस्कार करतो. त्यायोगानें त्यांचा कृपाप्रसाद लाभेल असा विश्वास आहे.

## ।। ३ ।।

**श्रीगणेशाय नमः ।**

**यस्य स्मरणमात्रेण जन्मसंसारबन्धनात् ।**
**विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ।। १ ।।**

नमः समस्तभूतानामादिभूताय भूभृते ।
अनेकरूपरूपाय विष्णवे प्रभविष्णवे ।। २ ।।

।। वैशम्पायन उवाच ।।

श्रुत्वा धर्मानशेषेण पावनानि च सर्वशः ।
युधिष्ठिरः शान्तनवं पुनरेवाभ्यभाषत ।। ३ ।।

।। युधिष्ठिर उवाच ।।

किमेकं दैवतं लोके किं वाप्येकं परायणम् ।
स्तुवन्तः कं कमर्चन्तः प्राप्नुयुर्मानवाः शुभम् ।।४।।
को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः ।
किं जपन्मुच्यते जन्तुर्जन्मसंसारबन्धनात् ।।५ ।।

।। भीष्म उवाच ।।

जगत्प्रभुं देवदेवमनन्तं पुरुषोत्तमम् ।
स्तुवन्नामसहस्रेण पुरुषः सततोत्थितः ।। ६ ।।
तमेव चार्चयन्नित्यं भक्त्या पुरुषमव्ययम् ।
ध्यायन्स्तुवन्नमस्यंश्च यजमानस्तमेव च ।। ७ ।।
अनादिनिधनं विष्णुं सर्वलोकमहेश्वरम् ।
लोकाध्यक्षं स्तुवन्नित्यं सर्वदुःखातिगो भवेत् ।।८।।
ब्रह्मण्यं सर्वधर्मज्ञं लोकानां कीर्तिवर्धनम् ।
लोकनाथं महद्भूतं सर्वभूतभवोद्भवम् ।। ९ ।।
एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः ।
यद्भक्त्या पुण्डरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ।। १० ।।

**परमं यो महत्तेजः परमं यो महत्तपः ।**
**परमं यो महद्ब्रह्म परमं यः परायणम् ।। ११ ।।**
**पवित्राणां पवित्रं यो मङ्गलानां च मङ्गलम् ।**
**दैवतं देवतानां च भूतानां योऽव्ययः पिता ।।१२।।**
**यतः सर्वाणि भूतानि भवन्त्यादियुगागमे ।**
**यस्मिंश्च प्रलयं यान्ति पुनरेव युगक्षये ।। १३ ।।**
**तस्य लोकप्रधानस्य जगन्नाथस्य भूपते: ।**
**विष्णोर्नामसहस्रं मे श्रृणु पापभयापहम् ।।१४ ।।**
**यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः ।**
**ऋषिभिः परिगीतानि तानि वक्ष्यामि भूतये ।।१५ ।।**
**ऋषिर्नाम्नां सहस्रस्य वेदव्यासो महामुनिः ।**
**छन्दोऽनुष्टुप् तथा देवो भगवान् देवकीसुतः ।।१६ ।।**
**ॐ विष्णुं जिष्णुं महाविष्णुं प्रभविष्णुं महेश्वरम् ।**
**अनेकरूपं दैत्यान्तं नमामि पुरुषोत्तमम् ।। १७ ।।**

।। ३ ।।

१. ज्याच्या केवळ स्मरणानें जन्ममरणस्वरूप वा दु:खरूप अशा संसाराच्या बंधनातून मनुष्याची सुटका होते त्या सर्वसमर्थ विष्णूला नमस्कार असो.

२. संपूर्ण भूतजाताच्या म्हणजे सृष्टीच्या उत्पत्तीपूर्व ज्याचें अस्तित्व होते, ज्यानें हे सर्व भूमंडल संरक्षिले आहे, जो अनेकानेक रूपें धारण करून प्रगट होतो त्या सर्वसत्ताधारी विष्णूला नमस्कार असो.

३. वैशंपायन ऋषि म्हणाले, सर्व दृष्टीनें पवित्र करणारे असें सगळे धर्मज्ञान ऐकल्यानंतर युधिष्ठिरानें भीष्मांना पुन्हा प्रश्न केला.

४. धर्मराज युधिष्ठिर म्हणाले, लोकामध्ये कोणते एक दैवत श्रेष्ठ आहे ? जे प्राप्त करून घ्यावे आणि ज्याच्या आश्रयाला जावे असें एक स्थान कोणते ? कोणाचें स्तवन आणि पूजन केले असतां मनुष्याला शुभाची प्राप्ति होते ?

५. पितामहा ! आपल्या मतानें सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म कोणता ? कशाचा जप केला असता प्राणिमात्राची जन्ममरणरूपी संसाराच्या पाशांतून सुटका होते ?

६. भीष्माचार्य म्हणाले, जगताचा स्वामी देवाधिदेव पुरुषोत्तम अनंताचें, जो माणूस सदैव नामसहस्रानें उत्साहपूर्वक स्तवन करतो.

७ ते ९. जो भक्तीनें त्या अव्यय पुरुषाचें नित्य पूजन करतो, त्याचेच ध्यान करतो, त्याचेच स्तवन करतो, त्यालाच उद्देशून यज्ञयागादि कृत्यें करतो, तो सर्व दु:खांतून पार होतो. कारण हा विष्णू सर्व लोकांचा स्वामी, नियंता आहे. तो सर्व लोकांचा अध्यक्ष आहे. तो स्वत: जन्ममरणातीत आहे. तो ब्रह्मज्ञानमय वेदांचा रक्षक, सर्व धर्म जाणणारा, लोकांची कीर्ति वाढविणारा, लोकांचा स्वामी, सर्व भूतामध्यें महान्, सर्व भूतांची उत्पत्ति ज्याच्यापासून होते-असा आहे.

१०. म्हणून अशा या कमलाप्रमाणें नेत्र असलेल्या भगवंताचे स्तवनपूर्वक सदैव पूजन करणें हाच मनुष्याचा सर्व धर्मामधें अत्यंत श्रेष्ठ असा धर्म आहे असें माझे मत आहे.

११. हा भगवान् विष्णूच अत्यंत महान् असें तेज आहे. हाच अत्यंत श्रेष्ठ असें तप आहे. सर्व सृष्टिजाताची प्रकृति (उत्पत्तिस्थान) म्हणून ज्याला महद्ब्रह्म असें म्हणतात तेहि हाच आहे. ज्याची प्राप्ति करून घ्यावी वा ज्याच्या आश्रयाला जावे असें स्थानहि हाच आहे.

१२. हा भगवानच पवित्रामधें पवित्र, मंगलाहून मंगल आणि देवतांचेंहि दैवत आहे. हा स्वत: अव्यय म्हणजे न झिजणारा असून भूतमात्रांचा जनक आहे.

१३. सृष्टीच्या आरंभी ज्याच्यापासूनच सर्व भूतें जन्माला येतात आणि युगांची मर्यादा संपली म्हणजे ती सर्व पुन: ज्याच्यामधें लीन होतात,

१४. त्या-जगाचा नाथ, पृथ्वीचा पति, लोकांमध्यें श्रेष्ठ अशा-विष्णूचें, पापाचें भय दूर करणारे सहस्रनाम माझ्याकडून ऐक.

१५. ही नामें त्या महात्म्याच्या विशेष विशेष गुणांचें स्वरूप सांगणारी असून प्रसिद्ध आहेत. ऋषींनी ती गायिली आहेत. कल्याण साधण्यासाठीं मी ती सांगतो.

१६. या सहस्रनामांचे महर्षी वेदव्यास हे ऋषि आहेत. अनुष्टुप् हा या स्तोत्राचा छंद आहे आणि देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्ण या स्तोत्राची देवता आहे.

१७. सर्वांना व्यापून असणारा, सर्वांना जिंकणारा, सर्व समर्थ, सर्वांचा श्रेष्ठ स्वामी, दैत्यांचा संहार करणारा, अनेकरूपें धरून व्यक्त होणारा, पुरुषोत्तम असा जो महाविष्णु त्याला मी नमस्कार करतो.

## ।। ४ ।।

### ।। श्रीवेदव्यास उवाच ।।

**ॐ अस्य श्रीविष्णोर्दिव्यसहस्रनामस्तोत्रमाला-मन्त्रस्य । श्रीभगवान् वेदव्यास ऋषिः । अनुष्टुप् छन्दः । श्रीकृष्णः परमात्मा देवता । अमृतांशूद्भवो भानुरिति बीजम् । देवकीनन्दनः स्रष्टेति शक्तिः । त्रिसामा सामगः सामेति हृदयम् । शङ्खभृन्नन्दकी चक्रीति कीलकम् । शार्ङ्गधन्वा गदाधर इत्यस्त्रम् । रथाङ्गपाणिरक्षोभ्य इति कवचम् । उद्भवः क्षोभणो देव इति परमो मन्त्रः । श्रीमहाविष्णुप्रीत्यर्थे विष्णोर्दिव्यसहस्रनामजपे विनियोगः ।।**

॥ अथ न्यासः ॥

ॐ शिरसि वेदव्यासऋषये नमः । मुखे अनुष्टुप्छन्दसे नमः । हृदि श्रीकृष्णपरमात्मादेवतायै नमः । गुह्ये अमृतांशूद्भवो भानुरिति बीजाय नमः। पादयोर्देवकीनन्दनः स्रष्टेति शक्तये नमः । सर्वाङ्गे शंखभृन्नन्दकी चक्रीति कीलकाय नमः । करसंपुटे मम श्रीकृष्णप्रीत्यर्थे जपे विनियोगाय नमः ।

॥ इति ऋष्यादिन्यास ॥

॥ अथ करन्यासः ॥

''ॐ विश्वं विष्णुर्वषट्कार'' इत्यङ्गुष्ठाभ्यां नमः।
''अमृतांशूद्भवो भानुरिति'' तर्जनीभ्यां नमः ।
''ब्रह्मण्यो ब्रह्मकृद्ब्रह्मेति'' मध्यमाभ्यां नमः ।
''सुवर्णबिन्दुरक्षोभ्य'' इत्यनामिकाभ्यां नमः ।
''निमिषोऽनिमिषः स्रग्वीति'' कनिष्ठिकाभ्यां नमः ।
''रथाङ्गपाणिरक्षोभ्य'' इति करतलकरपृष्ठाभ्यां नमः ।

॥ इति करन्यासः ॥

॥ अथ षडङ्गन्यासः ॥

ॐ विश्वं विष्णुर्वषट्कार इति हृदयाय नमः ॥१ ॥
अमृतांशूद्भवो भानुरिति शिरसे स्वाहा ॥ २ ॥
ब्रह्मण्यो ब्रह्मकृद्ब्रह्मेति शिखायै वषट् ॥ ३ ॥

सुवर्णबिन्दुरक्षोभ्य इति कवचाय हुम् ।। ४ ।।
निमिषोऽनिमिषः स्रग्वीति नेत्रत्रयाय वौषट् ।।५ ।।
रथाङ्गपाणिरक्षोभ्य इत्यस्त्राय फट् ।। ६ ।।

।। इति षडङ्गन्यासः ।।

।। संकल्प विनियोग ।।

श्रीकृष्णप्रीत्यर्थे विष्णुदिव्यसहस्रनामजपमहं करिष्ये इति संकल्पः । सर्वपापक्षयार्थे श्रीपुरुषोत्तमाराधनेन जपे विनियोगः ।

।। अथ ध्यानम् ।।

ॐ शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ।।

यं ब्रह्मावरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैः
वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ।।

।। इति ध्यानम् ।।

।। ४ ।।

श्रीवेदव्यास म्हणाले, या विष्णूच्या दिव्य अशा सहस्रनामरूपी स्तोत्रमाला– मंत्राचे भगवान वेदव्यास हे ऋषि आहेत. अनुष्टुभ् हा या स्तोत्राचा

छंद आहे. परमात्मा श्रीकृष्ण ही याची देवता आहे. ''अमृतांशूद्भवो भानु:'' हे याचें बीज आहे. (कांहीं ठिकाणीं ''आत्मयोनि: स्वयंजात'' हे बीज मानलेले आहे.) ''देवकीनन्दन: स्रष्टा'' ही याची शक्ती आहे. ''त्रिसामा सामग: साम'' हे या स्तोत्राचें हृदय आहे. ''शङ्खभृन्नन्दकी चक्री'' हे कीलक आहे. ''शाङ्र्गधन्वा गदाधर:'' अस्त्र आहे. ''रथाङ्गपाणिरक्षोभ्य:'' हे कवच आहे. ''उद्भव: क्षोभणो देव:'' हा परममन्त्र आहे. श्रीमहाविष्णूचें प्रेम लाभावें यासाठी या स्तोत्राच्या जपाचा विनियोग व्हावा. (श्रीमहाविष्णूला आमच्या या स्तोत्रजपाने आनंद वा संतोष लाभावा असाही अर्थ महाविष्णुप्रीत्यर्थे या पदाचा करता येईल.)

## अथ न्यास:

''वेदव्यासांना नमस्कार'' असें म्हणून मस्तकाला उजव्या हातानें स्पर्श करावा. ''अनुष्टुप् छंदाला नमस्कार'' असें म्हणून मुखाला स्पर्श करावा. हृदयाला स्पर्श करून ''परमात्मा श्रीकृष्ण देवतेला नमस्कार'' असें म्हणावे. गुह्यभागी (जननेंद्रियाला) स्पर्श करून ''अमृतांशूद्भवो भानु'' या बीजाला नमस्कार असें म्हणावें. पायाला स्पर्श करून ''देवकीनन्दन: स्रष्टा'' या शक्तीला नमस्कार असो असें म्हणावे. दोन्ही हातांनी डाव्या-उजव्या अंगाला व पाठ पोटाला स्पर्श करून ''शङ्खभृन्नन्दकी चक्री'' या कीलकाला नमस्कार असो असें म्हणावें. हाताची ओंजळ करून ती छातीशीं धरून श्रीकृष्णाची प्रीति लाभण्यासाठीं या विष्णुसहस्रनामस्तोत्राच्या जपाचा विनियोग व्हावा असें नमस्कारपूर्वक म्हणावे.

इति ऋष्यादिन्यास:

## अथ करन्यास:

अवतरण चिन्हांत दिलेल्या एकेका ओळीचा उच्चार करीत क्रमानें हाताचे दोन्ही आंगठे, अंगठ्याजवळचें बोट, मधले बोट, करंगळीजवळचें बोट, करंगळी आणि तळहात व त्याचा मागला भाग यांना त्या त्या अवयवांनी परस्पर स्पर्शकरावा.

इति करन्यास:

## अथ षडङ्गन्यास:

१. असें म्हणून हृदयाला स्पर्श करावा.

२. असें म्हणून मस्तकाला स्पर्श करावा.

३. असें म्हणून शेंडीच्या जागीं स्पर्श करावा.

४. असें म्हणून दोन्ही हात दोन्हीकडे छातीचें पुढें धरून मनगटापासून बाहेरून आंत गोल फिरवावेत.

५. उजव्या हाताचें अंगठ्याजवळचें बोट उजव्या डोळ्याला, मधले बोट दोन भिवयांच्यामध्ये आणि करंगळीजवळचें बोट डाव्या डोळ्याला एकदम लावून हा मंत्र म्हणावा.

६. डावा हात छातीशी उताणा धरून उजवा हात उजवीकडून डावीकडे असा डोक्याभोंवती चुटकी वाजवीत फिरवून त्या हाताच्या पुढच्या भागानें डाव्या हातावर हा मंत्र म्हणून टाळी द्यावी.

इति षडङ्गन्यास:

## संकल्प आणि विनियोग

''विष्णुच्या या दिव्य सहस्रनामाचा श्रीकृष्णाची प्रीति लाभावी म्हणून मी जप करतो'' असा संकल्प करावा.

तसेंच या दिव्य स्तोत्राचा जप म्हणजे पुरुषोत्तम अशा श्रीविष्णूची आराधनाच असून तिचा विनियोग सर्व प्रकारच्या पापाच्या विनाशासाठीं व्हावा. अशी इच्छा करून उजव्या हातांत थोडे पाणी घेऊन ते खाली सोडावे.

## अथ ध्यानम्

ॐकारस्वरूप शांतमूर्ति शेषशायी, ज्याच्या नाभीमधें कमल आहे असा सर्व देवांचा अधिपति, विश्वाला आधार, आकाशाप्रमाणें व्यापक, मेघाप्रमाणें सांवळ्या वर्णाचा, सुंदर आणि कल्याणकारक अवयव असलेला लक्ष्मीचा पति, कमळासारखें डोळे असलेला, ध्यानमार्गानें योगी ज्यांच्यापर्यंत पोंचतात, जो संसाराचें भय नाहीसें करतो, जो सर्व लोकांचा, चतुर्दशभुवनांचा एकमात्र स्वामी आहे. त्या विष्णूला मी नमस्कार करतो.

ब्रह्मेंद्रादि देवता दिव्य शब्दांनी ज्याची स्तुति करतात, साम गाणारे वेदोपनिषदादि ज्याची कीर्ति गातात, ध्यानाच्या बळावर तन्मय झालेल्या मनाने योगी ज्याला पाहतात, देवादिकांनाहि ज्याचा अंतपार लागत नाही त्या देवाला नमस्कार असो.

इति ध्यानम्

# श्रीवरदनारायण प्रार्थना

पद्मासनाय मणिकुंडल शोभिताय । भास्वज्जटामुकुटमंडितमस्तकाय ।।
लक्ष्मीवराय जनपालन तत्पराय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१ ।।

ध्यानस्थिताय सरसीरुहलोचनाय । विद्युत्प्रभायुतपयोधरसन्निभाय ।।
मंदस्मितेन्दुवदनाय चतुर्भुजाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।२ ।।

सर्वाय तापशमनाय नतप्रियाय । भव्याय भूतजनकाय सुरोत्तमाय ।।
शर्वाय सर्वदमनाय मनोहराय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।३ ।।

व्यासोद्धवादिवरदाय दयामयाय । ब्रह्मात्मजप्रमुखसन्मुनिसंस्तुताय ।।
श्रीशंकरेण पुनराहितविग्रहाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।४ ।।

लक्ष्मीसुपर्णधनदार्जुनसेविताय । सूर्यार्चिताय मरुतात्मजवन्दिताय ।।
भक्तार्चिषे नरसखाय सुखप्रदाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।५ ।।

नन्दप्रियाय कपिलाय सनातनाय । दक्षाय नैकसुखदाय गदाग्रजाय ।।
श्रीविठ्ठलाय हिमशैलवरे स्थिताय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।६ ।।

गोविंद माधव मुकुंद नितांतकांत– । नामप्रियाय सुलभाय कृपाघनाय ।।
सत्याय भक्तहितबोधपरायणाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।७ ।।

नित्याय सर्वगतये जगदीश्वराय । मूर्ताय यज्ञपतये निरुपाधिकाय ।।
देवाय वेदमतयेऽमितविक्रमाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।८ ।।

गोपाय वीरविजयाय धराधराय । बीजाय सुव्रतकराय महाधनाय ।।
ईज्याय लोकगुरवे गरुडध्वजाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।९ ।।

कौमोदकीदरसुदर्शननंदकादि– । दिव्यायुधप्रहरणाय महाक्रमाय ।।
त्रैलोक्यमंगलकराय रमेश्वराय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१० ।।

रामाय सत्यतरधर्मविदुत्तमाय । प्राणाय बुद्धिकरणाय शुभेक्षणाय ।।
शुद्धात्मने करणकार्यकृतेऽव्ययाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।११ ।।

प्रेम्णास्वभक्तजनवांछितपूरणाय । संदर्शितात्मवपुषे नतवत्सलाय ।।
स्निग्धप्रसन्नहसिताय हितोत्तमाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१२ ।।

स्पर्शेन दिव्यमृदुना करनीरजस्य । संवर्धकाय चरणानतभाग्यराशेः ।।
संजीवकाय जनकाय च पालकाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१३ ।।

तेजोमयाय करुणामृतसागराय । निष्कारणाय वरदाय च निस्तुलाय ।।
कल्पद्रुमाय सुखदाय निरामयाय । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१४ ।।

भोः पाहि पाहि भगवन् शरणागतं माम् । बुद्धिं स्थिरां कुरु सदैव मनः प्रसन्नम् ।।
नित्यं मदीय रसनाग्ररसांगणेऽस्मिन् । नारायणाय बदरीपतये नमोऽस्तु ।।१५ ।।

॥ ५ ॥

# ॐ नमो भगवते श्रीवासुदेवाय ।

**ॐ नमः शिवाय**

**ॐ विश्वं विष्णुर्वषट्कारो भूतभव्यभवत्प्रभुः ।**
**भूतकृद्भूतभृद्भावो भूतात्मा भूतभावनः ॥ १ ॥**
**पूतात्मा[१०] परमात्मा च मुक्तानां परमा गतिः ।**
**अव्ययः पुरुषः साक्षी क्षेत्रज्ञोऽक्षर एव च ॥ २ ॥**
**योगो योगविदां नेता प्रधानपुरुषेश्वरः[२०] ।**
**नारसिंहवपुः श्रीमान् केशवः पुरुषोत्तमः ॥ ३ ॥**
**सर्वः शर्वः शिवः स्थाणुर्भूतादिर्निधिरव्ययः[३०] ।**
**संभवो भावनो भर्ता प्रभवः प्रभुरीश्वरः ॥ ४ ॥**
**स्वयंभूः शंभुरादित्यः पुष्कराक्षो[४०] महास्वनः ।**
**अनादिनिधनो धाता विधाता धातुरुत्तमः ॥ ५ ॥**
**अप्रमेयो हृषीकेशः पद्मनाभोऽमरप्रभुः ।**
**विश्वकर्मा[५०] मनुस्त्वष्टा स्थविष्ठः स्थविरो ध्रुवः ॥ ६ ॥**
**अग्राह्यः शाश्वतः कृष्णो लोहिताक्षः प्रतर्दनः ।**
**प्रभूतः[६०] त्रिककुब्धाम पवित्रं मङ्गलं परम् ॥ ७ ॥**
**ईशानः प्राणदः प्राणो ज्येष्ठः श्रेष्ठः प्रजापतिः ।**
**हिरण्यगर्भो[७०] भूगर्भो माधवो मधुसूदनः ॥ ८ ॥**

ईश्वरो विक्रमी धन्वी मेधावी विक्रमः क्रमः ।
अनुत्तमो[८०] दुराधर्षः कृतज्ञः कृतिरात्मवान् ॥ ९ ॥
सुरेशः शरणं शर्म विश्वरेताः प्रजाभवः ।
अहः[९०] संवत्सरो व्यालः प्रत्ययः सर्वदर्शनः ॥ १० ॥
अजः सर्वेश्वरः सिद्धः सिद्धिः सर्वादिरच्युतः[१००] ।
वृषाकपिरमेयात्मा सर्वयोगविनिःसृतः ॥ ११ ॥
वसुर्वसुमनाः सत्यः समात्मा संमितः समः ।
अमोघः[११०] पुण्डरीकाक्षो वृषकर्मा वृषाकृतिः ॥ १२ ॥
रुद्रो बहुशिरा बभ्रुर्विश्वयोनिः शुचिश्रवाः ।
अमृतः शाश्वतः स्थाणुर्[१२०]वरारोहो महातपाः ॥ १३ ॥
सर्वगः सर्वविद्भानुर्विष्वक्सेनो जनार्दनः ।
वेदो वेदविदव्यङ्गो वेदाङ्गो[१३०] वेदवित् कविः ॥ १४ ॥
लोकाध्यक्षः सुराध्यक्षो धर्माध्यक्षः कृताकृतः ।
चतुरात्मा चतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुजः[१४०] ॥ १५ ॥
भ्राजिष्णुर्भोजनं भोक्ता सहिष्णुर्जगदादिजः ।
अनघो विजयो जेता विश्वयोनिः पुनर्वसुः[१५०] ॥ १६ ॥
उपेन्द्रो वामनः प्रांशुरमोघः शुचिरूर्जितः ।
अतीन्द्रः संग्रहः सर्गो धृतात्मा[१६०] नियमो यमः ॥ १७ ॥
वेद्यो वैद्यः सदायोगी वीरहा माधवो मधुः ।
अतीन्द्रियो महामायो[१७०] महोत्साहो महाबलः ॥ १८ ॥

महाबुद्धिर्महावीर्यो महाशक्तिर्महाद्युतिः ।
अनिर्देश्यवपुः श्रीमानमेयात्मा महाद्रिधृक्[१८०] ॥१९॥
महेष्वासो महीभर्ता श्रीनिवासः सतां गतिः ।
अनिरुद्धः सुरानन्दो गोविन्दो गोविदां पतिः ॥२०॥
मरीचिर्दमनो[१९०] हंसः सुपर्णो भुजगोत्तमः ।
हिरण्यनाभः सुतपाः पद्मनाभः प्रजापतिः ॥२१॥
अमृत्युः सर्वदृक् सिंहः[२००] संधाता सन्धिमान् स्थिरः ।
अजो दुर्मर्षणः शास्ता विश्रुतात्मा सुरारिहा ॥२२॥
गुरुर्गुरुतमो[२१०] धाम सत्यः सत्यपराक्रमः ।
निमिषोऽनिमिषः स्रग्वी वाचस्पतिरुदारधीः ॥२३॥
अग्रणीर्ग्रामणीः श्रीमान्[२२०] न्यायो नेता समीरणः ।
सहस्रमूर्धा विश्वात्मा सहस्राक्षः सहस्रपात् ॥२४॥
आवर्तनो निवृत्तात्मा संवृतः[२३०] संप्रमर्दनः ।
अहस्संवर्तको वह्निरनिलो धरणीधरः ॥ २५ ॥
सुप्रसादः प्रसन्नात्मा विश्वधृग्विश्वभुग्विभुः[२४०] ।
सत्कर्ता सत्कृतः साधुर्जह्नुर्नारायणो नरः ॥ २६ ॥
असंख्येयोऽप्रमेयात्मा विशिष्टः [२५०]शिष्टकृच्छुचिः ।
सिद्धार्थः सिद्धसंकल्पः सिद्धिदः सिद्धिसाधनः ॥२७॥
वृषाही वृषभो विष्णुर्वृषपर्वा वृषोदरः[२६०] ।
वर्धनो वर्धमानश्च विविक्तः श्रुतिसागरः ॥ २८ ॥

सुभुजो दुर्धरो वाग्मी महेन्द्रो वसुदो वसुः[२७०] ।
नैकरूपो बृहद्रूपः शिपिविष्टः प्रकाशनः ॥ २९ ॥
ओजस्तेजोद्युतिधरः प्रकाशात्मा प्रतापनः ।
ऋद्धः स्पष्टाक्षरो [२८०]मन्त्रश्चन्द्रांशुर्भास्करद्युतिः ॥३०॥
अमृतांशूद्भवो भानुः शशबिन्दुः सुरेश्वरः ।
औषधं जगतः सेतुः सत्यधर्मपराक्रमः ॥ ३१ ॥
भूतभव्यभवन्नाथः[२९०] पवनः पावनोऽनलः ।
कामहा कामकृत्कान्तः कामः कामप्रदः प्रभुः ॥३२॥
[३००]युगादिकृद्युगावर्तो नैकमायो महाशनः ।
अदृश्यो व्यक्तरूपश्च सहस्रजिदनन्तजित् ॥ ३३ ॥
इष्टो विशिष्टः शिष्टेष्टः[३१०] शिखण्डी नहुषो वृषः ।
क्रोधहा क्रोधकृत्कर्ता विश्वबाहुर्महीधरः ॥ ३४ ॥
अच्युतः प्रथितः प्राणः[३२०] प्राणदो वासवानुजः ।
अपां निधिरधिष्ठानमप्रमत्तः प्रतिष्ठितः ॥ ३५ ॥
स्कन्दः स्कन्दधरो धुर्यो वरदो[३३०] वायुवाहनः ।
वासुदेवो बृहद्भानुरादिदेवः पुरंदरः ॥ ३६ ॥
अशोकस्तारणस्तारः शूरः [३४०]शौरिर्जनेश्वरः ।
अनुकूलः शतावर्तः पद्मी पद्मनिभेक्षणः ॥३७॥
पद्मनाभोऽरविन्दाक्षः पद्मगर्भः शरीरभृत् ।
महर्धिर्[३५०] ऋद्धो वृद्धात्मा महाक्षो गरुडध्वजः ॥३८॥

अतुलः शरभो भीमः समयज्ञो हविर्हरिः ।
सर्वलक्षणलक्षण्यो[360] लक्ष्मीवान् समितिंजयः ॥३९॥
विक्षरो रोहितो मार्गो हेतुर्दामोदरः सहः ।
महीधरो महाभागो[370] वेगवानमिताशनः ॥४०॥
उद्भवः क्षोभणो देवः श्रीगर्भः परमेश्वरः ।
करणं कारणं कर्ता[380] विकर्ता गहनो गुहः ॥४१॥
व्यवसायो व्यवस्थानः संस्थानः स्थानदो ध्रुवः ।
परर्द्धिः [390] परमस्पष्टस्तुष्टः पुष्टः शुभेक्षणः ॥४२॥
रामो विरामो विरजो मार्गो नेयो नयोऽनयः[400] ।
वीरः शक्तिमतां श्रेष्ठो धर्मो धर्मविदुत्तमः ॥४३॥
वैकुण्ठः पुरुषः प्राणः प्राणदः प्रणवः पृथुः[410] ।
हिरण्यगर्भः शत्रुघ्नो व्याप्तो वायुरधोक्षजः ॥४४॥
ऋतुः सुदर्शनः कालः परमेष्ठी परिग्रहः[420] ।
उग्रः संवत्सरो दक्षो विश्रामो विश्वदक्षिणः ॥४५॥
विस्तारः स्थावरस्थाणुः प्रमाणं बीजमव्ययम् ।
[440] अर्थोऽनर्थो महाकोशो महाभोगो महाधनः ॥४६॥
अनिर्विण्णः स्थविष्ठोऽभूर्धर्मयूपो महामखः ।
नक्षत्रनेमिर्नक्षत्री क्षमः क्षामः समीहनः ॥४७॥
यज्ञ इज्यो महेज्यश्च क्रतुः सत्रं सतां गतिः[450] ।
सर्वदर्शी विमुक्तात्मा सर्वज्ञो ज्ञानमुत्तमम् ॥४८॥

सुव्रतः सुमुखः सूक्ष्मः सुघोषः सुखदः सुहृत्[४६०] ।
मनोहरो जितक्रोधो वीरबाहुर्विदारणः ॥ ४९ ॥
स्वापनः स्ववशो व्यापी नैकात्मा नैककर्मकृत् ।
वत्सरो[४७०] वत्सलो वत्सी रत्नगर्भो धनेश्वरः ॥५० ॥
धर्मगुब्धर्मकृद्धर्मी सदसत्[४८०]क्षरमक्षरम् ।
अविज्ञाता सहस्रांशुर्विधाता कृतलक्षणः ॥५१ ॥
गभस्तिनेमिः सत्त्वस्थः सिंहो भूतमहेश्वरः ।
आदिदेवो[४९०] महादेवो देवेशो देवभृद्गुरुः ॥५२ ॥
उत्तरो गोपतिर्गोप्ता ज्ञानगम्यः पुरातनः ।
शरीरभूतभृद् भोक्ता[५००] कपीन्द्रो भूरिदक्षिणः ॥५३ ॥
सोमपोऽमृतपः सोमः पुरुजित्पुरुसत्तमः ।
विनयो जयः [५१०]सत्यसंधो दाशार्हः सात्वतां पतिः ॥५४ ॥
जीवो विनयितासाक्षी मुकुन्दोऽमितविक्रमः ।
अम्भोनिधिरनन्तात्मा महोदधिशयोऽन्तकः[५२०] ॥५५ ॥
अजो महार्हः स्वाभाव्यो जितामित्रः प्रमोदनः ।
आनन्दो नन्दनो नन्दः सत्यधर्मा त्रिविक्रमः[५३०] ॥५६ ॥
महर्षिः कपिलाचार्यः कृतज्ञो मेदिनीपतिः ।
त्रिपदस्त्रिदशाध्यक्षो महाशृङ्गः कृतान्तकृत् ॥५७ ॥
महावराहो गोविन्दः सुषेणः[५४०] कनकाङ्गदी ।
गुह्यो गभीरो गहनो गुप्तश्चक्रगदाधरः ॥५८ ॥

वेधाः स्वाङ्गोऽजितः कृष्णो[५५०] दृढः संकर्षणोऽच्युतः ।
वरुणो वारुणो वृक्षः पुष्कराक्षो महामनाः ॥५९॥
भगवान् भगहाऽनन्दी[५६०] वनमाली हलायुधः ।
आदित्यो ज्योतिरादित्यः सहिष्णुर्गतिसत्तमः ॥६०॥
सुधन्वा खण्डपरशुर्दारुणो द्रविणप्रदः[५७०] ।
दिवः स्पृक् सर्वदृग्व्यासो वाचस्पतिरयोनिजः ॥६१॥
त्रिसामा सामगः साम निर्वाणं भेषजं भिषक् ।
संन्यास[५८०]कृच्छमः शान्तो निष्ठा शान्तिः परायणम् ॥६२॥
शुभाङ्गः शान्तिदः स्रष्टा कुमुदः कुवलेशयः[५९०] ।
गोहितो गोपतिर्गोप्ता वृषभाक्षो वृषप्रियः ॥ ६३ ॥
अनिवर्ती निवृत्तात्मा संक्षेप्ता क्षेमकृच्छिवः[६००] ।
श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः श्रीमतां वरः ॥६४॥
श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः ।
श्रीधरः[६१०] श्रीकरः श्रेयः श्रीमाल्ँल्लोकत्रयाश्रयः ॥६५॥
स्वक्षः स्वङ्गः शतानन्दो नन्दिर्ज्योतिर्गणेश्वरः ।
विजितात्मा[६२०] विधेयात्मा सत्कीर्तिश्छिन्नसंशयः ॥६६॥
उदीर्णः सर्वतश्चक्षुरनीशः शाश्वतस्थिरः ।
भूशयो भूषणो [६३०]भूतिर्विशोकः शोकनाशनः ॥६७॥
अर्चिष्मानर्चितः कुम्भो विशुद्धात्मा विशोधनः ।
अनिरुद्धोऽप्रतिरथः [६४०]प्रद्युम्नोऽमितविक्रमः ॥६८॥

कालनेमिनिहा वीरः शौरिः शूरजनेश्वरः ।
त्रिलोकात्मा त्रिलोकेशः केशवः केशिहा हरिः[६५०] ॥६९॥
कामदेवः कामपालः कामी कान्तः कृतागमः ।
अनिर्देश्यवपुर्विष्णुर्वीरोऽनन्तो धनंजयः[६६०] ॥७०॥
ब्रह्मण्यो ब्रह्मकृद् ब्रह्मा ब्रह्म ब्रह्मविवर्धनः ।
ब्रह्मविद् ब्राह्मणो ब्रह्मी ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः[६७०] ॥७१॥
महाक्रमो महाकर्मा महातेजा महोरगः ।
महाक्रतुर्महायज्वा महायज्ञो महाहविः ॥ ७२ ॥
स्तव्यः स्तवप्रियः[६८०] स्तोत्रं स्तुतिः स्तोता रणप्रियः ।
पूर्णः पूरयिता पुण्यः पुण्यकीर्तिरनामयः ॥७३॥
[६९०] मनोजवस्तीर्थकरो वसुरेता वसुप्रदः ।
वसुप्रदो वासुदेवो वसुर्वसुमना हविः ॥ ७४ ॥
सद्गतिः सत्कृतिः[७००] सत्ता सद्भूतिः सत्परायणः ।
शूरसेनो यदुश्रेष्ठः सन्निवासः सुयामुनः ॥ ७५ ॥
भूतावासो वासुदेवः सर्वासु[७१०]निलयोऽनलः ।
दर्पहा दर्पदो दृप्तो दुर्धरोऽथापराजितः ॥ ७६ ॥
विश्वमूर्तिर्महामूर्तिर्दीप्तमूर्तिरमूर्तिमान्[७२०] ।
अनेकमूर्तिरव्यक्तः शतमूर्तिः शताननः ॥ ७७ ॥
एको नैकः सवः कः किं यत्[७३०] तत् पदमनुत्तमम् ।
लोकबन्धुर्लोकनाथो माधवो भक्तवत्सलः ॥७८॥

सुवर्णवर्णो हेमाङ्गो वराङ्गश्[७४०]चन्दनाङ्गदी ।
वीरहा विषमः शून्यो घृताशीरचलश्चलः ॥ ७९ ॥
अमानी मानदो मान्यो [७५०]लोकस्वामी त्रिलोकधृक् ।
सुमेधा मेधजो धन्यः सत्यमेधा धराधरः ॥ ८० ॥
तेजोवृषो द्युतिधरः सर्वशस्त्रभृतां वरः ।
[७६०]प्रग्रहो निग्रहो व्यग्रो नैकशृङ्गो गदाग्रजः ॥ ८१ ॥
चतुर्मूर्तिश्चतुर्बाहुश्चतुर्व्यूहश्चतुर्गतिः ।
चतुरात्मा [७७०]चतुर्भावश्चतुर्वेदविदेकपात् ॥ ८२ ॥
समावर्तो निवृत्तात्मा दुर्जयो दुरतिक्रमः ।
दुर्लभो दुर्गमो दुर्गो [७८०]दुरावासो दुरारिहा ॥ ८३ ॥
शुभाङ्गो लोकसारङ्गः सुतन्तुस्तन्तुवर्धनः ।
इन्द्रकर्मा महाकर्मा कृतकर्मा कृतागमः ॥ ८४ ॥
[७९०]उद्भवः सुन्दरः सुन्दो रत्ननाभः सुलोचनः ।
अर्को वाजसनः शृङ्गी जयन्तः सर्वविज्जयी ॥ ८५ ॥
[८००]सुवर्णबिन्दुरक्षोभ्यः सर्ववागीश्वरेश्वरः ।
महाह्रदो महागर्तो महाभूतो महानिधिः ॥ ८६ ॥
कुमुदः कुन्दरः कुन्दः [८१०]पर्जन्यः पावनोऽनिलः ।
अमृतांशोऽमृतवपुः सर्वज्ञः सर्वतोमुखः ॥ ८७ ॥
सुलभः सुव्रतः सिद्धः [८२०]शत्रुजिच्छत्रुतापनः ।
न्यग्रोधोदुम्बरोऽश्वत्थश्चाणूरान्ध्रनिषूदनः ॥ ८८ ॥

सहस्रार्चिः सप्तजिह्वः सप्तैधाः सप्तवाहनः ।
[८३०] अमूर्तिरनघोऽचिन्त्यो भयकृद् भयनाशनः ।। ८९ ।।
अणुर्बृहत्कृशः स्थूलो गुणभृन्निर्गुणो[८४०] महान् ।
अधृतः स्वधृतः स्वास्यः प्राग्वंशो वंशवर्धनः ।।९० ।।
भारभृत् कथितो योगी योगीशः[८५०] सर्वकामदः ।
आश्रमः श्रमणः क्षामः सुपर्णो वायुवाहनः ।।९१ ।।
धनुर्धरो धनुर्वेदो दण्डो [८६०] दमयिता दमः ।
अपराजितः सर्वसहो नियन्ता नियमो यमः ।।९२ ।।
सत्त्ववान् सात्त्विकः सत्यः सत्यधर्मपरायणः[८७०] ।
अभिप्रायः प्रियार्होऽर्हः प्रियकृत् प्रीतिवर्धनः ।।९३।।
विहायसगतिर्ज्योतिः सुरुचिर्हुतभुग्[८८०] विभुः ।
रविर्विरोचनः सूर्यः सविता रविलोचनः ।।९४ ।।
अनन्तो हुतभुग्भोक्ता सुखदो [८९०] नैकजोऽग्रजः ।
अनिर्विण्णः सदामर्षी लोकाधिष्ठानमद्भुतः ।। ९५ ।।
सनात्सनातनतमः कपिलः कपिर[९००] व्ययः ।
स्वस्तिदः स्वस्तिकृत्स्वस्ति स्वस्तिभुक्स्वस्तिदक्षिणः ।।९६।।
अरौद्रः कुण्डली चक्री विक्रम्यूर्जित[९१०] शासनः ।
शब्दातिगः शब्दसहः शिशिरः शर्वरीकरः ।। ९७ ।।
अक्रूरः पेशलो दक्षो दक्षिणः क्षमिणां वरः ।
[९२०] विद्वत्तमो वीतभयः पुण्यश्रवणकीर्तनः ।। ९८ ।।

उत्तारणो दुष्कृतिहा पुण्यो दुःस्वप्ननाशनः ।
वीरहा रक्षणः सन्तो जीवनः[९३०] पर्यवस्थितः ॥९९॥
अनन्तरूपोऽनन्तश्रीर्जितमन्युर्भयापहः ।
चतुरस्रो गभीरात्मा विदिशो व्यादिशो दिशः[९४०] ॥१००॥
अनादिर्भूर्भुवो लक्ष्मीः सुवीरो रुचिराङ्गदः ।
जननो जनजन्मादिर्भीमो भीमपराक्रमः ॥१०१॥
आधारनिलयो[९५०] धाता पुष्पहासः प्रजागरः ।
ऊर्ध्वगः सत्पथाचारः प्राणदः प्रणवः पणः ॥१०२॥
प्रमाणं प्राणनिलयः[९६०] प्राणभृत्प्राणजीवनः ।
तत्त्वं तत्त्वविदेकात्मा जन्ममृत्युजरातिगः ॥१०३॥
भूर्भुवःस्वस्तरुस्तारः सपिता प्रपितामहः[९७०] ।
यज्ञो यज्ञपतिर्यज्वा यज्ञाङ्गो यज्ञवाहनः ॥ १०४ ॥
यज्ञभृद् यज्ञकृद् यज्ञी यज्ञभुग् यज्ञसाधनः[९८०] ।
यज्ञान्तकृद् यज्ञगुह्यमन्नमन्नाद एव च ॥ १०५ ॥
आत्मयोनिः स्वयंजातो वैखानः सामगायनः ।
देवकीनन्दनः स्रष्टा[९९०] क्षितीशः पापनाशनः ॥१०६॥
शंखभृन्नन्दकी चक्री शार्ङ्गधन्वा गदाधरः ।
रथाङ्गपाणिरक्षोभ्यः सर्वप्रहरणायुधः[१०००] ॥ १०७ ॥

सर्वप्रहरणायुध ॐनम इति ।

विष्णुसहस्रनामस्तोत्रम्

संपूर्णम्

–ॐ–श्रीः–स्वस्ति–

।। श्रीशंकर ।।

## सार्थ विष्णुसहस्रनाम

# ॐ विश्वं विष्णुर्वषट्कारो भूतभव्यभवत्प्रभुः ।
# भूतकृद् भूतभृद्भावो भूतात्मा भूतभावनः ।। १ ।।

**१) ॐ विश्वम्** – सर्व विश्वाचे जो कारण आहे, वा जो स्वतःच विश्वरूपाने नटला आहे. वा जो या सर्व दिसणाऱ्या, भासणाऱ्या, असणाऱ्या विश्वामध्यें ओतप्रोत भरून राहिला आहे, वा विश्वाच्या उत्पत्तीला, स्थितीला आणि प्रलयाला जो एकमात्र कारण आहे म्हणजे हे विश्व ज्याच्यातून उत्पन्न होते, ज्याचे ठिकाणीं नांदते आणि अंती ज्याच्यामध्यें विलीन होते, तो.

**२) विष्णुः** – व्यापणे हा ज्याचा स्वभाव आहे, जो सर्वांना अंतर्बाह्य व्यापून टाकतो, व त्यामुळेच देश, काल, वस्तुस्वरूप यांच्यामुळे जो कधीहि मर्यादित होत नाही तो, वा विश्वामध्यें शिरून राहतो म्हणूनहि विष्णू म्हणता येते.

**३) वषट्कारः** – यज्ञामध्यें वषट् ही क्रिया ज्याला उद्देशून केली जाते तो, किंवा यज्ञामध्यें केली जाणारी वषट्क्रिया हेच ज्याचे स्वरूप आहे तो, कारण यज्ञ हाच विष्णू आहे (यज्ञो वै विष्णुः) असे तैत्तिरीय उपनिषदांत सांगितलेले आहे.

**४) भूतभव्यभवत्प्रभुः** – भूत म्हणजे झालेले, भव्य म्हणजे भविष्यकालीं अस्तित्वांत येणारे आणि भवत् म्हणजे वर्तमानकाली असलेले अशा तिन्ही कालातील वस्तुजातावर ज्याची सत्ता आहे.

**५) भूतकृत्** – रजोगुणाचा आश्रय घेऊन ब्रह्मदेवाच्या रूपाने जो भूतांची म्हणजे उत्पन्न होणाऱ्या सर्व वस्तूंची रचना करतो. किंवा कृत यामध्यें कृन्त धातु गृहीत धरला तर जो तमोगुणाचा आश्रय करून रुद्ररूपाने सर्व उत्पन्न झालेल्यांचा म्हणजे भूतांचा नाश करतो, संहार करतो.

**६) भूतभृत्** – सत्त्वगुणांचा आश्रय करून जो सर्व भूतांचे भरण म्हणजेच धारण, पालन-पोषण करतो.

**७) भावः** – निर्माण होणे, जन्माला येणे वा अस्तित्व असणे

हे दोन्ही भू धातूपासून होणाऱ्या भाव शब्दाचे अर्थ आहेत. त्यामुळे जो विश्वरूपाने, प्रपंचरूपाने उत्पन्न होतो किंवा जन्माला येणे, जगणे, वाढणे इत्यादि कोणत्याहि विकारावाचून, कोणत्याहि अपेक्षेवाचून, उपाधीवाचून, ज्याला अस्तित्व असते. प्रेम, श्रद्धा.

८) **भूतात्मा** – जो सर्व भूतांचा आत्मा आहे म्हणजे जो सर्वांच्या अंतर्यामी आहे.

९) **भूतभावनः** – जो भूतांची स्वरूपे, रचना, गुणविशेष, आकार इत्यादि कसे असावेत हे निश्चित करतो.

## पूतात्मा[१०] परमात्मा च मुक्तानां परमा गतिः ।
## अव्ययः पुरुषः साक्षी क्षेत्रज्ञोऽक्षर एव च ।।२।।

१०) **पूतात्मा** – जो स्वरूपत: अत्यंत पवित्र आहे, कोणत्याहि गुणकर्माची उपाधी ज्यास कधीही बाधू शकत नाही.

११) **परमात्मा** – प्रत्येक वस्तुमात्राच्या ठिकाणी आत्मा व्यापून असल्याने ईश्वराला सर्वश्रेष्ठ आत्मा असे म्हटले आहे.

१२) **मुक्तानां परमा गतिः** – जे जन्ममृत्यूच्या बंधनातून सुटले आहेत, ज्यांना मोक्ष मिळाला आहे, अशा मुक्तांनाहि जो मिळविण्यास योग्य म्हणून सर्वश्रेष्ठ वाटतो, किंवा ज्या ठिकाणी पोंचले असताना पुन्हा परत येण्याची आपत्ति ओढवत नाही म्हणून मुक्त ज्याचे ठिकाणी प्रविष्ट होतात.

१३) **अव्ययः** – व्यय म्हणजे नाश किंवा विकृति, झीज ही ज्याचे ठिकाणी नाही, जो देशकालनिरपेक्षपणें जसाच्या तसा राहतो.

१४) **पुरुषः** – शरीराला पुर म्हणतात. पुर म्हणजे नगर किंवा गांव, त्याला जशा वेशी किंवा दारे असतात त्याप्रमाणे शरीरालाही नाक, कान इत्यादि नऊ दारे आहेत. अशा या शरीररूपी गांवामध्ये जो 'शेते' म्हणजे झोपतो, राहतो. पूर्वीपासून ज्याला अस्तित्त्व आहे, म्हणजे अस्तित्वात येणाऱ्या कोणत्याही वस्तूपूर्वी जो अस्तित्वात आहे. किंवा पुरु म्हणजे विपुलता, अशा विपुलतेने म्हणजे समृद्धतेने युक्त असणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी जो राहतो किंवा जो विपुल फल देतो किंवा प्रलयाचें वेळीं सर्व भुवनांचा विनाश करतो किंवा जो सर्वदा पूर्णतेने युक्त आहे वा ज्याच्यामुळे पूर्णता येते.

**१५) साक्षी** – कोणताहि अडथळा न येता स्वत:च्या ज्ञानरूपतेने जो सर्व कांही पाहतो. किंवा घडणाऱ्या कोणत्याहि घटनेचा कसल्याहि प्रकारचा संबंध स्वत:कडे येऊ न देता जो अलिप्ततेने सर्व गोष्टी पाहतो.

**१६) क्षेत्रज्ञ :** – क्षेत्र शरीराला म्हणतात. कारण शेतात जसे टाकलेले बीज वाढते त्याप्रमाणे या शरीराच्या माध्यमातूनहि वासनारूपांत थोड्या प्रमाणात असलेली पापपुण्याची बीजे कृतीच्या रूपाने वाढतात. म्हणून शरीराला शेत, क्षेत्र असे म्हणतात. या शरीराचे संपूर्ण व्यापार जो उत्तमरीतीने जाणतो.

**१७) अक्षर** – जो क्षरण पावत नाही, झिजत नाही, उणावत जात नाही.

**एव, च** ही पादपूरणार्थक अव्यये आहेत. एव म्हणजे तोच आणि च म्हणजे ''आणि'' असे त्यांचे अर्थ आहेत. अर्थाच्या समाधानासाठी जो क्षेत्रज्ञ आहे तोच अक्षरही आहे. त्या दोघांमध्ये ''च'' काराने व्यवहारात: भेद आहेत असे वाटत असले तरी तत्वत: ते एकरूपच आहे असे ''एव च'' या शब्दाने सुचविले जाते. हा अर्थ पुढे सगळ्या नामांच्या संबंधातहि लक्षात घेणे इष्ट आहे.

## योगो योगविदां नेता प्रधानपुरुषेश्वर:[२०] ।
## नारसिंहवपु: श्रीमान् केशव: पुरुषोत्तम: ।। ३ ।।

**१८) योग :** – मनासहित सर्व ज्ञानेंद्रियांच्या बहिर्मुख असलेल्या प्रवृत्तींचा रोध करून ती सर्व इंद्रिये आत्म्याच्या ठिकाणी लीन झाल्यानंतर आत्मा आणि परमात्मा यांची एकता प्रस्थापित होणे या स्थितीस योग असे म्हणतात. ते ज्याचे स्वरूप आहे किंवा जीवशिवाची, आत्मापरमात्म्याची एकता (ऐक्य) ज्याच्यामुळें (ज्याच्या कृपेमुळें) प्राप्त होते.

**१९) योगविदां नेता** – योगाला जे जाणतात, वा जे योग प्राप्त करून घेतात वा जे योगासंबंधी चिंतन मननादि विचार करतात त्यांना योगविद् म्हणावे. अशा योगविदांचा जो नेता म्हणजे संरक्षक, मार्गदर्शक.

२०) **प्रधानपुरुषेश्वरः** – प्रधान म्हणजे जगताच्या उत्पत्तीस कारणीभूत असलेली त्रिगुणात्मक अशी मूलप्रकृति व पुरुष म्हणजे क्षेत्रज्ञ असा जीव या दोघांवर ज्यांची सत्ता आहे.

२१) **नारसिंहवपुः** – नर म्हणजे माणूस आणि सिंह या दोघांचेहि अवयव मिळून ज्याची वपु म्हणजे शरीर बनले आहे.

२२) **श्रीमान्** – श्री म्हणजे संपत्ति, शोभा वा सौंदर्य हे ज्याच्याजवळ नित्य आहे. किंवा श्री म्हणजे लक्ष्मी ही देवता पत्नीरूपाने ज्याच्याजवळ असते.

२३) **केशवः** – ज्याचे केस प्रशंसनीय, आकर्षक, सुंदर आहेत. किंवा क् म्हणजे ब्रह्मा, अ म्हणजे विष्णु व ईश म्हणजे महादेव शंकर. हे तिन्ही ज्याच्या स्वाधीन होऊन राहतात असा ब्रह्मरूप. किंवा केशी नांवाच्या दैत्याला ज्याने ठार मारले आहे.

२४) **पुरुषोत्तमः** – प्रकृतीच्या संबंधात आत्म्याला क्षेत्रज्ञ वा अक्षर असा पुरुष मानतात. निरुपाधिक ब्रह्मस्वरूपात जो त्या पुरुषापेक्षा उत्तम म्हणजे श्रेष्ठ आहे.

## सर्वः शर्वः शिवः स्थाणुर्भूतादिर्निधिरव्ययः[३०] ।
## संभवो भावनो भर्ता प्रभवः प्रभुरीश्वरः ॥ ४ ॥

२५) **सर्वः** – दिसणारे, भासणारे, असणारे इत्यादि सर्व काहीं ज्याच्यामुळे उत्पन्न होते, ज्याच्या आश्रयाने राहते, ज्याच्यामध्ये लीन होते. किंवा कोणत्याहि भावाला ज्याच्यापलीकडे अस्तित्व नाही. किंवा जो सगळे कांही सर्वदा जाणतो.

२६) **शर्वः** – प्रलयाच्या वेळीं जो सगळ्यांचा संहार करतो.

२७) **शिवः** – कल्याण करणारा, मंगलदायक. शंकर आणि विष्णु यांच्यामध्यें अभेद असल्याने शिव हे शंकराचें प्रसिद्ध नांव विष्णूचेहि द्योतक आहे.

२८) **स्थाणुः** – जो न हालणारा असा स्थिर आहे वा जो खांबाप्रमाणे तिन्ही लोकांना आधार देतो.

२९) **भूतादिः** – सर्व भूतांचे जो कारण आहे किंवा उत्पन्न

होणाऱ्या सर्व वस्तूपूर्वी जो अस्तित्वात असतो.

**३०) निधिरव्ययः** – ( निधिः अव्ययः ) निधि म्हणजे साठा. सर्व वस्तु शेवटी ज्याचे ठिकाणीं साठविल्या जातात वा सर्व कांही ज्याच्यातून बाहेर येते असा जो भांडाराकोठाराप्रमाणे आहे आणि त्यांतून कितीहि काढले तरी जो उणावत नाही असा साठा हे ज्याचे स्वरूप आहे किंवा सद्गुणांचा, मांगल्याचा, सत्कृत्यांचा न संपणारा साठा हे ज्याचे रूप आहे.

**३१) संभवः** – स्वतःच्या इच्छेने तो योग्य त्या रूपात अवतार धारण करतो वा व्यक्त होतो.

**३२) भावनः** – कर्त्याला उपभोग देण्यासाठी जो सर्व प्रकारची फले उत्पन्न करतो. सर्व प्रकारच्या भावना ज्याच्या आश्रयाने राहतात वा उत्पन्न होतात.

**३३) भर्ता** – त्रैलोक्याचें भरणपोषण करणारा.

**३४) प्रभवः** – सर्व महाभूतांचे जो उत्कृष्ट असे उत्पत्तिस्थान आहे किंवा ज्याची उत्पत्ति (जन्म, अवतार) दिव्य आहे, श्रेष्ठ आहे. (प्र)

**३५) प्रभुः** – समर्थ. सर्व प्रकारच्या क्रिया वा घटना घडविण्याची शक्ति, सामर्थ्य ज्याचे ठिकाणी उत्कृष्ट रीतीने आहे.

**३६) ईश्वरः** – ज्याचेजवळ उपाधिवाचून सर्व प्रकारचे ऐश्वर्य राहते, वा सर्वांवर ज्याची सत्ता अबाधितपणें चालते.

## स्वयंभूः शंभुरादित्यः पुष्कराक्षो[४०] महास्वनः ।
## अनादिनिधनो धाता विधाता धातुरुत्तमः ।।५ ।।

**३७) स्वयंभूः** – स्वतःच–इतर कोणत्याहि कारणांच्या सहाय्यावाचून उत्पन्न होणारा, प्रकट होणारा वा असणारा. किंवा सर्वांच्या वर राहतो म्हणजे जो सर्वश्रेष्ठ आहे असा. किंवा जो पूर्णपणे स्वतंत्र आहे, कधीहि परतंत्र होत नाही.

**३८) शंभुः** – शम् म्हणजे सुख, त्याची भावना म्हणजे उत्पत्ती करणारा. भक्तांना, सज्जनांना सुखदायक.

**३९) आदित्यः** – म्हणजे सूर्य. वैदिक परंपरेमध्यें अत्यंत

तेजस्वी, प्रकाशमान व पृथ्वीला जीवनदायक असलेल्या सुर्यमंडलाला व्यक्त स्वरूपात असलेले ईश्वराचें प्रतीक मानले आहे. प्रतीकच लक्षणेने वा भावनांच्या उत्कटतेने तद्रूप मानले जाते. त्या दृष्टीने सूर्यमंडलामध्यें राहणारा तो सूर्यरूपच. म्हणून परमेश्वर विष्णूला आदित्य असे म्हटले आहे. आदित्यापैकी एक या गीतेच्या दहाव्या अध्यायातील वर्णनाप्रमाणे विष्णूला हे नांव प्राप्त झाले आहे. किंवा अखंडित अशी जी पृथ्वी तिला अदिती म्हणतात. तिचा पति, धनी या अर्थाने विष्णूला आदित्य म्हणतात. किंवा सूर्य ज्याप्रमाणे स्वत: एक असून पाण्याने भरलेल्या पुष्कळ भांड्यामध्यें प्रतिबिंब पडून अनेकरूप भासतो तसा ईश्वरहि एकटा एक असून अनेक शरीरामध्यें जीवनरूपाने अनेकरूप भासतो. या सारखेपणामुळे विष्णूला येथे आदित्य म्हटले आहे.

४०) **पुष्कराक्ष:** – पुष्कर म्हणजे कमळ, अक्ष (अक्षि) म्हणजे डोळे. ज्याचे डोळे कमळाप्रमाणे आहेत असा.

४१) **महास्वन:** – महा म्हणजे मोठा, श्रेष्ठ. स्वन म्हणजे स्वर ध्वनि, शब्द. ज्याचा शब्द हा अत्यंत श्रेष्ठ आहे.

वेद हा परमेश्वराचा शब्द आहे व ते वाङ्मय अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणून परमेश्वराला येथे महास्वन असे म्हटले आहे. किंवा ज्याचा स्वर ध्वनि सागराच्या वा मेघाच्या गर्जनेप्रमाणे मोठा म्हणजे गंभीर आहे असा.

४२) **अनादिनिधन:** – ज्याला आदि म्हणजे जन्म किंवा आरंभ व निधन म्हणजे नाश, मृत्यू हे दोन्हीही विकार नाहीत.

४३) **धाता** – धारण करणारा. सर्वांना धारण करणारा. शेषरूपाने पृथ्वीचे धारण करतो म्हणून.

४४) **विधाता** – प्रेरणा देणारा, निर्माण करणारा. कर्म व कर्माची फले उत्पन्न करणारा.

४५) **धातुरुत्तम:** – मूल्यवान् वस्तूंमध्ये श्रेष्ठ. टिकून राहणाऱ्या वस्तूंमध्ये श्रेष्ठ. निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेल्या ब्रह्मदेवापेक्षाहि श्रेष्ठ. धारण करणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ. धातु आणि उत्तम अशी दोन वेगळी नांवे मानल्यास धारण करणारा आणि श्रेष्ठ असा त्याचा अर्थ करता येईल; पण सहस्रसंख्येच्या गणनामध्ये ही दोन्ही नांवे एकत्र मोजण्याची परंपरा आहे.

## अप्रमेयो हृषीकेशः पद्मनाभोऽमरप्रभुः ।
## विश्वकर्मा[५०] मनुस्त्वष्टा स्थविष्ठः स्थविरो ध्रुवः ॥ ६ ॥

४६) **अप्रमेयः** – प्रत्यक्ष, अनुमान वा शब्द इत्यादि कोणत्याहि प्रमाणाने ज्याचे ज्ञान करून घेता येत नाही. किंवा ज्याला मोजता येत नाही.

४७) **हृषीकेशः** – हृषीक म्हणजे इंद्रिय. ज्याची इंद्रियावर सर्व प्रकारची सत्ता चालते, इंद्रिये स्वाधीन होऊन ज्याच्या आज्ञेने वागतात. ज्याच्या किरणामुळें, प्रकाशामुळे ( ज्ञानामुळे ) सर्व जगत् हर्षित होते, प्रसन्न होते.

४८) **पद्मनाभः** – जगत् निर्माण करणारा ब्रह्मदेव ज्यांतून निर्माण झाला ते कमल ( पद्म ) ज्याच्या नाभीच्या ठिकाणी आहे किंवा ज्याच्या नाभीचा आकार ( अर्धविकसित ) कमलासारखा सुंदर आहे.

४९) **अमरप्रभुः** – ज्यांना कधीहि मृत्यु येत नाही अशा देवांचा स्वामी.

५०) **विश्वकर्मा** – सर्व ब्रह्मांड ही ज्याची कृति आहे. किंवा असंख्य प्रकारची विविधता निर्माण करण्याचे सामर्थ्य ज्याच्या ठिकाणी आहे.

५१) **मनुः** – मनन करणे हा ज्याचा स्वभाव आहे. किंवा जो मन्वंतरे निर्माण करणाऱ्या मनूच्या रूपाने अवतार घेतो.

५२) **त्वष्टा** – जो प्रलयाच्या वेळी सर्वांना क्षीण करतो, नष्ट करतो. तासणे, झिजविणे अशा अर्थाच्या त्वक्ष् धातूला तृच् प्रत्यय लागून हा शब्द बनला आहे. त्वष्टा हा देवांचा एक शिल्पीहि आहे. ते ज्याचे रूप आहे.

५३) **स्थविष्ठः** – जो आकाराने अतिशय स्थूल, प्रचंड आहे. विराट असे ज्याचे रूप आहे.

५४) **स्थविरो ध्रुवः** – जो निश्चयाने सर्वांपेक्षा वयाने वडील आहे किंवा जो वयाने सर्वांपेक्षा वृद्ध आणि स्थिर आहे. स्थविर आणि ध्रुव ही दोन वेगळी नांवेहि मानता येतील. पण दोन्ही मिळून एक नाम मानले जाते.

## अग्राह्यः शाश्वतः कृष्णो लोहितक्षः प्रतर्दनः ।
## ६० प्रभूतस्त्रिककुब्धाम पवित्रं मङ्गलं परम् ॥७॥

**५५) अग्राह्यः** – इंद्रियांनी ज्याचे ग्रहण करता येत नाही. ईश्वर हा इंद्रिय-मन-बुद्धीच्या पर आहे असेच आपले शास्त्र सांगत आहे.

''यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह'' असेहि वर्णन उपनिषदांनी केलेले आहे. (तैत्ति. २/९)

**५६) शाश्वतः** – सदासर्वदा अखंडपणे जो अस्तित्वात असतो. टिकून राहतो. जन्मणे, वाढणे, नष्ट होणे इ. विकार ज्याला स्पर्श करीत नाहीत.

**५७) कृष्णः** – ज्याचा वर्ण काळा आहे, लोखंडी नांगराच्या रूपाने जो पृथ्वी नांगरतो. किंवा कृष् शब्द अस्तित्व, सत्ता यांचा, आकर्षित करणे अशा अर्थाचा वाचक असून 'ण' हे पद आनंदाचे द्योतक आहे. म्हणून जो सच्चिदानंदस्वरूप आहे, जो लोकांना आपणाकडे आकृष्ट करून आनंदित करतो.

**५८) लोहिताक्षः** – ज्याचे डोळे वा डोळ्यांचे कोपरे आरक्त (तांबूस) वर्णाचे आहेत.

डोळ्याचे कोपरे लाल असणे हे सौंदर्याचे व आरोग्याचे लक्षण आहे.

**५९) प्रतर्दनः** – प्रलयकाली सर्व प्राणिमात्रांची जो हिंसा करतो; दुष्ट, घातकी अशांचा जो संहार करतो.

**६०) प्रभूतः** – विपुलता, संपन्नता, विशालता, पुष्कळपणा हा ज्याचा स्वभाव आहे. ज्ञान, ऐश्वर्य, सामर्थ्य, कर्तृत्व, उत्साह, धैर्य, संपत्ति इत्यादि सद्गुणांची ज्याचेजवळ विपुलता आहे.

**६१) त्रिककुब्धाम** – त्रि = तीन, ककुभ् = दिशा, धाम = आश्रयस्थान.

ऊर्ध्व, मध्य, अध या तिन्ही दिशांचे वा स्वर्ग, मृत्यू, पाताळाचें जो आश्रयस्थान आहे.

**६२) पवित्रम्** – ज्याच्या स्मरणाने, दर्शनाने वा भक्तीने पवित्रता येते वा जो आपल्या शरणागतांना पवित्र करतो.

**६३) मङ्गलम् परम्** – सर्व प्रकारच्या अशुभांचा नाश करून शुभ, कल्याण वाढविणाऱ्या मंगलकारक शक्तीमध्ये जो सर्वश्रेष्ठ आहे.

## ईशानः प्राणदः प्राणो ज्येष्ठः श्रेष्ठः प्रजापतिः ।
## हिरण्यगर्भो[७०] भूगर्भो माधवो मधुसूदनः ।। ८ ।।

६४) **ईशान :** – जो सर्व विश्वाचे, भूतांचे प्राणिमात्रांचे नियमन करतो. जो सर्वांचा नियंता, शास्ता, मार्गदर्शक आहे.

६५) **प्राणदः** – भूतमात्राचें ठिकाणीं जीवन उत्पन्न करणारा, चेतना उत्पन्न करणारा, हालचाल करविणारा किंवा कालरूपानें प्राणाचे सातत्य खंडित करणारा. किंवा प्राणाचें ठिकाणीं स्फूर्ति वा शुद्धता निर्माण करणारा.

६६) **प्राणः** – जो मुख्य प्राणस्वरूप आहे. जो प्राणाचे ठिकाणीहि चेतानारूपाने राहतो. किंवा प्राण, जीवन, चेतना हेच ज्याचे स्वरूप आहे.

६७) **ज्येष्ठः** – जो सर्वांपेक्षा वयाने अधिक आहे, वृद्ध आहे, वा जो सर्वांचे कारण आहे.

६८) **श्रेष्ठः** – जो सर्वात अधिक प्रशंसनीय आहे; ज्याची योग्यता सर्वदृष्टीने कोणाहिपेक्षा, कशाहिपेक्षा, केव्हांहि अधिक आहे.

६९) **प्रजापतिः** – सर्व प्रजांचे, लोकांचे जो पालनपोषण, रक्षण करतो.

७०) **हिरण्यगर्भः** – विश्वाच्या आरंभापूर्वी सोन्याप्रमाणे प्रकाशित असणाऱ्या अंडाकृति अवकाशाला व्यापून असणारा, जो सृष्टी निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाच्या रूपाने प्रगट झाला.

७१) **भूगर्भः** – पृथ्वी ज्याच्या उदरात समाविष्ट आहे वा पृथ्वीच्या अंतरंगात ज्याचे अस्तित्व आहे.

७२) **माधवः** – मा = लक्ष्मी, – धव = पति. लक्ष्मीचा पति. किंवा उपनिषदांतून सांगितलेल्या मधुविद्येच्या द्वारा ज्याचे ज्ञान होते. किंवा मौन, ध्यान व योग ही ज्याच्या साक्षात्काराची साधने आहेत.

७३) **मधुसूदनः** – मधु नांवाच्या दैत्याला ज्याने ठार मारले.

## ईश्वरो विक्रमी धन्वी मेधावी विक्रमः क्रमः ।
## अनुत्तमो[८०] दुराधर्षः कृतज्ञः कृतिरात्मवान् ।। ९ ।।

**७४) ईश्वर:** – ईश् = सत्ता गाजविणे, समर्थ असणे. ज्याची सर्ववस्तुमात्रावर सत्ता चालते किंवा जो सर्वप्रकारच्या सामर्थ्याने युक्त आहे.

**७५) विक्रमी** – पराक्रमी, शौर्ययुक्त.

**७६) धन्वी** – धनुष्य धारण करणारा.

**७७) मेधावी** – मेधा म्हणजे उत्कृष्ट स्मरणशक्ति असलेली बुद्धि. ती ज्याच्याजवळ आहे.

**७८) विक्रम:** – पराक्रम हेच ज्याचे रूप आहे. ज्याने जगताचे उल्लंघन केले आहे किंवा वि म्हणजे पक्षी, गरुड. गरुडावर बसून जो क्रमण म्हणजे संचार करतो असा.

**७९) क्रम:** – ओलांडणे, धांवणे, गतिमान् असणे हा ज्याचा स्वभाव आहे.

**८०) अनुत्तम:** – ज्याच्यापेक्षा अधिक उत्तम असा दुसरा कोणी नाही.

**८१) दुराधर्ष:** – ज्याचे धर्षण करणे, नियमन करणे शक्य नाही. ज्याला दडपून टाकता येत नाही, ज्याला त्याच्या इच्छेविरुद्ध एखादी कृति करण्यास भाग पाडता येत नाही.

**८२) कृतज्ञ:** – केलेले लक्षात ठेवणारा, प्राण्यांच्या पापपुण्यात्मक कर्माचे ज्ञान असलेला. स्वत:साठी कुणी थोडे जरी केले तरी ते लक्षात ठेवून त्याप्रमाणे वागणारा. या गुणामुळेच भगवान् भक्तीने अर्पण केलेल्या पानफुलांनीहि संतुष्ट होतो.

**८३) कृति:** – कृति = कर्म, क्रिया, कोणत्याहि स्वरूपाची हालचाल, हेच ज्याचे स्वरूप आहे. भगवान् सर्वात्मक, सर्वव्यापक व चित्–मात्र असल्यामुळे प्राण्यांच्या हालचालीचे अधिष्ठान तोच असल्याने त्याला हे नांव प्राप्त झाले आहे.

**८४) आत्मवान्** – स्वत:च्या महिम्यामध्ये स्थिर असणारा, श्रेष्ठत्व, ऐश्वर्य, दिव्यता, भव्यता, व्यापकता, उदात्तता हेच ज्याचे स्वरूप आहे. किंवा मन, बुद्धि, अहंकार यावर ज्याचे नियंत्रण आहे.

## सुरेशः शरणं शर्म विश्वरेताः प्रजाभवः ।
## अहः [९०]संवत्सरो व्यालः प्रत्ययः सर्वदर्शनः ॥१०॥

८५) **सुरेशः** – शुभ देतात, चांगले करतात ते सुर, देव. त्यांचा ईश; देवामध्येहि श्रेष्ठ. देवांचा राजा.

८६) **शरणम्** – सर्वांचे आश्रयस्थान असलेला. दुःखितांचे दुःख दूर करणारा.

८७) **शर्म** – सुखरूप, परमानंदरूप.

८८) **विश्वरेताः** – विश्वाचे कारण असलेला, विश्वाचे उत्पत्तिस्थान.

८९) **प्रजाभवः** – सर्व निर्माण होणारे प्राणिमात्र, प्रजा ज्याच्यापासून उत्पन्न होतात.

९०) **अहः** – दिवस. प्रकाशयुक्त, प्रकाशरूप.

९१) **संवत्सर :** – वर्ष. ईश्वर कालस्वरूप आहे आणि कालगणना करण्याचे वर्ष, संवत्सर हे एक साधन आहे.

९२) **व्यालः** – व्याल = सर्प. सर्पाप्रमाणे पकडण्यास कठिण. ज्याला प्राप्त करून घेणे दुष्कर आहे असा; वाघ.

९३) **प्रत्ययः** – ज्याच्यामुळे वस्तूची वा भावाची उपयुक्तता वाढते, कार्यवाहीत येऊं शकते, वा जो अनुभवसंपन्न आहे. प्रज्ञेने युक्त आहे वा प्रज्ञास्वरूप आहे. (प्रज्ञा–सत्य वा वास्तव ज्ञान असलेली बुद्धि वा नवनिर्माणक्षम प्रतिभा.)

९४) **सर्वदर्शनः** – ज्याला सगळे कांही दिसते. ज्याला सगळीकडे डोळे आहेत.

## अजः सर्वेश्वरः सिद्धः सिद्धिः सर्वादिरच्युतः[१००] ।
## वृषाकपिरमेयात्मा सर्वयोगविनिःसृतः ॥ ११ ॥

९५) **अजः** – जो जन्मास येत नाही म्हणजेच नसलेला उत्पन्न होत नाही. तर सर्वदा असतोच.

९६) **सर्वेश्वर:** – सर्वांच्यावर सत्ता चालविणारा, सर्वांना स्वत:च्या स्वाधीन ठेवणारा, सर्वांचे नियमन करणारा.

९७) **सिद्धः** – ज्याला घडवावा लागत नाही, कुणीहि घडविल्यावाचून जो स्वभावत:च अस्तित्वात असतो. निष्पन्न करणे, बनविणे, याची ज्याच्यासाठी आवश्यकता नसते. जो नित्य सिद्ध आहे.

९८) **सिद्धि:** – जो सर्व वस्तूंच्या ठिकाणी संविद् म्हणजे ज्ञानरूपाने राहतो. वा जो सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. जो फलस्वरूप आहे. म्हणजे प्राप्त करून घेण्यास, मिळविण्यास एकमेव, उचित, योग्य असा आहे.

९९) **सर्वादि:** – सर्व भूतांच्या आरंभी, आधी असलेला.

१००) **अच्युत:** – स्वत:चे सामर्थ्य, स्वरूप, सौंदर्य, पराक्रम, श्रेष्ठत्व इत्यादिपासून जो कधीहि च्युत होत नाही, ढळत नाही. घसरत नाही. खाली येत नाही, भ्रष्ट होत नाही.

१०१) **वृषाकपि:** – सर्व कामनांचा वर्षाव करणारा, इच्छा पूर्ण करणारा जो धर्म त्याला वृष असे म्हणतात. क म्हणजे जल. त्यातून पृथ्वीचा उद्धार केला म्हणून वराहस्वरूपी भगवंताला कपि असे म्हणतात. दोन्ही गोष्टी एकत्र घेऊन महर्षि कश्यपांनी भगवंताला वृषाकपि असे नांव दिले.

१०२) **अमेयात्मा** – ज्याचे स्वरूप (आत्मा) मोजमापाच्या पलीकडचे आहे. जो कशानेहि मर्यादित होत नाही.

१०३) **सर्वयोगविनि:सृत:** – सर्व संबंधांपासून दूर असलेला किंवा अनेक प्रकारच्या योगाने म्हणजे मार्गांनी, साधनांनी जो जाणला जाऊं शकतो.

## वसुर्वसुमना: सत्य: समात्मा संमित: सम: ।
## अमोघ: [११०]पुण्डरीकाक्षो वृषकर्मा वृषाकृति: ।।१२।।

१०४) **वसुः** – सर्व भूते ज्याच्या ठिकाणी राहतात वा जो सर्व भूतांच्या ठिकाणी राहतो. जो संपत्तिस्वरूप आहे.

१०५) **वसुमना:** – वसु म्हणजे संपत्ति, ऐश्वर्य, प्रशस्तता. ज्याचे मन ऐश्वर्यशाली, प्रसन्न आहे म्हणजे कामक्रोधादि विकार वा कृपणता, निष्ठुरता असे दोष ज्याच्या मनाला स्पर्श करीत नाहीत.

**१०६) सत्य:** – जो सत्यस्वरूप आहे, असत्याचा, खोटेपणाचा, मिथ्यात्वाचा, अभावाचा स्पर्शहि ज्यास होऊं शकत नाही. किंवा सत् म्हणजे मूर्त. त्यत् म्हणजे अमूर्त. ही दोन्हीही ज्याची रूपे आहेत. किंवा सत् म्हणजे प्राण, त् म्हणजे अन्न आणि य म्हणजे सूर्य. जो प्राण, अन्न, सूर्य यांच्या स्वरूपात असतो. किंवा सज्जनांशी जो चांगल्या प्रकारांनी वागतो.

**१०७) समात्मा** – ज्याचा आत्मा म्हणजे मन सर्वांशी सारखे म्हणजे रागद्वेषादिविरहित असते. किंवा सर्वांच्या ठिकाणी असलेला जो एकरूप आत्मा आहे.

**१०८) संमित:** – जो समस्त पदार्थांच्या साह्याने (त्यानीच मर्यादित झाल्याने) ओळखता येऊं शकतो.

**असंमित :** – असा पाठ घेतल्यास जो सर्व पदार्थांनीहि परिच्छिन्न परिमित – मर्यादित होऊं शकत नाही असा.

**१०९) सम:** – सर्वकाळी, सर्वदेशी सारखेपणाने असलेला, केव्हांहि, कुठेहि, कोणत्याहि विकारांनी युक्त न होणारा. किंवा मा म्हणजे लक्ष्मी तिच्यासहित असलेला.

**११०) अमोघ:** – ज्याचे पूजन, स्तवन, स्मरण इत्यादि केले असता ते कधीहि वाया जात नाही. सर्वदा लाभदायकच होते. किंवा ज्याचे संकल्प सत्यच ठरतात.

**१११) पुण्डरीकाक्ष :** – हृदयरूपी पुण्डरीकामध्ये म्हणजे कमलामध्ये उपलब्ध होणारा. किंवा कमलाप्रमाणे ज्याचे नेत्र आहेत असा.

**११२) वृषकर्मा** – ज्याची सर्व कर्मे, कृत्यें, धर्मस्वरूप असतात.

**११३) वृषाकृति:** – ज्याने धर्मासाठीच आकृति म्हणजे अवतार धारण केला आहे.

## रुद्रो बहुशिरा बभ्रुर्विश्वयोनि: शुचिश्रवा: ।
१२०
## अमृत: शाश्वत: स्थाणुर्वरारोहो महातपा: ।।१३।।

**११४) रुद्र:** – प्रलयकाळीं सर्व जगताचा संहार करतेवेळीं

सर्वांना रडवितो. किंवा 'रु' म्हणजे वाणी. जो वाणी देतो, बोलवितो. किंवा जो 'रु' म्हणजे दु:ख वितळवितो. किंवा जो स्वत:च रणांगणावर मोठ्याने गर्जना करतो.

११५) **बहुशिरा** – ज्याला पुष्कल शिरे आहेत (मस्तके आहेत)

११६) **बभ्रु:** – लोकांचे भरण पोषण करणारा.

११७) **विश्वयोनि:** – जो सर्व विश्वाचें उत्पत्तिस्थान आहे.

११८) **शुचिश्रवा:** – ज्याची श्रव म्हणजे नांवे किंवा कीर्ति ही अत्यंत पवित्र आहेत असा.

११९) **अमृत:** – जो कधीहि मृत्यू पावत नाही.

१२०) **शाश्वत: स्थाणु:** – शाश्वत म्हणजे तिन्ही काळी स्थिर स्वरूपात टिकून राहणारा. स्थाणू म्हणजे खांब. सर्व विश्वाला, लोकांना जो स्थिर स्वरूपाचा आधार आहे.

१२१) **वरारोह:** – ज्याचा अंकभाग म्हणजे मांड्या सुंदर, श्रेष्ठ आहेत असा. किंवा ज्याची प्राप्ति करून घेणे, ज्याच्याशी एकरूप होणे हे पुन्हा परत येणे भाग नसल्याने श्रेष्ठ आहे.

१२२) **महातपा:** – ज्याचे तप म्हणजे सृष्टिविषयक ज्ञान, प्रताप, ऐश्वर्य, श्रम करण्याची शक्ति ही अत्यंत मोठी आहेत.

## सर्वग: सर्वविद्भानुर्विष्वक्सेनो जनार्दन: ।
## वेदो वेदविदव्यङ्गो वेदाङ्गो[१३०] वेदवित् कवि: ।।१४।।

१२३) **सर्वग:** – ज्याचा संचार सगळीकडे आहे. वा कारणरूपाने जो सर्वव्यापक आहे.

१२४) **सर्वविद्भानु:** – सर्वविद् म्हणजे सर्व जाणणारा वा सर्व मिळविणारा. भानु म्हणजे प्रकाश करणारा. जो सर्व जाणतो आणि प्रकाशतो तो.

१२५) **विष्वक्सेन:** – ज्याला पाहताच दैत्यांच्या वा शत्रूंच्या सेना घाबरून इतस्तत: पळून जातात.

१२६) **जनार्दन:** – जो जनांचा, दुर्जनांचा नाश करतो वा

दुष्टांना जो अधोगतीला नेतो. किंवा जन म्हणजे भक्तजन ज्याच्याजवळ इहलोक, परलोकसुखाची याचना करतात.

**१२७) वेदः –** जो वेदरूप, ज्ञानरूप आहे. वा जो ज्ञान प्राप्त करून देतो.

**१२८) वेदविद्** – ज्याला सर्व वेदांच्या अर्थाचें यथावत् ज्ञान आहे. जो सर्व वेदांना जाणतो.

**१२९) अव्यङ्गः** – ज्याचे ठिकाणी कोणतेहि व्यंग = अपुरेपणा, दोष नाहीत असा. किंवा जो व्यक्त होत नाही, प्रकट होत नाही.

**१३०) वेदाङ्गः** – वेद हे ज्याच्या अंगभूत आहेत.

**१३१) वेदविद्** – जो वेदांसंबंधी विचार करतो.

**१३२) कविः** – जो सर्व कांही अंतर्बाह्य पाहू शकतो वा वेदांसारखी सर्वश्रेष्ठ शब्दरचना ज्याच्या सहज निश्वासावाटे प्रगट झाली असा.

## लोकाध्यक्षः सुराध्यक्षो धर्माध्यक्षः कृताकृतः ।
## चतुरात्मा चतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुजः[१४०] ॥ १५ ॥

**१३३) लोकाध्यक्षः** – जो सर्व लोकांचे निरीक्षण करतो. श्रेष्ठ स्थानीं राहून त्यांचे निरीक्षण करतो.

**१३४) सुराध्यक्षः** – देवांचा अध्यक्ष

**१३५) धर्माध्यक्षः** – अनुरूप फल देण्यासाठी जो धर्म आणि अधर्म यांचे स्वतः निरीक्षण करतो.

**१३६) कृताकृतः** – कृत म्हणजे कार्यरूप. अकृत म्हणजे कारणरूप. जो स्वतःच कार्यकारणभावाने असतो.

**१३७) चतुरात्मा** – जो प्रगट होण्याचे वेळीं चार प्रकारांनी व्यक्त होतो.

हे चार प्रकार अनेक पद्धतींनी मोजले जातात उदा :- जरायुज, अंडज, स्वेदज, उद्भिज्ज अशा चार जीवकोटी, स्थावर-जंगम-स्थूल आणि सूक्ष्म अशा चार वस्तुकोटी, खाली-वर-मधे-कडेला अशा चार दिक्, कोटी किंवा ब्रह्मा, प्रजापति, काल आणि सर्व जीव इत्यादि.

**१३८) चतुर्व्यूहः** – जो चार प्रकारचे व्यूह (रचनाविशेष,

स्वरूपविशेष) धारण करतो. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध किंवा प्रकृति, अहंकार, बुद्धि आणि मन यांना व्यूह म्हटले जाते. असे आणखीहि प्रकार कल्पिले जातात.

१३९) **चतुर्दंष्ट्र:** – ज्याला चार दाढा आहेत असा (नृसिंहरूपात), वा ज्याला चार शिंगे आहेत (अग्निरूपात).

१४०) **चतुर्भुज:** – ज्याला चार हात आहेत.

**भ्राजिष्णुर्भोजनं भोक्ता सहिष्णुर्जगदादिज: ।**
**अनघो विजयो जेता विश्वयोनि: पुनर्वसु:[१५०] ।।१६ ।।**

१४१) **भ्राजिष्णु:** – प्रकाशरूप, तेजस्वी.

१४२) **भोजनम्** – भोज्य उपभोगण्याच्या क्रियेला भोजन म्हणतात. कर्ताकरविता ईश्वरच असल्याने त्यास भोजन हे नांव प्राप्त झाले आहे. किंवा भोज्यरूप असल्यामुळें प्रकृति वा माया हिलाहि भोजन म्हणतात. माया वा प्रकृति ही तत्वत: परब्रह्माहून पृथक नसल्याने परब्रह्मरूप विष्णूलाहि भोजन हे नांव प्राप्त झाले आहे.

१४३) **भोक्ता** – पुरुषरूपाने जो सर्वांचा उपभोग घेतो.

१४४) **सहिष्णु:** – सर्व कांही ज्याला सोसते, मानवते. कशाहीमुळे ज्याला चंचलता येत नाही.

१४५) **जगदादिज:** – हिरण्यगर्भरूपाने जो जगताच्या आधी प्रगट झाला.

१४६) **अनघ:** – अघ म्हणजे पाप. ते ज्याच्याजवळ नाही असा, निष्पाप.

१४७) **विजय:** – ज्याचा सर्वदा जयच होतो. पराभव ज्याला कधी माहीतच नाही.

१४८) **जेता** – जिंकणारा, आपल्या सामर्थ्याने ज्ञान, ऐश्वर्य इत्यादि गुणांनी जो सर्वांना जिंकतो.

१४९) **विश्वयोनि:** – विश्व हे कार्य व त्याचे उत्पत्तिस्थान म्हणजे कारण जो स्वत:च आहे. जो विश्वाचे उत्पत्तिस्थान आहे.

१५०) **पुनर्वसु:** – जीवरूपाने पुन्हां पुन्हां शरीर धारण करणारा.

किंवा वरचेवर म्हणजे सतत ऐश्वर्याने युक्त असलेला.

## उपेन्द्रो वामनः प्रांशुरमोघः शुचिरूर्जितः ।
## अतीन्द्रःसंग्रहःसर्गो धृतात्मा[१६०] नियमो यमः ।।१७।।

**१५१) उपेन्द्रः** – इंद्राच्या पाठीमागून धाकटा भाऊ म्हणून अदितीच्या पोटी ज्याने जन्म घेतला. किंवा इंद्रापेक्षाहि श्रेष्ठ, इंद्रापेक्षाहि वर ज्याचे स्थान आहे.

**१५२) वामन :** – बलीच्या यज्ञात ठेंगण्या आकृतीच्या बटुरूपाने तीन पावले भूमी मागण्यासाठी जो आला त्यावेळच्या त्याच्या ठेंगण्या बांध्यामुळे हे नांव प्राप्त झाले.

**१५३) प्रांशुः** – उंच. बलियज्ञाचें वेळीं तीन पावले भूमि मोजतांना विराट्रूप धारण केल्यामुळे जो अत्यंत उंच झाला व सूर्यचंद्र त्याच्या गुडघ्याला लागू लागले.

**१५४) अमोघ :** – ज्याची कोणतीही कृति वा हालचाल व्यर्थ नसते.

**१५५) शुचिः** – जो अत्यंत पवित्र आहे. वा ज्याच्या स्मरणदर्शनस्पर्शनानेहि पवित्रता येते.

**१५६) ऊर्जितः** – सर्वदा सामर्थ्य, बल, ऐश्वर्य, उन्नति यांनी युक्त असलेला. वा बलादि गुण ज्याचे ठिकाणीं अतिशय अधिक प्रमाणात आहेत असा.

**१५७) अतीन्द्र :** – इंद्रापेक्षाहि वरचढ असलेला. ज्ञान, सामर्थ्य, ऐश्वर्य इत्यादि गुणांनी जो इंद्रापेक्षाहि श्रेष्ठ ठरतो असा.

**१५८) संग्रह :** – सर्वांचा संग्रह करणारा, प्रलयकाळीं सर्व विश्व ज्याचेजवळ आपला विस्तार सोडून गोळा होते असा.

**१५९) सर्ग :** – सृज् = निर्माण करण्यास योग्य असे जे जगत् त्याच्या रूपाने नटणारा वा जगाच्या उत्पत्तीला कारणीभूत असलेला.

**१६०) धृतात्मा** – ज्याने स्वत:ला जन्मादि सहा विकारांपासून वेगळे राखले आहे. स्वत:च्या एकरूपतेत पालट घडू दिला नाही असा.

**१६१) नियमः** – सर्व जगताला त्यांच्या त्यांच्या अधिकारानुरूप

जो वळण लावतो. वागण्याच्या पद्धती सांगतो वा नियंत्रण करतो. वा शौच, संतोष, तप:, स्वाध्याय, ईश्वर, प्रणिधान हे योगशास्त्रातील नियम ज्याचे स्वरूप आहे असा.

**१६२) यम:** – अंत:करणामध्यें राहून वृत्तींचे नियमन करणारा. किंवा योगशास्त्रामध्यें उल्लेखिलेले अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह हे जे गुण ते ज्याचे स्वरूप आहे, वा जो प्रलयकाळी सर्वांच्या संहाराला कारण असा मृत्युरूप होतो.

## वेद्यो वैद्य: सदायोगी वीरहा माधवो मधु: ।
## अतीन्द्रियो महामायो[१७०] महोत्साहो महाबल: ।।१८।।

**१६३) वेद्य:** – जाणून घेण्यास योग्य, कल्याणाची इच्छा असलेले भक्त ज्याला जाणून घेण्यास उचित समजतात.

**१६४) वैद्य:** – सर्व कांही जाणणारा. विद्या, शास्त्रे, कला यांचा ज्ञाता. चिकित्सक.

**१६५) सदायोगी** – सर्वदा प्रत्यक्षरूपाने प्रगट असलेला. सर्वांशी सातत्याने जोडला गेलेला. ज्याच्यापासून वेगळे होणे सर्वथा अशक्य आहे असा. जो सतत योगयुक्त असतो.

**१६६) वीरहा** – धर्मरक्षणासाठी रणांगणावर प्रतिपक्षी वीरांचा संहार करणारा.

**१६७) माधव:** – मा म्हणजे विद्या किंवा लक्ष्मी, तिचा पति.

**१६८) मधु:** – मध ज्याप्रमाणे सगळ्यांना प्रिय असतो त्याप्रमाणे प्रिय असणारा. किंवा उपनिषदांत सांगितलेली मधुविद्या ही ज्याचे स्वरूप आहे वा ती मधुविद्या ज्याच्या प्राप्तीचे साधन आहे.

**१६९) अतीन्द्रिय:** – शब्द, स्पर्श इत्यादि भौतिकगुणांनी विरहित असल्यामुळे जो इंद्रियांना विषय होऊं शकत नाही. जो इंद्रियांच्या सामर्थ्याच्या पलीकडे आहे.

**१७०) महामाय:** – मायावी लोकांवरहि आपल्या मायेचा पगडा बसविणारा, वा ज्याची माया महान् म्हणजे विलक्षण सामर्थ्याने युक्त आहे असा.

**१७१) महोत्साहः** – ज्याचा उत्साह फार मोठा आहे. विश्वाची उत्पत्ति-स्थिति-लय करण्यामध्ये जो सतत तत्पर आहे. कंटाळा नांवाची वस्तु ज्याच्या गांवीहि नाही.

**१७२) महाबलः** – बलवन्ताहूनहि ज्याचे बल अधिक आहे असा. ज्याच्यापेक्षा अधिक बलवान कुणीहि नाही.

## महाबुद्धिर्महावीर्यो महाशक्तिर्महाद्युतिः ।
## अनिर्देश्यवपुःश्रीमानमेयात्मा महाद्रिधृक्[१८०] ।।१९ ।।

**१७३) महाबुद्धिः** – ज्याच्यापेक्षा अधिक बुद्धिमान कुणीहि नाही असा, बुद्धिमंताहूनहि बुद्धिमान.

**१७४) महावीर्यः** – ज्याचा पराक्रम सर्वश्रेष्ठ आहे.

**१७५) महाशक्तिः** – अत्यंत श्रेष्ठ शक्तीने युक्त.

**१७६) महाद्युतिः** – अत्यंत तेजस्वी.

**१७७) अनिर्देश्यवपुः** – अमुक एका प्रकारचा आहे असे ज्याचे वर्णन करता येत नाही. भगवान् स्वसंवेद्य असल्याने म्हणजे स्वतःला स्वतःच जाणून घेण्यास समर्थ असल्याने तो कसा आहे हे दुसऱ्या कोणाला समजत नाही म्हणून सांगता येत नाही.

**१७८) श्रीमान्** – संपूर्ण ऐश्वर्याने युक्त.

**१७९) अमेयात्मा** – ज्याच्या स्वरूपाचे अनुमान करता येत नाही.

**१८०) महाद्रिधृक्** – ज्याने समुद्रमंथनाच्या वेळीं कूर्मावतार धारण करून मंदार पर्वत आपल्या पाठीवर धारण केला होता. वा कृष्णावतारी गोकुळात गोवर्धन पर्वत उचलून धरला होता असा, मोठ्या पर्वतांना धारण करणारा.

## महेष्वासो महीभर्ता श्रीनिवासः सतां गतिः ।
## अनिरुद्धः सुरानन्दो गोविन्दो गोविदां पतिः ।।२० ।।

**१८१) महेष्वासः** – ज्याचे धनुष्य प्रचंड आहे.

**१८२) महीभर्ता** – पृथ्वीचे भरणपोषण करणारा.

**१८३) श्रीनिवास :** – लक्ष्मी वा ऐश्वर्य ज्याचे ठिकाणीं सदैव राहते.

**१८४) सतां गतिः** – सत्पुरुषांना, सज्जनांना मार्गदर्शन करणारा. वा ज्याच्यापर्यंत जाऊन पोंचण्याची सज्जनांना उत्कंठा असते असा.

**१८५) अनिरुद्ध :** – ज्याला कोणीहि विरोध करूं शकत नाही. ज्याला कोणी अडवू शकत नाही.

**१८६) सुरानन्द :** – देवांना आनंद देणारा.

**१८७) गोविन्द :** – पृथ्वी प्राप्त करून घेणारा. किंवा गाई पाळणारा वा गाईंचे रक्षण करणारा वा श्रेष्ठ अशा वेदस्वरूप वाणींनी युक्त किंवा इंद्रियांच्यावर स्वामित्व असलेला.

**१८८) गोविदां पतिः** – उत्कृष्ट वाणी ज्यांना प्राप्त झाली आहे, त्यांचाही स्वामी.

## मरीचिर्दमनो[१९०] हंसः सुपर्णो भुजगोत्तमः ।
## हिरण्यनाभः सुतपाः पद्मनाभः प्रजापतिः ।।२१ ।।

**१८९) मरीचि :** – किरणरूप, प्रकाशरूप, तेजस्वी.

**१९०) दमनः** – आपल्या सन्मार्गापासून भ्रष्ट होणाऱ्या, अपराध करणाऱ्या व्यक्तींचे दमन करणारा.

**१९१) हंसः** – हंसरूपाने अवतार धारण करणारा. या अवतारात भगवंताने सनकादिकांना तत्त्वज्ञानाचा उपदेश केला.

**१९२) सुपर्ण :** – सुंदर पंखांनी युक्त. प्रवृत्ति-निवृत्ति या दोन पंखांनी युक्त असलेला धर्म ज्याचे स्वरूप आहे. किंवा गीतेच्या विभूतियोगात सांगितल्याप्रमाणे सुपर्ण म्हणजे गरुड हेंच ज्याचे स्वरूप आहे.

**१९३) भुजगोत्तम :** – सर्पांमध्ये श्रेष्ठ. अनंत, शेष

**१९४) हिरण्यनाभ :** – सुवर्णाप्रमाणे मंगल नाभी असलेला, किंवा ज्याच्या नाभीचा आकार सुंदर आहे असा.

**१९५) सुतपा :** – नरनारायणरूपाने बद्रिकाश्रमी ज्याने उत्कृष्ट तप केले. इंद्रिय व मन यांच्या एकाग्रतेला श्रेष्ठ तप म्हणत असल्याने (मनसश्चेन्द्रियाणांच ह्यैकाग्र्‍यम् परमं तपः – श्रीशंकराचार्य भाष्य) व

विभूतियोगाप्रमाणे मन हे भगवंताचे रूप असल्याने एकाग्र मनाने युक्त असाहि अर्थ करता येईल.

१९६) **पद्मनाभः** – ज्याच्या नाभीमध्यें कमल आहे, वा ज्याची नाभी कमलाप्रमाणे सुंदर आहे, वा सर्वांच्या हृदयकमलांच्या मध्यभागी जो राहतो.

१९७) **प्रजापतिः** – प्रजांचे पालन करणारा.

## अमृत्युः सर्वदृक् सिंहः [२००]संधाता संधिमान् स्थिरः ।<br>अजो दुर्मर्षणः शास्ता विश्रुतात्मा सुरारिहा ॥२२॥

१९८) **अमृत्युः** – मृत्यू ज्याच्या ठिकाणी संभवत नाही.

१९९) **सर्वदृक्** – सर्व प्राणिजातांची सर्वच्या सर्व कृत्ये ज्याला स्वभावतःच दिसतात.

२००) **सिंहः** – प्रलयकाळीं जो सर्वांची हिंसा करतो. किंवा सिंहाप्रमाणे पराक्रमी.

२०१) **संधाता** – व्यक्तींशी त्याच्या कर्मफलाची जो गाठ घालून देतो.

२०२) **संधिमान्** – फलांच्या उपभोगाने जो युक्त आहे, जो स्वतःच फलांचा भोक्ता आहे. सामंजस्य राखणारा.

२०३) **स्थिरः** – जो सदा एकरूपच असतो. ज्याच्या स्वरूपात फेरपालट होत नाही. जो सर्वदा जसाच्या तसाच राहतो.

२०४) **अजः** – जो गमन करणारा आहे. म्हणजे जो भक्तांच्याकडे आपणहून येतो. वा जो फेकणारा आहे. म्हणजे जो दुर्जनांना आपणापासून दूर टाकतो.

२०५) **दुर्मर्षणः** – ज्याला सहन करणे कठीण आहे. ज्याचे स्वरूप, सामर्थ्य, सत्ता, दुर्जनांना न सोसण्याइतकी प्रभावी आहे.

२०६) **शास्ता** – वेद, स्मृति, शास्त्राच्या साहाय्याने सर्वांचे अनुशासन करणारा. सर्वांच्या वर्तनाचे नियंत्रण करणारा.

२०७) **विश्रुतात्मा** – ज्याचे सत्य, ज्ञान, अनंतत्व, आनंदमयत्व इत्यादि स्वरूप विशेष रीतीने श्रवण केले जाते. म्हणजे ज्याच्या

स्वरूपाचे ज्ञान व्हावे यासाठी लोक उत्कंठेने प्रयत्नशील असतात.

२०८) **सुरारिहा** – देवांच्या शत्रूंचा नि:पात करणारा.

## गुरुर्गुरुतमो[२१०] धाम सत्य: सत्यपराक्रम: ।
## निमिषोऽनिमिष: स्त्रग्वी वाचस्पतिरुदारधी: ।।२३ ।।

२०९) **गुरु:** – सर्व विद्यांचा जो उपदेशक आहे, सर्व विद्यांचे ज्ञान जो जीवांना देतो. श्रेष्ठ.

२१०) **गुरुतम:** – जो ब्रह्मदेवादि ज्ञानसंपन्नांच्यापेक्षाहि श्रेष्ठ आहे वा जो विद्यावंतांनाहि विद्या शिकवितो.

२११) **धाम** – धाम म्हणजे ज्योती किंवा आश्रयस्थान. परमेश्वर नारायण हा ज्योतिस्वरूप आहे किंवा सर्वांच्या सर्व प्रकारच्या इच्छांचे वा कामनांचे जो आश्रयस्थान आहे.

२१२) **सत्य:** – सत्यभाषण, सत्यवर्तन, सत्यस्वरूप हा ज्याचा सहजधर्म आहे.

२१३) **सत्यपराक्रम:** – ज्याचा पराक्रम कधीहि व्यर्थ जात नाही. किंवा जो सत्याच्या म्हणजे न्यायाच्या, चांगल्याच्या, कल्याणाच्या स्थापनेसाठीच पराक्रम करतो.

२१४) **निमिष:** – योगनिद्रेमध्ये गढून गेल्यामुळे ज्याचे डोळे मिटलेले आहेत.

२१५) **अनिमिष:** – जो सर्वदा जागरूक असतो. जो कधीही डोळे मिटत नाही.

२१६) **स्त्रग्वी** – गळ्यामध्ये माळ, हार धारण करणारा. विष्णूच्या गळ्यातील वैजयंतीमाला प्रसिद्धच आहे. ही माला भूतांची जी तन्मात्रा या नांवाने ओळखली जाणारी शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशी तन्मात्र स्वरूपें, त्याचे प्रतीक म्हणून मानली जाते.

२१७) **वाचस्पति: उदारधी:** – जो वाणीचा व विद्येचा पति आहे. ज्याची बुद्धि सर्व विषयांचे यथार्थ रूप जाणून घेण्याइतकी उदार म्हणजे विशाल आहे. ही दोन्ही पदे मिळून एक नांव मानले जाते. विशाल बुद्धि असल्यामुळे जो वाणीवर वा विद्येवर आपले प्रभुत्व सहजपणे

प्रस्थापित करू शकतो असा दोन्ही नांवांचा संबंध जोडून एक नांव कल्पिता येईल.

## अग्रणीर्ग्रामणी: श्रीमान्[२२०] न्यायो नेता समीरण: । सहस्त्रमूर्धा विश्वात्मा सहस्त्राक्ष: सहस्त्रपात् ।। २४ ।।

२१८) **अग्रणी:** – जीवांना योग्य ठिकाणी घेऊन जाणारा पुढारी.

२१९) **ग्रामणी:** – समुदायांचे पुढारीपण करणारा. किंवा गांवातील प्रमुख.

२२०) **श्रीमान्** – कांतीने युक्त. तेजस्वी. ऐश्वर्यशाली किंवा सौंदर्यशाली. लोकप्रिय, लोकमान्य.

२२१) **न्याय:** – ज्या तर्काच्या साह्याने प्रमाणांचे ज्ञान योग्य प्रकारे होते त्याला न्याय असे म्हणतात. तो न्याय त्याचे स्वरूप आहे. किंवा जो कधीहि अन्यायाने वागत नाही, कोणालाहि अन्याय करू देत नाही.

२२२) **नेता** – नेतृत्व करणारा, पुढारी. विश्वरूपी प्रचंड यंत्राला चालविणारा. योग्य ठिकाणी जाण्यासाठी मार्गदर्शन करणारा.

२२३) **समीरण:** – वायुरूपाने जो सर्वत्र राहतो. किंवा योग्य प्रकारची प्रेरणा देणारा.

२२४) **सहस्त्रमूर्धा** – ज्याला हजार शिरे आहेत असा.

२२५) **विश्वात्मा** – जो विश्वाचा आत्मा आहे. किंवा जो विश्वरूपाने नटला आहे.

२२६) **सहस्त्राक्ष:** – ज्याला हजार डोळे आहेत. किंवा ज्याला हजारोंच्या संख्येत इंद्रिये आहेत.

२२७) **सहस्त्रपाद्** – ज्याला हजारो पाय आहेत.

## आवर्तनो निवृत्तात्मा संवृत:[२३०] संप्रमर्दन: । अहस्संवर्तको वह्निरनिलो धरणीधर : ।।२५।।

२२८) **आवर्तन:** – संसारचक्राला फिरविणारा.

२२९) **निवृत्तात्मा** – जो सर्व प्रकारच्या बंधनापासून वा उपाधीपासून अलिप्त आहे.

२३०) **संवृतः** – जो अविद्येने वा मायेने झांकला गेलेला आहे.

२३१) **संप्रमर्दनः** – जो रुद्र वा काल या रूपांनी सर्वांचे मर्दन करतो. सर्वांना ठेचणारा, कुचलणारा.

२३२) **अहस्संवर्तकः** – दिवसाला प्रेरणा देणारा किंवा सूर्यरूपाने दिवसाच्या उत्पत्तीस कारण होणारा.

२३३) **वह्निः** – अग्नि. हवन केलेली द्रव्ये वाहून नेणारा.

२३४) **अनिलः** – वायु, निवासस्थानरहित, अनादि, ग्रहण करण्यास, घेण्यास कठीण, हालचाल करणारा.

२३५) **धरणीधरः** – पृथ्वी धारण करणारा. भगवंताने शेष, वराह, पर्वत या रूपांनी पृथ्वीचे धारण केलेले आहे.

२४०

## सुप्रसादः प्रसन्नात्मा विश्वधृग्विश्वभुग्विभुः ।
## सत्कर्ता सत्कृतः साधुर्जह्नुर्नारायणो नरः ।।२६ ।।

२३६) **सुप्रसादः** – अपकार करणाऱ्यावरहि कृपा करणारा. किंवा उत्तम प्रसाद देणारा. जे मिळाल्यामुळे पाप जाते, पुण्य लागते, समाधान मिळते, कल्याण होते, इच्छित गोष्टी प्राप्त होतात अशा लाभाला प्रसाद म्हणतात. भगवान् हा तत्स्वरूपच आहे.

२३७) **प्रसन्नात्मा** – ज्याचे अंत:करण निर्मल, म्हणजे रज किंवा तम या दोन दोषांनी युक्त नाही. किंवा ज्याच्या कोणत्याहि कामना सर्वदा परिपूर्ण होत असल्यामुळे जो नित्य समाधानी आहे.

२३८) **विश्वधृक्** – विश्वाचे धारण करणारा.

२३९) **विश्वभुग्** – विश्वाचा उपभोग घेणारा किंवा विश्वाचे पालन करणारा.

२४०) **विभुः** – व्यापक किंवा विविध रूपाने प्रगट होणारा.

२४१) **सत्कर्ता** – सत्कार करणारा, चांगल्या गोष्टी करणारा.

२४२) **सत्कृतः** – ज्याचा सत्कार केला जातो असा किंवा पूजनीय व्यक्तीहि ज्याची पूजा करतात.

२४३) **साधु :** – सज्जन, सर्वदा न्यायाने वागणारा, किंवा सर्व गोष्टी साधणारा, किंवा साध्याचे उपादानकारण असल्याने साध्यरूप असलेला.

२४४) **जह्नुः** – जनांचा लय करणारा, किंवा अज्ञानी जनांचा त्याग करणारा व भक्तजनांना परमपदास नेणारा.

२४५) **नारायणः** – नार म्हणजे आद्य जल, ते ज्याचे निवास स्थान आहे. किंवा आत्म्यापासून उत्पन्न झालेल्या आकाशादि कार्यांना कारणरूपाने जो व्यापून राहतो किंवा प्रलयकाळी सर्व जीव ज्याच्यामध्ये लीन होतात.

२४६) **नर :** – जो घेऊन जातो. जीवांना कल्याणाप्रत नेतो. किंवा जो मनुष्यरूपाने अवतार घेतो.

## असंख्येयोऽप्रमेयात्मा विशिष्टः शिष्टकृ(२५०)च्छुचिः ।
## सिद्धार्थः सिद्धसंकल्पः सिद्धिदः सिद्धिसाधनः ॥२७॥

२४७) **असंख्येय :** – ज्याचे ज्ञान करून घेण्यासाठी संख्या उपयोगी पडत नाही. किंवा संख्या करता यावी अशी कोणत्याहि प्रकारची नामरूपादि विविधता ज्याचे ठिकाणी नाही.

२४८) **अप्रमेयात्मा** – ज्याचे स्वरूप बाह्य प्रमाणांनी जाणून घेता येत नाही.

२४९) **विशिष्टः** – जो सर्वांपेक्षा वेगळा आहे.

२५०) **शिष्टकृत्** – शासन करणारा, संभावितांचे पालन करणारा.

२५१) **शुचि :** – निर्मल, पवित्र.

२५२) **सिद्धार्थ :** – अर्थ = इच्छा. ज्याच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत.

२५३) **सिद्धसंकल्प :** – ज्याचे सर्व संकल्प तडीस जातात. पार पडतात.

२५४) **सिद्धिदः** – कर्त्याला त्याच्या अधिकारानुरूप सिद्धी म्हणजे कर्माचे फल जो देतो. किंवा योगमार्गात वा मंत्रतंत्रशास्त्रात उल्लेखिलेल्या

ज्या अनेक प्रकारच्या सिद्धि आहेत त्या जो आपल्या भक्तांना देतो.

२५५) **सिद्धिसाधन :** – कोणतीहि सिद्धि प्राप्त करून घेण्याचे जो साधन आहे वा ज्याच्या कृपेमुळे कोणतीहि इच्छित गोष्ट प्राप्त होते.

## वृषाही वृषभो विष्णुर्वृषपर्वा वृषोदरः[२६०] ।
## वर्धनो वर्धमानश्च विविक्तः श्रुतिसागरः ॥२८॥

२५६) **वृषाही** – ज्याच्यामुळे दिवस धर्मरूप होतो.

२५७) **वृषभः** – आपल्या भक्तांवर जो कामांचा म्हणजे इच्छित वस्तूंचा वर्षाव करतो.

२५८) **विष्णु :** – सर्वांना व्यापून असलेला.

२५९) **वृषपर्वा** – परमपदावर चढून जाण्याची इच्छा करणाऱ्याला जो सदाचरण – धर्मरूपी पायऱ्या होऊन सहाय्य करतो.

२६०) **वृषोदरः** – धर्म ज्याच्या उदरांत राहतो.

२६१) **वर्धन :** – जो सन्नीति, सदाचरण, धर्म, सद्गुण इत्यादि वाढवितो.

२६२) **वर्धमानः** – जो प्रपंचरूपाने वा विश्वविस्ताराच्या रूपाने वाढत असतो.

२६३) **विविक्त :** – जो सर्वांतून अलिप्त आहे, पृथक् आहे.

२६४) **श्रुतिसागरः** – समुद्रात ज्याप्रमाणे पाणी रहावे तसे वेद ज्याच्या ठिकाणी सांठविले आहेत.

## सुभुजो दुर्धरो वाग्मी महेन्द्रो वसुदो वसुः[२७०] ।
## नैकरूपो बृहद्रूपः शिपिविष्टः प्रकाशनः ॥२९॥

२६५) **सुभुज :** – ज्याच्या भुजा, बाहू, हात फार सुंदर आहेत.

२६६) **दुर्धर :** – जे धारण करणे कोणालाहि शक्य नाही. अशा गोष्टी धारण करणारा, किंवा ध्यानसमयी हृदयामध्ये ज्याला धारण करणे कठिण आहे.

२६७) **वाग्मी** – उत्कृष्ट वक्ता. वेदासारखी श्रेष्ठ वाणी त्याचेपासून जन्माला आली म्हणून त्याचे वक्तृत्व उत्कृष्ट ठरले.

२६८) **महेन्द्र:** – जो इंद्राचाहि इंद्र आहे.

२६९) **वसुद:** – धन देणारा.

२७०) **वसु :** – धनस्वरूप. वा मायेने स्वत:चे रूप झांकून टाकणारा. किंवा अंतरिक्षामध्ये असाधारणपणे राहणारा वायु हे ज्याचे स्वरूप आहे.

२७१) **नैकरूप:** – ज्याचे रूप एकाच प्रकारचे नाही.

२७२) **बृहद्रूप:** – ज्याचे रूप महान, प्रचंड, विशाल असे आहे.

२७३) **शिपिविष्ट:** – शिपि = पशु. यज्ञरूपाने जो पशूंच्या आश्रयाने राहतो. किंवा शिपि म्हणजे किरण, त्यांनी युक्त असलेला.

२७४) **प्रकाशन:** – सर्वांना प्रकाशित करणारा.

## ओजस्तेजोद्युतिधर: प्रकाशात्मा प्रतापन: ।

२८०

## ऋद्ध: स्पष्टाक्षरो मन्त्रश्चन्द्रांशुर्भास्करद्युति: ।।३०।।

२७५) **ओजस्तेजोद्युतिधर:** – ओज, तेज आणि द्युति धारण करणारा. सामर्थ्य, शौर्य आणि कांती यांनी युक्त.

२७६) **प्रकाशात्मा:** – प्रकाश हेच ज्याचे स्वरूप आहे.

२७७) **प्रतापन:** – सर्वांना सूर्यरूपाने तापविणारा.

२७८) **ऋद्ध:** – समृद्धीने युक्त.

२७९) **स्पष्टाक्षर:** – ज्याचे ॐकाररूप अक्षर स्पष्ट म्हणजे व्यक्त वा उदात्त आहे असा.

२८०) **मन्त्र:** – मंत्रस्वरूप. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद यांतील ऋचांना आणि वाक्यांना मंत्र म्हणतात. तेच ज्याचे स्वरूप आहे वा गुरूने उपदेशिलेल्या मंत्राने ज्याची प्राप्ति होते.

२८१) **चन्द्रांशु:** – चंद्राच्या किरणाप्रमाणे आल्हादक असलेला, संसारतप्तांना शांतविणारा.

२८२) **भास्करद्युति:** – सूर्याच्या तेजाप्रमाणे ज्याचे तेज आहे.

## अमृतांशूद्भवो भानुः शशबिन्दुः सुरेश्वरः ।
## औषधं जगतः सेतुः सत्यधर्मपराक्रमः ।। ३१ ।।

२८३) **अमृतांशूद्भवः** – अमृतासारखे किरण असलेला चंद्र ज्याच्यापासून निर्माण झाला.

२८४) **भानुः** – प्रकाश देणारा. भासमान होणारा. ज्याच्या भासावर सर्व कांही भासते असा.

२८५) **शशबिन्दुः** – सशाच्यासारखा दिसणारा ठिपका ज्याच्या वर आहे तो चंद्र हे ज्याचे स्वरूप आहे.

२८६) **सुरेश्वरः** – देवांचा ईश्वर.

२८७) **औषधम्** – तापत्रयादि रोगांवर उपचारासारखा असणारा.

२८८) **जगतः सेतुः** – संसाररूप समुद्र सुखाने ओलांडता यावा यासाठी जो सर्व जगताला पुलासारखा होतो. किंवा बंधाऱ्यामुळे निरनिराळे जलाशय निर्माण होतात आणि एकमेकांत न मिसळता स्वत:चे वैशिष्ट्य टिकवून वेगवेगळे राहतात त्याप्रमाणे ज्याच्यामुळे जगतामध्ये वर्णांची, जातींची, आश्रमांची, गुणांची, स्वभावांची, रूपांची, आकारांची विविधता निर्माण झाली आहे आणि टिकून राहिली आहे.

२८९) **सत्यधर्मपराक्रमः** – ज्याचे ज्ञान, तेज, ऐश्वर्यादि धर्म आणि पराक्रम सत्य आहेत. निष्फल न होणारे आहेत. न पालटणारे आहेत.

## २९० भूतभव्यभवन्नाथः पवनः पावनोऽनलः ।
## कामहा कामकृत्कान्तः कामः कामप्रदः प्रभुः ।।३२।।

२९०) **भूतभव्यभवन्नाथः** – भूतकाल, भविष्यकाल व वर्तमान कालाचा स्वामी, वा तिन्ही कालात राहणाऱ्या सर्व प्राणिजातावर वा वस्तूंवर ज्याची सत्ता आहे.

२९१) **पवनः** – पवित्र करणारा.

२९२) **पावनः** – चालविणारा, गति देणारा, वा शुद्ध करणे हा ज्याचा स्वभाव आहे असा.

२९३) **अनलः** – प्राणांना आत्मरूपाने धारण करणारा जो जीव तो

ज्याचे स्वरूप आहे किंवा ज्याच्या ठिकाणी शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधादि कोणत्याहि गुणांचा अभाव आहे किंवा ज्याच्या ठिकाणी कोणत्याहि स्वरूपाचा मोजकेपणा नाही म्हणजे जो अमर्यांद आहे किंवा अग्नि हे ज्याचे स्वरूप आहे.

२९४) **कामहा** – कामाचा नाश करणारा, जो आपल्या भक्तांच्या ठिकाणी कामना उरू देत नाही किंवा जो दुर्जनांच्या इच्छा पूर्ण होऊं देत नाही.

२९५) **कामकृत्** – कामना पूर्ण करणारा. भक्तांच्या सात्त्विक कामना जो पूर्ण करतो किंवा काम म्हणजे प्रद्युम्न त्याला ज्याने जन्म दिला आहे.

२९६) **कान्तः** – अत्यन्त तेजस्वी वा अत्यंत सुंदर. ज्याच्या विषयी अत्यंत प्रेम वाटते असा.

२९७) **कामः** – सर्व ज्याची अभिलाषा धरतात. किंवा क म्हणजे ब्रह्मा, अ म्हणजे विष्णू, व म म्हणजे महादेव असा त्रिमूर्तींच्या रूपाने एकटाच नटला आहे.

२९८) **कामप्रदः** – इच्छित गोष्टी प्रकर्षाने देणारा.

२९९) **प्रभुः** – अतिशय म्हणजे अमर्याद सत्तेने युक्त. किंवा धनी, स्वामी.

## ३०० युगादिकृद्युगावर्तो नैकमायो महाशनः ।
## अदृश्यो व्यक्तरूपश्च सहस्रजिदनन्तजित् ॥ ३३ ॥

३००) **युगादिकृत्** – युगादि कालभेदांचा कर्ता किंवा युगांचा आरंभ करणारा

३०१) **युगावर्तः** – कृत, त्रेत, द्वापर, कलि अशा युगांची क्रमाने एकामागून एक आवर्तने घडविणारा.

३०२) **नैकमायः** – ज्याची माया अनेकविध रूपाने प्रगट होत असते. लीलानट.

३०३) **महाशनः** – ज्याचा आहार पुष्कळ मोठा आहे म्हणूनच कल्पांताच्या वेळीं जो सर्व विश्व गिळून टाकतो.

३०४) **अदृश्यः** – बुद्धि, मन, इंद्रिय यांना अगम्य असलेला

किंवा ज्याच्या अस्तित्वाचे ज्ञान ज्ञानेंद्रियाने होऊं शकत नाही किंवा जो स्थूल आकाराने युक्त नसल्यामुळे डोळ्यांना दिसू शकत नाही.

३०५) **व्यक्तरूपः** – ज्याचे स्वरूप सहज जाणण्याइतके प्रगट आहे किंवा स्वयंप्रकाश असल्याने योग्यांना जो प्रगटरूपाने दिसणारा आहे.

३०६) **सहस्रजित्** – सहस्रावधि योद्ध्यांना जिंकणारा.

३०७) **अनन्तजित्** – असंख्य प्रमाणात असलेल्या वीरांनाहि जिंकणारा. अचिंत्यशक्ति असल्यामुळे ज्याच्या जय मिळविण्याच्या सामर्थ्याला मर्यादा नाही.

## इष्टोऽविशिष्टः शिष्टेष्टः[३१०] शिखण्डी नहुषो वृषः ।
## क्रोधहा क्रोधकृत्कर्ता विश्वबाहुर्महीधरः ।। ३४ ।।

३०८) **इष्टः** – जो सगळ्यांनाच हवाहवासा वाटतो, किंवा इष्टि म्हणजे यज्ञ, तिच्या द्वाराने ज्याचे पूजन केले जाते.

३०९) **अविशिष्टः** – जो सर्वात मिळून मिसळून राहतो. सर्वांच्याच अंतरंगात जो समभावाने राहतो.

३१०) **शिष्टेष्टः** – शिष्टांना, सभ्यांना, सज्जनांना, विद्वानांना आवडणारा, हवासा वाटणारा. किंवा चांगले लोक ज्याला आवडतात असा किंवा भली माणसे ज्याचे पूजन करतात.

३११) **शिखण्डी** – शिखंड म्हणजे मोराचे पीस. ते ज्याने अलंकारासारखे धारण केले आहे. गोकुळामध्ये गोपवेषांत असतांना भगवंताने मोरपिसे मस्तकी खोवली होती त्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे.

३१२) **नहुषः** – भूतजाताला आपल्या मायेने बांधून ठेवणारा.

३१३) **वृषः** – धर्मस्वरूप, कामांचा वर्षाव करणारा.

३१४) **क्रोधहा** – क्रोध, संताप नष्ट करणारा.

३१५) **क्रोधकृत्कर्ता** – रागीट माणसांचा नाश करणारा किंवा योग्य प्रसंगी रागावणारा आणि त्या भरात कृत्य करणारा.

३१६) **विश्वबाहुः** – आपल्या बाहूंनी सर्वांना आधार देणारा किंवा ज्याचे बाहू सर्वत्र पसरलेले आहेत असा.

३१७) **महीधरः** – पृथ्वीचे धारण करणारा. किंवा मही म्हणजे

पूजा, ती स्वीकारणारा.

## अच्युतः प्रथितः प्राणः[३२०] प्राणदो वासवानुजः ।
## अपां निधिरधिष्ठानमप्रमत्तः प्रतिष्ठितः ॥ ३५ ॥

**३१८) अच्युतः** – सर्व विकारांनी रहित, न घसरणारा, जसाच्या तसा टिकून राहणारा.

**३१९) प्रथितः** – ज्याची प्रसिद्धि आहे, ज्याचे ज्ञान सर्वांना आहे, ज्याची कीर्ति सर्वत्र गाजते आहे.

**३२०) प्राणः** – प्राणस्वरूप.

**३२१) प्राणदः** – जीवन देणारा वा दुष्टांचे प्राण हरण करणारा.

**३२२) वासवानुजः** – वासव म्हणजे इंद्र, त्याच्यामागून जन्माला आलेला म्हणजे इंद्राचा धाकटा भाऊ. इंद्र हा कश्यपपत्नी आदितीचा मुलगा. वामनावतारामध्ये भगवंताने अदितीच्या पोटी जन्म घेतल्याने भगवान् इंद्राचे धाकटे भाऊ झाले.

**३२३) अपां निधिः** – जलाचा साठा, समुद्र.

**३२४) अधिष्ठानम्** – उपादानकारणरूपाने सर्वांचे अधिष्ठान असलेला.

**३२५) अप्रमत्तः** – कधीहि चूक न करणारा. कर्माची फले देतांना, जीवांना सुखदुःखाचे भोग भोगावयास लावताना ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे सर्वांना बिनचूक वागविले जाते म्हणून भगवंताला हे नाव प्राप्त झाले आहे.

**३२६) प्रतिष्ठितः** – आपल्या महिम्यात पूर्णपणे स्थिर असलेला.

## स्कन्दः स्कन्दधरो धुर्यो वरदो[३३०] वायुवाहनः ।
## वासुदेवो बृहद्भानुरादिदेवः पुरंदरः ॥ ३६ ॥

**३२७) स्कन्दः** – अमृतरूपाने वाहणारा. किंवा वायुरूपाने सुकविणारा किंवा शिवपुत्र षडानन कार्तिकस्वामी हे ज्याचे स्वरूप आहे.

**३२८) स्कन्दधरः** – धर्ममार्गाचे धारण करणारा.

**३२९) धुर्यः** – सर्व विश्वाची भरणपोषणादि धुरा वाहणारा.

**३३०) वरदः** – वर देणारा.

**३३१) वायुवाहनः** – सात प्रकारच्या वायूंचे वहन करणारा म्हणजे त्यांना गति देणारा. हे सात प्रकारचे वायू निरनिराळ्या सात क्षेत्रांमध्ये राहत असतात. मेघ आणि पृथ्वी यांच्यामध्ये आवह नांवाचा वायू राहतो. मेघ आणि सूर्य यांच्यामध्ये प्रवह नांवाचा वायू राहतो. सूर्य आणि चंद्र यांच्यामध्ये अनुवह नांवाचा वायु राहतो. चंद्र आणि नक्षत्र यांच्यामध्ये संवह नांवाचा वायु राहतो. नक्षत्र आणि ग्रह यांच्यामध्ये विवह नांवाचा वायु राहतो. ग्रह आणि सप्तर्षी यांच्यामध्ये परावह नांवाचा वायु राहतो. सप्तर्षी आणि ध्रुव यांच्यामध्ये परिवह नांवाचा वायु राहतो. सारांश सर्व विश्वामध्ये निरनिराळ्या पातळीवरच्या क्षेत्रांत एक प्रकारची गति भरून राहिली आहे. त्या सर्व गतींना भगवंताच्या शक्तीने प्रेरणा प्राप्त होते. म्हणून हे नांव प्राप्त झाले आहे.

**३३२) वासुदेवः** – राहणे, आच्छादन करणे ही ज्याची क्रीडा आहे किंवा स्वशक्तीने विश्वाचे आच्छादन करण्याचा व्यवहार जो करतो किंवा आपल्या मायेने झांकून टाकून सर्व विश्वाला जो जिंकतो, किंवा स्वशक्तीने आच्छादिलेल्या विश्वाच्या रूपाने जो व्यक्त होतो, किंवा विश्वाला आच्छादिणारा म्हणून ज्याची कीर्ति गायिली जाते, किंवा देवतारूपाने जो सर्व भूतांना वसवितो.

**३३३) बृहद्भानुः** – ज्याचे किरण वा प्रकाश फार मोठा आहे.

**३३४) आदिदेवः** – सर्व देवांच्याहि आधी जो असतो किंवा प्रकाशन करणे इत्यादि गुण ज्याच्या ठिकाणी आहेत.

**३३५) पुरंदरः** – शत्रूंच्या पुरांचे विध्वंसन करणारा, परमार्थात घातक असणाऱ्या देहबुद्धीला नाहीशी करणारा.

## अशोकस्तारणस्तारः शूरः [३४०]शौरिर्जनेश्वरः
## अनुकूलः शतावर्तः पद्मी पद्मनिभेक्षणः ॥३७ ॥

**३३६) अशोकः** – शोकरहित

**३३७) तारणः** – तारून नेणारा, संसारसागरातून उद्धरणारा.

**३३८) तारः** – तारक. जन्म, जरा, मरणादि भयातून सोडविणारा.

**३३९) शूर:** – पराक्रमी

**३४०) शौरि:** – शूर नावाच्या राजाच्या कुलामध्ये जन्माला आलेल्या वसुदेवाचा पुत्र.

**३४१) जनेश्वर:** – जनांचा, लोकांचा ईश्वर.

**३४२) अनुकूल:** – सर्वांना अनुकूल असलेला. कोणालाहि विरोध न करणारा.

**३४३) शतावर्त:** – शेकडो वेळा ज्याने अवतार धारण केले आहेत असा, किंवा शरीरातील शतावधी नाड्यातून, वाहिन्यातून जो प्राणरूपाने वाहत असतो.

**३४४) पद्मी** – ज्याने हातामध्ये कमल धरले आहे.

**३४५) पद्मनिभेक्षण:** – कमलासारखे ज्याचे डोळे सुंदर आहेत.

**पद्मनाभोऽरविन्दाक्षः पद्मगर्भः शरीरभृत् ।**
**महर्द्धिर्[३५०] ऋद्धो वृद्धात्मा महाक्षो गरुडध्वजः ।।३८।।**

**३४६) पद्मनाभ:** – हृदयरूप पद्माच्या नाभीस्थानी म्हणजे मध्यभागी राहणारा.

**३४७) अरविन्दाक्ष:** – कमलाप्रमाणे ज्याचे डोळे आहेत असा.

**३४८) पद्मगर्भ:** – हृदयरूप कमलामध्ये ध्यानधारणेच्या रूपाने ज्याची उपासना केली जाते.

**३४९) शरीरभृत्** – सर्व प्राणीमात्रांच्या शरीराचे भरणपोषण करणारा. किंवा जगत् कल्याणासाठी अवतार घेतेवेळी शरीर धारण करणारा.

**३५०) महर्द्धि:** – ज्याचे ऐश्वर्य मोठे आहे.

**३५१) ऋद्ध:** – विश्वरूप ऐश्वर्याने व्यक्त होणारा.

**३५२) वृद्धात्मा** – पुरातन, जो सर्वांपेक्षा वडील आहे.

**३५३) महाक्ष:** – ज्याचे डोळे मोठे आहेत किंवा ज्याला पुष्कळ डोळे आहेत.

**३५४) गरुडध्वज:** – गरुडाचे चिन्ह ज्याच्या ध्वजावर आहे.

**अतुलः शरभो भीमः समयज्ञो हविर्हरिः ।**
**सर्वलक्षणलक्षण्यो[३६०] लक्ष्मीवान् समितिंजयः ।।३९।।**

**३५५) अतुल:** – ज्याच्याशी तुलना करण्यासारखे दुसरे कांहीही नाही.

**३५६) शरभ:** – जीर्ण होणे, झिजणे, उणावणे हा ज्याचा स्वभाव आहे अशा शरीरामध्ये (शर) जो आत्मरूपाने भासतो.

**३५७) भीम:** – ज्याला सर्व भितात.

**३५८) समयज्ञ:** – वेळेचे उचित ज्ञान ज्याचे ठिकाणी आहे, किंवा सर्वांना समभावाने वागविणे हाच ज्याचा यज्ञ आहे.

**३५९) हविर्हरि:** – यज्ञामध्ये अर्पण केलेल्या आहुतींचे हरण करणारा, किंवा सर्व जीवन हा एक यज्ञ असल्यामुळे पुरुष हाच त्यातील आहुति आहे, त्यामुळे या पुरुषाच्या ठिकाणी असलेल्या पातकांना जो केवळ स्मरणमात्रेकरून नाहीसे करतो.

**३६०) सर्वलक्षणलक्षण्य:** – सर्व लक्षणांनी म्हणजे सर्व प्रकारच्या प्रमाणांनी ज्याचे ज्ञान होते तो.

**३६१) लक्ष्मीवान्** – ज्याच्या वक्ष:स्थलावर लक्ष्मी विराजमान आहे.

**३६२) समितिंजय:** – समिति म्हणजे युद्ध किंवा सभा. पराक्रमाने युद्ध जिंकणारा किंवा पांडित्याने आणि वक्तृत्वाने सभा जिंकणारा.

## विक्षरो रोहितो मार्गो हेतुर्दामोदर: सह: ।
## महीधरो महाभागो[३७०] वेगवानमिताशन: ।। ४० ।।

**३६३) विक्षर:** – झीज किंवा नाश ज्याच्यापासून दूर आहे.

**३६४) रोहित:** – आपल्या इच्छेनुरूप विशिष्ट प्रकारच्या पिवळसर वर्णाचे मिश्रण असलेला, रक्तवर्ण धारण करणारा, किंवा रोहित नांवाच्या माशाचे रूप धारण करणारा.

**३६५) मार्ग:** – भक्तजन ज्याची प्रतीक्षा करीत असतात किंवा परमानंदाची प्राप्ति ज्याच्या साहाय्याने होते.

**३६६) हेतु:** – सर्व प्रकारच्या कार्यांचे वा घटनांचे जो समवायी, उपादान, वा निमित्त या स्वरूपाचे कारण आहे.

**३६७) दामोदर:** – दोरीने ज्याचे पोट बांधलेले आहे असा.

गोकुळामध्ये यशोदेने एकदा बालकृष्णाला उखळीशी दोरीने बांधून ठेवले होते. त्यावरून हे नांव पडले आहे. किंवा दम इत्यादि साधनांनी उदार म्हणजे विकसित झालेल्या बुद्धीने ज्याचे ज्ञान होते किंवा दाम म्हणजे लोक. ते लोक ज्याच्या उदरात सामवले आहेत.

**३६८) सहः** – सर्व कांही सहन करणारा. सर्वासवे असणारा.

**३६९) महीधरः** – शेषरूपाने वा पर्वतरूपाने पृथ्वीचे धारण करणारा.

**३७०) महाभागः** – ऐश्वर्ययुक्त वा उत्कृष्ट अशा भोगांचा उपभोग घेणारा. सभ्य, सज्जन.

**३७१) वेगवान्** – ज्याची गति शीघ्र आहे.

**३७२) अमिताशनः** – ज्याचा आहार मोजता येणार नाही इतका मोठा आहे. प्रलयकालाच्या वेळी सर्व कांही गिळून टाकतो म्हणून हे नांव प्राप्त झाले आहे. किंवा सर्व काही स्वीकारतो (भावाने दिलेले).

## उद्भवः क्षोभणो देवः श्रीगर्भः परमेश्वरः ।
## करणं कारणं कर्ता[३८०] विकर्ता गहनो गुहः ॥४१॥

**३७३) उद्भवः** – विश्वाच्या उत्पत्तीचे कारण. किंवा भव म्हणजे संसार, त्यापासून वर असलेला म्हणजे संसाराच्या पार असलेला.

**३७४) क्षोभणः** – विश्वोत्पत्तीच्या वेळी मूलतः शांत, निश्चल असलेल्या मूलतत्वांचे ठिकाणी जो क्षोभ म्हणजे स्पंद, हालचाल, प्रेरणा निर्माण करतो.

**३७५) देवः** – प्रकाशणारा. किंवा जो सृष्टीरूपाने क्रीडा करीत आहे वा जो राक्षसांना जिंकण्याची इच्छा करतो. किंवा जो सर्व भूतमात्रांच्या रूपाने व्यवहार करीत आहे, किंवा आत्मरूपाने जो प्रकाशित होत आहे वा श्रेष्ठ व्यक्तीकडून ज्याची स्तुति केली जाते किंवा सर्वत्र ज्याची गति आहे.

**३७६) श्रीगर्भः** – श्री म्हणजे ऐश्वर्य, संपत्ति. विश्वरूप ऐश्वर्य ज्याच्या गर्भात वास करीत आहे.

**३७७) परमेश्वरः** – शासन करणाऱ्या, नियमन करणाऱ्या, सत्ताधारी असणाऱ्या, अशा सर्वांमध्ये जो श्रेष्ठ आहे.

३७८) **करणम्** – जो सर्व कार्याचे महत्त्वाचे साधन आहे.

३७९) **कारणम्** – जो सर्व कार्याचे उपादान व निमित्त कारण आहे. (दागिन्याचे सोने हे उपादान कारण, सोनार निमित्त कारण)

३८०) **कर्ता** – जो सर्व कार्ये घडविणारा आहे किंवा ज्याची स्वतंत्रता अबाधित असते.

३८१) **विकर्ता** – चित्रविचित्र अशा विश्वाची रचना करणारा.

३८२) **गहनः** – ज्याच्या स्वरूपाचे वा सामर्थ्याचे ज्ञान होणे फार अवघड आहे.

३८३) **गुहः** – गुप्तरूपाने असलेला. ज्याने आपल्या योगमायेने स्वतःचे स्वरूप झांकून टाकले आहे असा.

**व्यवसायो व्यवस्थानः संस्थानः स्थानदो ध्रुवः ।**
३९०
**परर्द्धिः परमस्पष्टस्तुष्टः पुष्टः शुभेक्षणः ।।४२ ।।**

३८४) **व्यवसायः** – शुद्ध स्वरूपाचे ज्ञान हेच ज्याचे स्वरूप आहे. किंवा निरनिराळ्या क्रिया, व्यापार करण्यात गढून गेलेला.

३८५) **व्यवस्थानः** – विश्वामध्ये सर्व प्रकारच्या गोष्टींची वेगवेगळी रचना करून त्यांची व्यवस्था लावणारा. समाजाला व विश्वधारणेला उपयोगी पडणारी जातिवर्णआश्रमादि व्यवस्था ज्याचेमुळे लागते.

३८६) **संस्थानः** – सर्वभूतमात्र ज्याच्या ठिकाणी उत्तमरीतीने राहतात.

३८७) **स्थानदः** – प्रत्येक व्यक्तीला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे स्थान देणारा.

३८८) **ध्रुवः** – अविनाशी, निश्चल.

३८९) **परर्द्धिः** – ज्याचे ऐश्वर्य श्रेष्ठ प्रकारचे आहे.

३९०) **परमस्पष्टः** – जो अत्यंत व्यक्त आहे. ज्ञानस्वरूप असल्यामुळे, प्रकाशस्वरूप असल्यामुळे जो सहज स्पष्ट आहे किंवा ज्याची व्यक्तता अत्यंत शोभिवंत आहे.

३९१) **तुष्टः** – सदा तृप्त असलेला.

**३९२) पुष्टः** – ज्याचे पोषण उत्तम प्रकारे झाले आहे असा.

**३९३) शुभेक्षण :** – ज्याचे दर्शन शुभकारक आहे. कारण त्या दर्शनाने मुमुक्षूंना मोक्ष लाभतो. संसारी जनांना भोगांची प्राप्ति होते. संशय नाहीसे होतात. पातकी पवित्र होतात. हृदयाच्या ग्रंथि सुटतात. म्हणून त्याचे दर्शन शुभ आणि कल्याणकारक आहे असे म्हटले जाते.

## रामो विरामो विरजो मार्गो नेयो नयोऽनयः[४००] ।
## वीरः शक्तिमतां श्रेष्ठो धर्मो धर्मविदुत्तमः ॥ ४३ ॥

**३९४) रामः** – योगीजन ज्याच्या ठिकाणी रममाण होतात, किंवा रमणीय शरीर धारण करणारा, किंवा राम या नांवाने दशरथाच्या पोटी अवतार धारण करणारा.

**३९५) विरामः** – सर्व प्राणिमात्रांचे विश्रांतिस्थान.

**३९६) विरज :** – रज म्हणजे आसक्ति. ती ज्याच्याजवळ नाही असा, विरक्त. रजोगुणाच्या दोषापासून अलिप्त.

**३९७) मार्गः** – जो परमपदाकडे घेऊन जातो. उन्नति, प्रगति, विकास घडवितो.

**३९८) नेय :** – परमपदाकडे किंवा विकासाकडे घेऊन जाण्यास किंवा नेण्यास योग्य आहे असा जो जीव तो ज्याचे स्वरूप आहे.

**३९९) नय :** – नेणारा, घेऊन जाणारा पुढारी. मार्ग, नेय आणि नय ही एक त्रिपुटी आहे व या तिन्ही रूपाने एकच भगवंत नटला आहे.

**४००) अनय :** – ज्याला कोणी नेता नाही.

**४०१) वीर :** – पराक्रमी, शूर.

**४०२) शक्तिमतां श्रेष्ठः** – शक्तिशाली असलेल्या देवदेवतांच्यामध्येहि श्रेष्ठ.

**४०३) धर्म :** – सर्व भूतमात्रांचे धारण करणारा. किंवा धर्माचरणाने प्राप्त होणारा.

**४०४) धर्मविदुत्तमः** – धर्म जाणणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ. वेद, स्मृति,

शास्त्रे भगवंताच्या आज्ञेत राहतात. म्हणून हे नाव प्राप्त झाले आहे.

## वैकुण्ठः पुरुषः प्राणः प्राणदः प्रणवः पृथुः[४१०] ।
## हिरण्यगर्भः शत्रुघ्नो व्याप्तो वायुरधोक्षजः ।।४४।।

४०५) **वैकुण्ठः** – विविध भूतांच्या गति कुंठित करून त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास लावणारा, किंवा वैकुंठलोकाचा स्वामी किंवा बंधने दूर सारून मुक्त असलेला.

४०६) **पुरुषः** – शरीररूपी नगरीत राहणारा.

४०७) **प्राणः** – प्राणस्वरूप, श्वसनरूप हालचाल करणारा.

४०८) **प्राणदः** – प्राणांचे हरण करणारा, किंवा जीवनदायक.

४०९) **प्रणवः** – ज्याची स्तुति सर्व करतात वा ज्याला सर्व प्रणाम करतात किंवा जो सर्वांच्या आदि, अंती असतो. ॐकार हे ज्याचे स्वरूप आहे.

४१०) **पृथुः** – विस्तृत विश्वरूपाने विस्तारलेला.

४११) **हिरण्यगर्भः** – सृष्टीची उत्पत्ति करणारा ब्रह्मदेव हे ज्याचे स्वरूप आहे.

४१२) **शत्रुघ्नः** – शत्रूचा संहार करणारा किंवा रामचंद्राचा धाकटा भाऊ.

४१३) **व्याप्तः** – सर्वांना व्यापून असलेला.

४१४) **वायुः** – गतिरूप वा गंधस्वरूप.

४१५) **अधोक्षजः** – कधीहि क्षीण न होणारा, किंवा पृथ्वी आणि अंतरिक्ष यांच्यामध्ये विराटरूपाने राहणारा किंवा अंतर्मुख झालेल्या इंद्रियांना जो प्रगट होतो (दिसतो, आकळतो).

## ऋतुः सुदर्शनः कालः परमेष्ठी परिग्रहः[४२०] ।
## उग्रः संवत्सरो दक्षो विश्रामो विश्वदक्षिणः ।।४५।।

४१६) **ऋतुः** – वसंतादि ऋतु हे ज्याचे स्वरूप आहे.

४१७) **सुदर्शनः** – भक्तांना ज्याचे दर्शन सुखाने होते, किंवा जो दिसण्यात सुंदर आहे.

४१८) **कालः** – सर्वांना आवरणारा, गुंडाळून घेणारा काल हे ज्याचे स्वरूप आहे.

४१९) **परमेष्ठी** – परम म्हणजे श्रेष्ठ, उत्कृष्ट अशा स्थानी राहणे हा ज्याचा स्वभाव आहे.

४२०) **परिग्रहः** – भक्तांनी अर्पण केलेली पाने, फुले, फळे जो स्वीकारतो, किंवा उद्धाराची इच्छा असलेले ज्याच्या आश्रयास जातात.

४२१) **उग्रः** – भयप्रद. सूर्य चंद्रादिहि याचे भय बाळगून नियमितपणे आपली कार्ये करतात असे वेदांनी वर्णन केले आहे.

४२२) **संवत्सरः** – वर्षरूप काल हे ज्याचे स्वरूप आहे किंवा सर्व भूते ज्याच्या ठिकाणी वास करतात.

४२३) **दक्षः** – दक्षतेने सर्व कार्ये करणारा, किंवा दक्ष प्रजापति हे ज्याचे स्वरूप आहे.

४२४) **विश्रामः** – सर्व जीवांचे जो विश्रांतिस्थान आहे. अनेक प्रकारच्या व्यापांनी संतप्त होऊन दमलेल्या जीवांना ज्याचेजवळ विसावा प्राप्त होतो.

४२५) **विश्वदक्षिणः** – सर्व कामांमध्ये कुशल किंवा बलीच्या यज्ञामध्यें ज्याने सर्व विश्वच दक्षिणा म्हणून मिळविले.

## विस्तारः स्थावरस्थाणुः प्रमाणं बीजमव्ययम् ।
## अर्थोऽनर्थो[४३०] महाकोशो महाभोगो महाधनः ।।४६ ।।

४२६) **विस्तारः** – विश्वरूपाने विस्तृत झालेला.

४२७) **स्थावरस्थाणुः** – स्थिर असणाऱ्या व वाटणाऱ्या गोष्टी ज्याच्या आधारावर टिकून राहिल्या आहेत.

४२८) **प्रमाणम्** – प्रमाणभूत, स्वतःच ज्ञानभूत असल्याने ज्याचे प्रामाण्य निःसंशय आहे.

४२९) **बीजमव्ययम्** – स्वतःच्या ठिकाणी वेगळेपणा न येऊ देता जो विश्वाचे मूलकारण होतो.

४३०) **अर्थः** – सुखरूप असल्यामुळे सर्व ज्याची अपेक्षा करतात. सर्वांना जो हवासा वाटतो.

**४३१) अनर्थ:** – पूर्णकाम असल्यामुळे ज्याला कशाचीहि अपेक्षा नाही असा.

**४३२) महाकोश:** – अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय या पांच कोशांनी जो युक्त आहे.

**४३३) महाभोग:** – अत्यंत श्रेष्ठ असा आनंद हाच ज्याचा उपभोग आहे.

**४३४) महाधन:** – ज्याचेजवळ सर्व प्रकारचे धन अपरंपार आहे.

## अनिर्विण्ण: स्थविष्ठोऽभूर्धर्मयूपो महामख: ।
## [४४०] नक्षत्रनेमिर्नक्षत्री क्षम: क्षाम: समीहन: ।।४७।।

**४३५) अनिर्विण्ण:** – कधीहि खिन्न न होणारा.

**४३६) स्थविष्ठ:** – विराट रूपाने स्थित असलेला.

**४३७) अभू:** – अजन्मा, जन्मादि विकार ज्याच्याजवळ नाहीत असा. किंवा भू असा पाठ घेऊन जगदूरूपाने जन्मणारा वा पृथ्वीस्वरूप.

**४३८) धर्मयूप:** – धर्माचा यूप. ज्याच्याशी बांधला गेल्यामुळे धर्म सर्वांच्या उपयोगी पडतो.

**४३९) महामख:** – वाजपेय, अश्वमेध, सोमयाग यासारखे मोठे यज्ञ हे ज्याचे स्वरूप आहेत किंवा मोठमोठे यज्ञ ज्याने केले आहेत किंवा ज्याला यज्ञ अर्पण करणारे महान् ठरतात.

**४४०) नक्षत्रनेमि:** – नक्षत्रमंडलाचे नियमन करणारा.

**४४१) नक्षत्री** – नक्षत्रांच्या रूपाने अंतरिक्षात राहणारा.

**४४२) क्षम:** – सर्व कार्य करण्याचे सामर्थ्य असलेला. सर्व समर्थ. किंवा सर्व काही सहन करणारा, क्षमाशील.

**४४३) क्षाम:** – सर्व विकार क्षीण होऊन केवळ आत्मरूपाने राहणारा. किंवा ज्याच्या शरीरामध्ये पंचमहाभूतांचे विशेषत: पृथ्वीचे आणि जलाचे अंश नाहीत असा.

**४४४) समीहन:** – चांगली इच्छा करणारा, हितचिंतक. जग उत्पन्न करण्याची प्रेरणा असलेला.

**यज्ञ इज्यो महेज्यश्च क्रतुः सत्रं सतां गतिः[४५०] ।**
**सर्वदर्शी विमुक्तात्मा सर्वज्ञो ज्ञानमुत्तमम् ।।४८।।**

४४५) **यज्ञः** – सर्व प्रकारचे यज्ञ हे ज्याचे स्वरूप आहे.

४४६) **इज्यः** – यज्ञरूपी आराधना ज्याला उद्देशून केली जाते.

४४७) **महेज्यः** – यज्ञरूपाने आराधना करण्यासाठी जो सर्वात अधिक योग्य आहे.

४४८) **क्रतुः** – यूप वा यज्ञस्तंभाने युक्त असा जो यज्ञ त्याला क्रतु असे म्हणतात. तो ज्याचे स्वरूप आहे.

४४९) **सत्रम्** – अनेकविध अंगांनी व लहानमोठ्या होमांनी युक्त असा सातत्याने दीर्घकाल चालणारा जो यज्ञ त्याला सत्र असे म्हणतात. ते सत्र हेच ज्याचे स्वरूप आहे. किंवा सत्याचे जो रक्षण करतो तो.

४५०) **सतां गतिः** – सज्जनांना व सत्पुरुषांना जो प्राप्त करून घेण्यास योग्य असा वाटतो व ज्याच्या प्राप्तीसाठी ते प्रयत्नशील असतात.

४५१) **सर्वदर्शी** – सर्व भूतमात्रांचे सर्व प्रकारचे प्रगट, अप्रगट वर्तन जो पाहतो.

४५२) **विमुक्तात्मा** – ज्याचा आत्मा स्वभावतःच सर्व प्रकारच्या बंधनांपासून मुक्त आहे.

४५३) **सर्वज्ञः** – सर्व कांही जाणणारा.

४५४) **ज्ञानमुत्तमम्** – श्रेष्ठ असे वेदान्तज्ञान हेच ज्याचे स्वरूप आहे. किंवा नित्यसिद्ध, दिक् आणि काल यांनी मर्यादित न होणारे व मोक्षप्राप्तीचे एकमेव साधन असे शुद्धज्ञान ज्याचे स्वरूप आहे.

**सुव्रतः सुमुखः सूक्ष्मः सुघोषः सुखदः सुहृत्[४६०] ।**
**मनोहरो जितक्रोधो वीरबाहुर्विदारणः ।। ४९ ।।**

४५५) **सुव्रतः** – उत्तम प्रकारचे व्रत स्वीकारलेला. सर्व भूतांना अभय देणे, जो शरण आला आहे वा मी तुझा आहे असे जो

म्हणतो, त्याच्या योगक्षेमाचा सर्व प्रकारे भार वाहणे अशी व्रते भगवंताने स्वीकारली आहेत.

४५६) **सुमुख :** – ज्याचे मुख, ज्याची मुद्रा अत्यंत प्रसन्न आहे. कोणत्याहि परिस्थितीत ती मलिन किंवा खिन्न होत नाही. किंवा सर्व विद्या ज्याच्या मुखातून उपदेशिल्या गेल्या तो. (चांगले बोलणे, चांगले सांगणे हा मुखाचा मुख्य उद्देश लक्षात घेऊन सुमुख शब्दाचा अर्थ वरीलप्रमाणे करता येतो.)

४५७) **सूक्ष्म :** – जो इंद्रियमनबुद्धीच्या पलीकडे आहे, इंद्रियादींनी ज्याचे ज्ञान होणे शक्य नाही असा.

४५८) **सुघोष :** – ज्याचा घोष म्हणजे शब्दोच्चार आकर्षक, सुंदर आहे. भगवंताच्या नि:श्वासातून वेद निर्माण झाल्याने हे नांव प्राप्त झाले आहे किंवा मेघाच्या वा सागराच्या गर्जनेप्रमाणे गंभीर निनाद भगवंताच्या ध्वनीमध्ये भरून राहिला आहे. त्यामुळे हे नांव प्राप्त झाले आहे.

४५९) **सुखद :** – सुख देणारा किंवा सुखाचा विच्छेद करणारा.

४६०) **सुहृद् :** – प्रत्युपकाराची अपेक्षा न ठेवता सहाय्य करणारा, सद्भावना बाळगणारा.

४६१) **मनोहर :** – ज्याच्याकडे मन ओढले जाते असा. सौंदर्य, सद्गुण, आणि आनंदरूपत्व यामुळे मन हरण करून घेणारा.

४६२) **जितक्रोध :** – ज्याने क्रोध जिंकला आहे. भगवंताने राक्षसांना ठार मारले वा शत्रूच्या पराजयासाठी अनेक युद्धे अवतार धारण करून केली, असे दिसत असले तरी ती स्वार्थ वा सूडबुद्धीने उत्पन्न झालेल्या संतापाने नसून जगताचे कल्याण वा धर्मसंरक्षण यासाठी ती केली आहेत. भगवंत क्रोधवश होत नाहीत त्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे.

४६३) **वीरबाहु :** – ज्याचे बाहु पराक्रमी आहेत.

४६४) **विदारण :** – दुष्टांची हृदये विदीर्ण करणारा. नरसिंह अवतारामध्ये हिरण्यकश्यपूचे पोट फाडले त्यावरूनही हे नाव प्राप्त झाले आहे.

**स्वापनः स्ववशो व्यापी नैकात्मा नैककर्मकृत् ।**
**वत्सरो[४७०]वत्सलो वत्सी रत्नगर्भो धनेश्वरः ।।५० ।।**

**४६५) स्वापन: –** झोप आणणारा, झोपविणारा, आपल्या मायाशक्तीने जो जीवाना आत्मज्ञानरूप जागृति येऊ देत नाही.

**४६६) स्ववश: –** स्वतंत्र. ज्याचे सर्व काही स्वत:च्या स्वाधीन असते. दुसऱ्या कोणावरहि व कशावरहि अवलंबून नसते असा.

**४६७) व्यापी –** आकाशाप्रमाणे सर्व कांही व्यापणारा.

**४६८) नैकात्मा –** अनेक रूपांनी अनेक प्रकारांनी प्रगट होणारा.

**४६९) नैककर्मकृत् –** विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-लयासाठी अनेक प्रकारची कृत्ये करणारा.

**४७०) वत्सर: –** सर्व काही ज्याच्यामध्ये राहते. किंवा वर्ष-रूपाने कालस्वरूप असलेला.

**४७१) वत्सल: –** प्रेमळ, स्नेहयुक्त, मायाळू.

**४७२) वत्सी –** वासरांचे, बालकांचे, प्रजेचे पालन करणारा.

**४७३) रत्नगर्भ: –** अनेक प्रकारची रत्ने ज्याच्या उदरामध्ये आहेत अशा सागरासारखा.

**४७४) धनेश्वर: –** धनाचा, संपत्तीचा, साधनसामुग्रीचा स्वामी

**धर्मगुब्धर्मकृद्धर्मी[४८०] सदसत्क्षरमक्षरम् ।**
**अविज्ञाता सहस्रांशुर्विधाता कृतलक्षणः ।।५१ ।।**

**४७५) धर्मगुप् –** धर्माचे रक्षण करणारा.

**४७६) धर्मकृत् –** धर्माची स्थापना करणारा. किंवा धर्म निर्माण करणारा.

**४७७) धर्मी –** धर्माचे धारण करणारा. वा धर्माप्रमाणे आचरण करणारा, धर्मयुक्त, धार्मिक.

**४७८) सत् –** सत्यस्वरूप, अस्तित्वमात्र, सत्तारूप.

**४७९) असत् –** अविद्या वा माया हिने युक्त. किंवा उपाधीमुळे अस्तित्वात आलेल्या अशा दिसणाऱ्या, भासणाऱ्या विश्वाच्या पलीकडे असलेला.

४८०) **क्षरम्** – नाहीसे होणाऱ्या विश्वाच्या रूपाने नटलेला.

४८१) **अक्षरम्** – कूटस्थ. देहाच्या आश्रयाने असणारा, चैतन्य रूप, नाश न पावणारा.

४८२) **अविज्ञाता** – स्वत:च्या ठिकाणी कर्तृत्व, भोक्तृत्व, संकल्प धारण करणारा जीव हा विज्ञाता आहे. त्यापेक्षा वेगळा म्हणून भगवंतास हे नांव प्राप्त झाले आहे.

४८३) **सहस्रांशु:** – सहस्रावधि किरणांनी युक्त असा सूर्य हे ज्याचे स्वरूप आहे.

४८४) **विधाता** – विश्वाचे जो विशेषरूपाने धारण करतो.

४८५) **कृतलक्षण :** – ज्याचे लक्षण म्हणजे स्वरूपज्ञानाचे साधन वेदांतशास्त्राने सांगितले आहे. किंवा ज्याने अनेक प्रकारची शास्त्रे निर्माण केलेली आहेत, किंवा ज्याने भूतमात्रांच्या ठिकाणी त्यांना वेगळेपणे ओळखता येईल अशी लक्षणे म्हणजे चिन्हे निर्माण केली आहेत. किंवा ज्याने आपल्या ठिकाणी श्रीवत्सादि चिन्हे धारण केली आहेत असा.

## गभस्तिनेमि: सत्त्वस्थ: सिंहो भूतमहेश्वर: ।
## आदिदेवो[४९०] महादेवो देवेशो देवभृद्गुरु: ।।५२।।

४८६) **गभस्तिनेमि:** – सूर्यमंडलासारखा प्रकाशमान. गभस्ति म्हणजे किरण हे ज्याच्या नेमीसारखे म्हणजे चाकाच्या आरासारखे आहेत. किंवा जो किरणांच्या नेमीभागी म्हणजे मध्यभागी आहे.

४८७) **सत्त्वस्थ:** – प्राधान्येकरून सत्वगुणाच्या आश्रयाने राहणारा.

४८८) **सिंह:** – सिंहासारखा पराक्रमी किंवा नरसिंहरूप ज्याने धारण केले आहे असा.

४८९) **भूतमहेश्वर:** – सर्व विश्वाचा जो महान् ईश्वर आहे. किंवा खरोखरीच जो फार मोठा आहे.

४९०) **आदिदेव:** – सर्वभूतांचे ग्रहण करणारा असा देव किंवा सर्व देवांच्या आधी असलेला.

४९१) **महादेव:** – शंकरस्वरूप. किंवा महान् ऐश्वर्याने युक्त असा सर्वश्रेष्ठ देव.

४९२) **देवेश :** – देवांचा राजा. देवांवर सत्ता असलेला.

४९३) **देवभृद्गुरु :** – देवांचे भरणपोषण करणारे जे ब्रह्मदेव इंद्रादि विशेष योग्यतेचे देव त्यांनाहि गुरुस्थानी असलेला वा त्यांच्याहिपेक्षा श्रेष्ठ.

**उत्तरो गोपतिर्गोप्ता ज्ञानगम्यः पुरातनः ।**
**शरीरभूतभृद् भोक्ता[५००] कपीन्द्रो भूरिदक्षिणः ।।५३ ।।**

४९४) **उत्तर :** – जन्मादि बंधनाच्या पलीकडे असलेला किंवा सर्वांपेक्षा श्रेष्ठ.

४९५) **गोपतिः** – गो म्हणजे गाई, इंद्रिये किंवा पृथ्वी यांचा स्वामी.

४९६) **गोप्ता** – पालनकर्ता, रक्षक.

४९७) **ज्ञानगम्यः** – ज्ञानानेच केवळ ज्याला जाणता येते असा.

४९८) **पुरातन :** – पूर्वी असलेला, सर्वांपेक्षा वडील.

४९९) **शरीरभूतभृत्** – शरीर निर्माण करणारी भूते धारण करणारा.

५००) **भोक्ता** – उपभोग घेणारा. विश्वांतील यच्चयावत् पदार्थांचा जो भोग घेतो. किंवा पालन करणारा. किंवा निरतिशय आनंदात राहणारा.

५०१) **कपीन्द्रः** – वानरांचा स्वामी. रामचंद्र. किंवा कपि म्हणजे वराह त्यामध्यें श्रेष्ठ असलेला असा. वराह अवतार. हनुमान.

५०२) **भूरिदक्षिणः** – पुष्कळ दक्षिणा देणारा किंवा अत्यंत सावध.

**सोमपोऽमृतपः सोमः पुरुजित्पुरुसत्तमः ।**
**विनयो जयः सत्यसंधो[५१०] दाशार्हः सात्वतां पतिः ।।५४।।**

५०३) **सोमप :** – सोमरसाचे प्राशन करणारा.

५०४) **अमृतपः** – अमृताचे प्राशन करणारा किंवा समुद्रमंथनाचे वेळी अमृताचे रक्षण करणारा.

५०५) **सोम :** – औषधींचे पोषण करणारा असा चंद्र, किंवा उमा म्हणजे पार्वती तिच्यासह असलेला असा शंकर.

५०६) **पुरुजित्** – पुष्कळांना जिंकणारा.

५०७) **पुरुसत्तम:** – जो विशाल असे विश्वरूप उत्कृष्टरीतीने धारण करतो.

५०८) **विनय:** – दुष्टांना नम्र करणारा. विनयी.

५०९) **जय:** – सर्वांना जिंकणारा किंवा जय मिळविणारा.

५१०) **सत्यसंध :** – सन्ध: म्हणजे संकल्प. ज्याचा संकल्प नेहमी सत्य असतो असा.

५११) **दाशार्ह:** – सर्वस्वाचे दान करण्यास जो योग्य आहे असा. किंवा दाशार्ह कुलात उत्पन्न झालेला.

५१२) **सात्वतां पति:** – सात्वत् नांवाचे एक तंत्र आहे. त्याची रचना व व्याख्यान करणारा किंवा सात्वत् नांवाच्या यादवकुलाचा स्वामी.

## जीवो विनयितासाक्षी मुकुन्दोऽमितविक्रम: ।
## अम्भोनिधिरनन्तात्मा महोदधिशयोऽन्तक:[५२०] ।।५५।।

५१३) **जीव:** – जीवरूपाने असणारा.

५१४) **विनयितासाक्षी** – प्रजांच्या विनयाचे, नम्रतेचे अवलोकन करणारा. विनयिता आणि असाक्षी अशी दोन पदे केली तरी विशेष रीतीने घेऊन जाणारा, परमपदास नेणारा आणि आत्म्याव्यतिरिक्त दुसरे कांहीहि न पाहणारा असे अर्थ होतात.

५१५) **मुकुन्द:** – मोक्ष देणारा.

५१६) **अमितविक्रम :** – ज्याचा पराक्रम अतुलनीय आहे.

५१७) **अम्भोनिधि :** – देव, मनुष्य, पितर आणि असुर या चार कोटींना अंभ असे म्हणतात. ते ज्याच्यामध्ये राहतात असा. किंवा जलाचा साठा असा समुद्र.

५१८) **अनन्तात्मा** – देश, काल आणि वस्तु यांनी ज्याचे स्वरूप परिच्छिन्न, मर्यादित नाही असा.

५१९) **महोदधिशय:** – महासागरात शयन करणारा. किंवा जलप्रलयाच्या वेळी सर्व जगत् जलमय होऊन जाते त्या सर्वत्र व्यापलेल्या जलास

महोदधि असे म्हणतात; कारण समुद्राचे सर्व भेद त्या स्थितीत एकरूप होतात. अशा या महोदधीमध्ये शयन करणारा. जलप्रलयाचे वेळीं बालकरूपाने परमेश्वर एका वटपत्रावर निद्रिस्त असतो अशी पुराणकथा आहे.

५२०) **अन्तक:** – शेवट करणारा, नाश करणारा, मृत्युस्वरूप.

## अजो महार्हः स्वाभाव्यो जितामित्रः प्रमोदनः ।
## आनन्दो नन्दनो नन्दः सत्यधर्मा त्रिविक्रमः[५३०] ॥५६॥

५२१) **अज:** – अ म्हणजे विष्णु, त्याच्यापासून जन्मलेला काम हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा जन्मरहित.

५२२) **महार्ह:** – पूजन करण्यास योग्य, श्रेष्ठ.

५२३) **स्वाभाव्य:** – उत्पन्न न होणे हा ज्याचा स्वभाव आहे. जो नित्यसिद्ध आहे.

५२४) **जितामित्र:** – शत्रूंना जिंकणारा. कामक्रोधासारखे अंतर्गत आणि रावणासारखे बाह्य शत्रू ज्याने जिंकले आहेत असा.

५२५) **प्रमोदन:** – सदैव आनंदित असलेला किंवा आनंदित करणारा.

५२६) **आनन्द:** – आनंद हे ज्याचे स्वरूप आहे.

५२७) **नन्दन:** – आनंदित करणारा.

५२८) **नन्द:** – सर्व प्रकारच्या समृद्धींनी संपन्न, 'अनंद' असे पद मानले तर वैषयिक सुखाचा ज्याच्याजवळ अभाव आहे असा अर्थ होतो.

५२९) **सत्यधर्मा** – ज्याचे सच्चिदानंदादि किंवा ज्ञान-वैराग्य ऐश्वर्यादि धर्म सत्य आहेत.

५३०) **त्रिविक्रम:** – तिन्ही लोकांना जिंकण्याचा पराक्रम ज्याने केला आहे. वामनावतारामध्ये विराटरूप धारण करून, तीन पावले टाकून तिन्ही लोक व्यापले होते. त्या प्रसंगाला अनुलक्षून हे नाव प्राप्त झाले आहे.

## महर्षि: कपिलाचार्य: कृतज्ञो मेदिनीपति: ।
## त्रिपदस्त्रिदशाध्यक्षो महाशृङ्ग: कृतान्तकृत् ।।५७।।

**५३१) महर्षि: कपिलाचार्य:** – सांख्यमताची प्रस्थापना करणारे अत्यंत थोर ऋषि कपिलमहामुनी ते ज्याचा अवतार आहेत.

**५३२) कृतज्ञ:** – केलेल्याचे ज्ञान असलेला. कार्यस्वरूप जे जगत् त्याचा ज्ञाता.

**५३३) मेदिनीपति:** – पृथ्वीचा स्वामी.

**५३४) त्रिपद:** – तीन पाय असलेला असा अग्नि हे ज्याचे स्वरूप आहे. तीन पावले टाकणारा. वामनावतारामध्ये स्वर्ग, मृत्यू, पाताळाचे आक्रमण भगवंतानी तीन पावले टाकून केले होते. त्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे.

**५३५) त्रिदशाध्यक्ष:** – त्रिदश म्हणजे स्वर्ग, त्याचा अध्यक्ष किंवा कूटस्थ जीवाच्या रूपाने जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीनहि दशा पाहणारा.

**५३६) महाशृङ्ग:** – मोठे शिंग असलेला. मत्स्यावतारामध्ये भगवंताच्या मस्तकावर असलेल्या प्रचंड शृंगालाच, मनूने सप्तर्षी व सर्व बीजे यांनी भरलेली नाव बांधली होती व त्यामुळे जलप्रलयातून त्यांचे रक्षण झाले. त्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे.

**५३७) कृतान्तकृत्** – केलेल्या विश्वाचा अंत म्हणजे शेवट, संहार करणारा. किंवा मृत्यू निर्माण करणारा. किंवा (मोक्षरूपाने) मृत्यूचा नाश करणारा.

## महावराहो गोविन्द: सुषेण:[५४०] कनकाङ्गदी ।
## गुह्यो गभीरो गहनो गुप्तश्चक्रगदाधर: ।। ५८ ।।

**५३८) महावराह:** – महान् वराहाच्या रूपाने अवतार घेणारा. हिरण्याक्षाच्या तावडीतून पृथ्वी सोडवून ती वर आणली या कृत्यासाठी धरावे लागलेले वराहाचे रूप फार प्रचंड होते. त्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे. वर + अह: पदे पाडल्यास आकाराने मोठे असलेले श्रेष्ठ

दिवस, देवांचे किंवा ब्रह्मदेवाचे दिवस हे ज्याचे स्वरूप आहे.

५३९) **गोविन्द :** – वाणीच्या द्वारा जाणला जातो असा.

५४०) **सुषेण :** – ज्याच्या भोवतीचा परिवार हा सुंदर आहे.

५४१) **कनकाङ्गदी** – सोन्याची बाहुभूषणे धारण करणारा.

५४२) **गुह्य :** – ज्याचे स्वरूप सहजासहजी प्रगट होऊं शकत नाही म्हणजे ज्याचे ज्ञान सहजासहजी होत नाही. ज्यातील तत्त्वज्ञान रहस्यमय आहे अशा उपनिषदांमुळे ज्याचा बोध होतो.

५४३) **गभीर :** – पुष्कळ खोल, उथळपणाचा अभाव असलेला किंवा ज्ञान, ऐश्वर्य, बल, पराक्रम इत्यादि गुणांच्यामुळे ज्याच्याजवळ पोंचणे कठिण आहे. गंभीर.

५४४) **गहन :** – ज्याच्यामध्ये प्रवेश मिळविणे कठीण आहे. किंवा तीनहि अवस्थांच्या भावाचा आणि अभावाचा साक्षी.

५४५) **गुप्त :** – वाणी, मन आणि इंद्रिये यांना गोचर नसल्यामुळे, यांचा अविषय असल्यामुळे मन, बुद्धि, इंद्रियांना कळण्याच्या पलीकडे असल्यामुळे गुप्त हे नांव प्राप्त झाले आहे.

५४६) **चक्रगदाधर:** – चक्र आणि गदा ही दोन आयुधे धारण करणारा.

## वेधा: स्वाङ्गोऽजित: कृष्णो[५५०] दृढ: संकर्षणोऽच्युत: ।
## वरुणो वारुणो वृक्ष: पुष्कराक्षो महामना: ।।५९ ।।

५४७) **वेधा :** – विधान करणारा, निर्माण करणारा ब्रह्मदेव.

५४८) **स्वाङ्ग:** – जे निर्माण करावयाचे आहे त्या कार्याचा अंगभूत जो स्वत:च आहे. जसे दागिन्याच्या निर्मितीत सोने अंगभूत असते.

५४९) **अजित :** – जो कोणाकडूनहि जिंकला गेला नाही.

५५०) **कृष्ण :** – वर्णाने काळा असलेला. श्रीकृष्ण, व्यास, अर्जुन.

५५१) **दृढ :** – घट्टपणे टिकून राहणारा. ज्याच्या स्वरूपाची वा सामर्थ्याची कधीहि हानी होत नाही असा.

५५२) **संकर्षणोऽच्युत:** – उत्तम रीतीने आकर्षण करणारा, ओढून घेणारा असा अच्युत. किंवा बलरामाच्या रूपाने अवतार घेणारा अच्युत.

**५५३) वरुण:** – जलाची देवता. किंवा संध्याकाळच्या वेळी आपले किरण आवरून घेणारा सूर्य.

**५५४) वारुण:** – वरुणाचा पुत्र. अगस्ति किंवा वशिष्ठ.

**५५५) वृक्ष:** – वृक्षाप्रमाणे स्थिर असणारा. किंवा संसाररूपी वृक्षाच्या रूपात प्रगट होणारा.

**५५६) पुष्कराक्ष:** – हृदयकमलामध्ये ध्यान केले असता चित्स्वरूपाने प्रकाशित होणारा.

**५५७) महामना:** – उदार अंत:करणाचा. किंवा केवळ मनाच्या संकल्पानेच सृष्टि, स्थिति, अंत या विश्वाच्या तीनहि अवस्था घडविणारा.

**भगवान् भगहाऽनन्दी[५६०] वनमाली हलायुध: ।**
**आदित्यो ज्योतिरादित्य: सहिष्णुर्गतिसत्तम: ।।६० ।।**

**५५८) भगवान्** – संपूर्ण ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, शोभा, सौन्दर्य, ज्ञान आणि वैराग्य या सहांना भग असे म्हणतात. हे सहाही भाव ज्याचेजवळ आहेत तो. किंवा भूतांची उत्पत्ति-प्रलय, येणे-जाणे, विद्या आणि अविद्या या सर्व गोष्टी जो जाणतो त्याला भगवान् असे म्हणतात.

**५५९) भगहा** – ऐश्वर्यादींचा उपसंहार करणारा.

**५६०) आनन्दी** – आनंदाने युक्त; सर्व संपत्ति-समृध्दीने युक्त.

**५६१) वनमाली** – वैजयंतीमाला धारण करणारा किंवा रानफुलांची माला धारण करणारा.

**५६२) हलायुध:** – नांगर हे ज्याचे आयुध आहे असा बलराम हे ज्याचे स्वरूप आहे.

**५६३) आदित्य:** – अदितीचा पुत्र.

**५६४) ज्योतिरादित्य:** – सूर्यमंडलाच्या ज्योतीत म्हणजे प्रकाशात राहणारा.

**५६५) सहिष्णु:** – सहन करणारा. शीत-उष्ण, सुख-दु:ख, मानापमान, जय-पराजय इत्यादि द्वंद्वे जो निश्चलपणे समाधानवृत्तीने सहन करतो.

**५६६) गतिसत्तम:** – सर्वश्रेष्ठ गति जी मुक्ति ती ज्याचे स्वरूप आहे.

## सुधन्वा खण्डपरशुर्दारुणो द्रविणप्रद:[५७०] ।
## दिव:स्पृक् सर्वदृग्व्यासो वाचस्पतिरयोनिज: ।।६१ ।।

**५६७) सुधन्वा** – ज्याचे धनुष्य अत्यंत सुंदर आहे असा.

**५६८) खण्डपरशु:** – शत्रूचे तुकडे करणारा परशु ज्याच्या हातात आहे. अखण्डपरशु असे पद घेतल्यास ज्याचा परशु कधीहि खंडित होत नाही असा. परशुरामावताराला उद्देशून ही नावे आली आहेत.

**५६९) दारुण:** – कठोर.

**५७०) द्रविणप्रद:** – धन देणारा.

**५७१) दिव:स्पृक्** – स्वर्गाला स्पर्श करणारा. अंतराळापर्यंत व्याप्ति असलेला.

**५७२) सर्वदृग्व्यास:** – सर्व प्रकारच्या ज्ञानांचा विस्तार करणारा किंवा दृष्टिरूप असलेले जे वेद त्याचे विभाग पाडणारा. एका वेदाचे ऋग्वेदादि चार भाग व वेदांच्या अनेक शाखोपशाखा निर्माण करणारा.

**५७३) वाचस्पतिरयोनिज :** – वाणीचा स्वामी व जननीवाचून जन्मास आलेला.

## त्रिसामा सामग: साम निर्वाणं भेषजं भिषक् ।
## संन्यासकृच्छम:[५८०] शान्तो निष्ठा शान्ति: परायणम् ।।६२ ।।

**५७४) त्रिसामा** – देवव्रत नांवाच्या तीन सामांनी ज्याची स्तुति केली जाते असा.

**५७५) सामग:** – सामाचे गायन करणारा.

**५७६) साम** – सामवेद हे ज्याचे स्वरूप आहे.

**५७७) निर्वाणम्:** – सर्व दु:खांचा नाश व परमानंदाची प्राप्ति जिथे होते त्या स्थितीस वा पदास निर्वाण असे म्हणतात. ते पद म्हणजे मोक्ष ज्याचे स्वरूप आहे.

**५७८) भेषजम्** – औषध. सर्व दु:खरूपी रोगावरील उपचार, उपाय.

**५७९) भिषग्** – वैद्य, रोगाची चिकित्सा करणारा. सर्व प्रकारच्या दु:खांना दूर करून परमानंदाचा लाभ करून देणाऱ्या विद्येचा उपदेश करणारा.

**५८०) संन्यासकृत्** – मोक्षप्राप्तिसाठी चौथा आश्रम जो संन्यास त्याची निर्मिती करणारा किंवा नरनारायण ऋषींच्या रूपाने संन्यासाश्रम स्वीकारलेला. सर्व प्रकारच्या वस्तूंना योग्य स्थानीं ठेवणारा.

**५८१) शमः** – वासनारहित, शांत, प्रसन्न, स्थितीत मनाला राखणे या अवस्थेस शम म्हणतात. तो शम ज्याचे स्वरूप आहे.

**५८२) शान्तः** – क्षुब्ध न होणारा, विषयसुखाची आसक्ति नसल्यामुळे ज्याची मन, बुद्धि, इंद्रिये क्षोभ पावत नाहीत.

**५८३) निष्ठा** – सर्वकांही ज्याच्या आश्रयाने राहते असा श्रद्धा-निष्ठा स्वरूप.

**५८४) शान्तिः** – सगळ्या प्रकारच्या अज्ञानाची निवृत्ति ज्या स्थितीत होते त्या स्थितीस शांति असे म्हणतात. ही ब्रह्मरूप स्थिती ज्याचे स्वरूप आहे.

**५८५) परायणम्** – जे निवासस्थान पुनरावृत्तिरहित असल्याने उत्कृष्ट आहे. ते ज्याचे स्वरूप आहे.

## शुभाङ्गः शान्तिदः स्रष्टा कुमुदः कुवलेशयः[५९०] ।
## गोहितो गोपतिर्गोप्ता वृषभाक्षो वृषप्रियः ।।६३।।

**५८६) शुभाङ्गः** – ज्याचे शरीर वा अवयव सुंदर, कल्याणकारक आहेत.

**५८७) शान्तिदः** – शांतता देणारा, रागद्वेषादि विकारांपासून मुक्त करणारा.

**५८८) स्रष्टा** – निर्माण करणारा, सृष्टि उत्पन्न करणारा.

**५८९) कुमुदः** – चंद्रविकासी कमळ किंवा पृथ्वीवर आनंदाने राहणारा.

**५९०) कुवलेशयः** – कु+वल+शय = कु म्हणजे पृथ्वी, तिला

घेरणारे जे जल ते कुवल. त्या जलामध्ये शयन करणारा. किंवा कुवल म्हणजे बोर. सर्वव्यापकतेमुळे व सूक्ष्मतेमुळे त्या बोरातहि राहणारा. किंवा कुवल म्हणजे सर्प त्या सर्पांवर शयन करणारा.

५९१) **गोहित :** – गो–गाय किंवा पृथ्वी तिचे हित साधणारा.

५९२) **गोपतिः** – गाईचा व पृथ्वीचा वा इंद्रियांचा स्वामी.

५९३) **गोप्ता** – रक्षण करणारा, विश्वाचे रक्षण करणारा. किंवा स्वत:च्या मायेने स्वत:सच झांकून घेणारा.

५९४) **वृषभाक्ष :** – धर्म हीच ज्याची दृष्टी आहे. किंवा ज्याच्या दृष्टीतून वरांचा वर्षाव होतो. किंवा वृषभाप्रमाणे, बैलाप्रमाणे ज्याचे नेत्र आहेत.

५९५) **वृषप्रिय :** – धर्म ज्याला प्रिय आहे.

## अनिवर्ती निवृत्तात्मा संक्षेप्ता क्षेमकृच्छिवः[६००] ।
## श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः श्रीमतां वरः ।।६४।।

५९६) **अनिवर्ती** – माघार न घेणारा, रणांगणातून परत न फिरणारा, किंवा धर्माला विन्मुख न होणारा.

५९७) **निवृत्तात्मा** – विषयापासून स्वभावत:च ज्याचे मन निवृत्त आहे, दूर झालेले आहे.

५९८) **संक्षेप्ता** – संक्षेप करणारा, प्रलयाच्या वेळी सर्व विश्वाचा विस्तार नाहीसा करून विश्वाला सूक्ष्मरूपात आणणारा.

५९९) **क्षेमकृत्** – प्राप्त झालेल्या वस्तु सांभाळणारा, मिळालेल्या वस्तूंचे रक्षण करणारा, कल्याण करणारा.

६००) **शिव :** – कल्याणकारक.

६०१) **श्रीवत्सवक्षा :** – ज्याच्या वक्षस्थलावर, छातीवर श्रीवत्स नांवाचे चिन्ह आहे.

६०२) **श्रीवास :** – ज्याच्याजवळ श्री म्हणजे शोभा, संपत्ती वा लक्ष्मी ही देवता सर्वदा राहते.

६०३) **श्रीपति :** – श्रीचा–लक्ष्मीचा पति.

६०४) **श्रीमतां वरः** – श्रीमंतांच्यामध्ये श्रेष्ठ किंवा चारी वेदांचे अध्ययन, ज्ञान ज्यांच्याजवळ आहे ते श्रीमान्, त्यांच्यामध्यें श्रेष्ठ.

## श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः ।
## श्रीधरः[६१०]श्रीकरः श्रेयः श्रीमाल्ँलोकत्रयाश्रयः ।।६५।।

**६०५) श्रीदः** – संपत्ती किंवा धन देणारा.

**६०६) श्रीशः** – लक्ष्मीचा स्वामी.

**६०७) श्रीनिवासः** – शोभा, संपत्ती, लक्ष्मी यांच्यामध्ये राहणारा, किंवा लक्ष्मी ज्याच्याजवळ राहते.

**६०८) श्रीनिधिः** – सर्व प्रकारच्या संपत्तीचा वा शोभेचा साठा.

**६०९) श्रीविभावनः** – ज्याच्या त्याच्या कर्मानुरूप विविध प्रकारची संपत्ती विभागून देणारा.

**६१०) श्रीधरः** – लक्ष्मीचा आश्रय, वक्षःस्थलावर लक्ष्मी धारण करणारा.

**६११) श्रीकरः** – संपत्तीने युक्त करणारा. आपले स्तवन, स्मरण, अर्चन करणारे जे भक्त त्यांना सुखकारक वस्तू देणारा.

**६१२) श्रेयः** – कधीही न संपणारे सुख हे ज्याचे स्वरूप आहे वा हित, कल्याण हे ज्याचे स्वरूप आहे.

**६१३) श्रीमान्** – शोभा, सौंदर्य, संपत्ती, लक्ष्मी ज्याच्याजवळ आहे असा.

**६१४) लोकत्रयाश्रयः** – स्वर्ग, मृत्यू, पाताळ या तीनही लोकांना आश्रय देणारा, आधार देणारा.

## स्वक्षः स्वङ्गः शतानन्दो नन्दिर्ज्योतिर्गणेश्वरः ।
## विजितात्मा[६२०]ऽविधेयात्मा सत्कीर्तिश्छिन्नसंशयः ।।६६।।

**६१५) स्वक्षः** – सुंदर डोळे असलेला.

**६१६) स्वङ्गः** – सुंदर अवयव असलेला.

**६१७) शतानन्दः** – शेकडो प्रकारांनी आनंदरूप असलेला. परमात्मा केवळ आनंदरूप असला तरी उपाधिभेदाने आनंदामध्ये विविधता कल्पिली जाते.

**६१८) नन्दिः** – आनंदरूप.

६१९) **ज्योतिर्गणेश्वर:** – नक्षत्र समुदायांचा स्वामी.

६२०) **विजितात्मा** – ज्याने मनावर नियंत्रण ठेवले आहे.

६२१) **अविधेयात्मा** – ज्याच्या स्वरूपाविषयीं ते अमुक एका प्रकारचे आहे असे विधान करता येत नाही असा किंवा ज्याच्यावर स्वामित्व गाजविता येत नाही.

६२२) **सत्कीर्ति:** – ज्याची कीर्ति सत्य किंवा उत्तम आहे.

६२३) **छिन्नसंशय:** – ज्याच्याजवळ कोणत्याहि प्रकारचा संशय लवमात्र नाही कारण तळहातावर घेतलेल्या आवळ्याप्रमाणे सर्व काही त्याला सहजपणे प्रत्यक्ष आहे.

## उदीर्ण: सर्वतश्चक्षुरनीश: शाश्वतस्थिर: ।
## भूशयो भूषणो [६३०] भूतिर्विशोक: शोकनाशन: ।।६७।।

६२४) **उदीर्ण :** – सर्व भूतमात्रामध्ये उठून दिसणारा, श्रेष्ठ.

६२५) **सर्वतश्चक्षु :** – ज्याला सगळीकडे नेत्र आहेत.

६२६) **अनीश :** – ज्याच्यावर स्वामित्व करणारा कोणीहि नाही.

६२७) **शाश्वतस्थिर :** – जो नित्य असून ज्याचे ठिकाणी कधीहि विकार उत्पन्न होत नाहीत असा.

६२८) **भूशय:** – भूमीवर झोपणारा, विरक्त. रामावतारामध्ये लंकेला जाण्यासाठी वाट मिळविण्याच्या शोधात असताना समुद्रतीरावर राम चंद्रांनी पृथ्वीवर शयन केले होते तो संदर्भ.

६२९) **भूषण :** – भूषित करणारा, शोभविणारा. ज्याने निरनिराळे अवतार धारण करून आपल्या बहुविध लीलांनी पृथ्वीला शोभविले.

६३०) **भूति:** – सत्तारूप, ऐश्वर्यरूप.

६३१) **विशोक :** – ज्याच्याजवळून शोक दूर गेला आहे.

६३२) **शोकनाशन:** – शोक नाहीसा करणारा.

## अर्चिष्मानर्चित: कुम्भो विशुद्धात्मा विशोधन: ।
## अनिरुद्धोऽप्रतिरथ: [६४०] प्रद्युम्नोऽमितविक्रम: ।।६८।।

**६३३) अर्चिष्मान्** – किरणयुक्त, प्रभायुक्त. सूर्यचंद्ररूप.

**६३४) अर्चित:** – पूजिलेला.

**६३५) कुम्भ:** – कुंभात, घड्यात जल वा इतर वस्तूं साठविल्या जातात त्याप्रमाणे ज्याच्यामध्ये सर्व काही साठविलेले आहे.

**६३६) विशुद्धात्मा** – सत्व-रज-तम या तीनहि गुणांहून वेगळा असलेला. पवित्र, शुद्ध.

**६३७) विशोधन:** – शुद्ध करणारा, पाप नाहीसे करणारा.

**६३८) अनिरुद्ध:** – ज्याला कोणीहि अडवू शकले नाहीत. अडवू शकत नाहीत. किंवा चार व्यूहांच्या कल्पनेतील चौथा अनिरुद्ध तो.

**६३९) अप्रतिरथ:** – ज्याच्याविरुद्ध कोणीहि नाही. ज्याला कोणीही विरोध करूं शकत नाही. ज्याच्या तोडीचे कोणी नाही.

**६४०) प्रद्युम्न:** – द्युम्न म्हणजे धन. ते ज्याच्याजवळ उत्कृष्ट आहे, विपुल आहे. किंवा चतुर्व्यूहातील तिसरा जो प्रद्युम्न तो. किंवा प्रद्युम्न म्हणजे मदन हे ज्याचे स्वरूप आहे.

**६४१) अमितविक्रम:** – ज्याच्या पराक्रमास तुलना नाही, माप नाही, मर्यादा नाही.

## कालनेमिनिहा वीर: शौरि: शूरजनेश्वर: ।
## त्रिलोकात्मा त्रिलोकेश: केशव: केशिहा हरि:[६५०] ।।६९ ।।

**६४२) कालनेमिनिहा** – कालनेमि नांवाच्या राक्षसाला ठार मारणारा.

**६४३) वीर:** – शूर, पराक्रमी.

**६४४) शौरि:** – शूर नांवाच्या कुलामध्ये जन्मास आलेला.

**६४५) शूरजनेश्वर:** – शूर म्हणून प्रख्यात असलेल्या इंद्रादींचाहि शासक, नियंता, स्वामी.

**६४६) त्रिलोकात्मा** – तिन्ही लोकांच्या मध्ये राहणारा, किंवा तिन्ही लोक हेच ज्याचे स्वरूप आहेत.

**६४७) त्रिलोकेश:** – तिन्ही लोकांचा स्वामी.

**६४८) केशव:** – केश = किरण, त्यांनी युक्त. ब्रह्मा, विष्णु, शिव

या रूपांनी ओळखल्या जाणाऱ्या शक्ति ज्याच्याजवळ आहेत.

६४९) **केशिहा** – केशि नांवाच्या राक्षसाला ठार मारणारा.

६५०) **हरिः** – हरण करणारा. अज्ञानरूप कारणासहित संसार नाहीसा करणारा.

## कामदेवः कामपालः कामी कान्तः कृतागमः ।
## अनिर्देश्यवपुर्विष्णुर्वीरोऽनन्तो धनंजयः[६६०] ।।७० ।।

६५१) **कामदेवः** – मदन. चारी पुरुषार्थ मिळविण्याची इच्छा करणारे ज्या देवाची कामना करतात.

६५२) **कामपालः** – कामनांचे रक्षण करणारा, कामना पूर्ण करणारा.

६५३) **कामी** – कामना करणारा, इच्छा असलेला किंवा कामना पूर्ण झालेला.

६५४) **कान्तः** – सुंदर शरीर धारण करणारा. सुस्वरूप, प्रियकर. किंवा क म्हणजे ब्रह्मदेव, प्रलयकाली त्याचाहि अंत करणारा.

६५५) **कृतागमः** – आगम म्हणजे शास्त्र. वेद, स्मृति, दर्शने इत्यादि. ती ज्याने रचिली आहेत.

६५६) **अनिर्देश्यवपुः** – ज्याचे स्वरूप ''असे या प्रकारचे आहे'' असे उल्लेखून सांगता येत नाही कारण भगवान् गुणातीत आहे.

६५७) **विष्णुः** – ज्याच्या कांतीने सर्व पृथ्वी आणि आकाश व्यापून टाकले आहे असा.

६५८) **वीरः** – पराक्रमी. वी या धातूच्या अर्थाप्रमाणे गमन करणारा, व्यापणारा, निर्माण करणारा, तेजस्वी, उपभोग घेणारा. असेहि अर्थ करता येतात.

६५९) **अनन्तः** – मर्यादारहित, अमर्याद. देश, काल, वस्तु यांनी न बांधला जाणारा, नाश न पावणारा, व्यापक, नित्य ज्याच्या सामर्थ्याचा, सद्‌गुणांचा पार देवगंधर्वादींनाहि लागत नाही असा.

६६०) **धनंजयः** – धन, संपत्ति जिंकणारा, किंवा पांडवातील अर्जुन ही ज्याची विभूति आहे.

## ब्रह्मण्यो ब्रह्मकृद् ब्रह्मा ब्रह्म ब्रह्मविवर्धनः ।
## ब्रह्मविद् ब्राह्मणो ब्रह्मी ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः[६७०] ।।७१ ।।

६६१) **ब्रह्मण्यः** – तप, वेद, ब्राह्मण, ज्ञान यांना ब्रह्म असे म्हणतात. या ब्रह्माला जो हितकारक आहे.

६६२) **ब्रह्मकृत्** – तप इत्यादि करणारा.

६६३) **ब्रह्मा** – ब्रह्मदेव, सृष्टी निर्माण करणारा.

६६४) **ब्रह्म** – वाढलेला, वाढणारा, विकासशील चैतन्याने युक्त. परब्रह्म.

६६५) **ब्रह्मविवर्धनः** – तप, वेद, ज्ञान इत्यादींना वाढविणारा.

६६६) **ब्रह्मविद्** – वेदादींना यथायोग्यपणें जाणणारा.

६६७) **ब्राह्मणः** – वेदाध्ययन करून वेदांचा उपदेश करणारा. ब्राह्मण ज्याचे स्वरूप आहे.

६६८) **ब्रह्मी** – तप, वेद, ज्ञान, मन, प्राण इत्यादि ब्रह्म शब्दाने ओळखिले जाणारे भाव ज्याच्यामध्ये राहतात.

६६९) **ब्रह्मज्ञः** – ब्रह्माला किंवा वेदाला जाणणारा.

६७०) **ब्राह्मणप्रियः** – ब्राह्मणांना अतिशय प्रिय असलेला. किंवा ब्राह्मण ज्याला फार आवडतात.

## महाक्रमो महाकर्मा महातेजा महोरगः ।
## महाक्रतुर्महायज्वा महायज्ञो महाहविः ।। ७२ ।।

६७१) **महाक्रमः** – ज्याचा क्रम म्हणजे पाऊल टाकणे महान् आहे. वामनावताराला उद्देशून हे नांव प्राप्त झाले आहे.

६७२) **महाकर्मा** – ज्याचे कर्म मोठे आहे. विश्वोत्पत्तीच्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे.

६७३) **महातेजा** – ज्याच्या तेजात सूर्यादि अत्यंत तेजस्वी ग्रह नक्षत्रगोल प्रकाशित होतात अशा महान् तेजाने युक्त. अत्यंत तेजस्वी.

६७४) **महोरगः** – वासुकीसारखे प्रचंड सर्प हे ज्याचे स्वरूप आहे.

६७५) **महाक्रतु:** – अश्वमेधासारखे प्रचंड यज्ञ हे ज्याचे स्वरूप आहे.

६७६) **महायज्वा** – यज्वा म्हणजे यज्ञ करणारा यजमान, यज्ञ करणाऱ्यांमध्येहि महान असलेला.

६७७) **महायज्ञ:** – वाजपेय, अश्वमेध यासारखे मोठे यज्ञ हे ज्याचे स्वरूप आहे.

६७८) **महाहवि:** – यज्ञाग्नीत टाकल्या जाणाऱ्या द्रव्यास हवि असे म्हणतात. महान स्वरूपात असलेले हविर्द्रव्य हे ज्याचें स्वरूप आहे. जगत् हे ब्रह्मरूप आहे. व महाप्रलयामध्ये ब्रह्मरूप अग्नीत त्याचेच हवन होते या तात्त्विक संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे.

## स्तव्य: स्तवप्रिय:[६८०] स्तोत्रं स्तुति: स्तोता रणप्रिय: । पूर्ण: पूरयिता पुण्य: पुण्यकीर्तिरनामय: ।।७३ ।।

६७९) **स्तव्य:** – स्तुति केली जाण्यास योग्य.

६८०) **स्तवप्रिय:** – स्वत:ची केली जाणारी स्तुति ज्याला आवडते.

६८१) **स्तोत्रम्** – जिच्या सहाय्याने स्तुति केली जाते ती भाषा, प्रार्थना, कविता. तिला स्तोत्र असे म्हणतात. ते स्तोत्र हेच ज्याचे स्वरूप आहे.

६८२) **स्तुति:** – स्तवन करण्याच्या क्रियेला स्तुति असे म्हणतात. ती स्तुति हेच ज्याचे स्वरूप आहे.

६८३) **स्तोता** – स्तवन करणारा, स्तुति करणारा भक्त तोच ज्याचे स्वरूप आहे.

६८४) **रणप्रिय:** – ज्याला रणांगण आवडते. युद्धाचा, संघर्षाचा ज्याला कंटाळा नाही.

६८५) **पूर्ण:** – ज्याच्या सर्व प्रकारच्या कामना सिद्धीस गेल्या आहेत. सर्व प्रकारच्या सामर्थ्याने, ऐश्वर्याने, संपत्तीने, सद्गुणाने जो भरलेला आहे. सर्व कांही व्यापून जो उरला आहे. ज्याच्याजवळ कशाचाहि अपुरेपणा वा अभाव नाही.

६८६) **पूरयिता** – पूर्ण करणारा, पुरविणारा, भरणारा. स्वत: पूर्ण असून जो दुसऱ्यालाहि सर्व प्रकारे पूर्ण करतो असा.

६८७) **पुण्य:** – पुण्यस्वरूप, पवित्र, मंगल.

६८८) **पुण्यकीर्ति:** – ज्याची कीर्ति गायिली असता पुण्य लागते. पाप नाहीसे होते. किंवा ज्याची कीर्ति, पुण्यस्वरूप, अत्यंत पवित्र अशी आहे.

६८९) **अनामय:** – आमय = रोग. रोगविरहित. आरोग्य संपन्न. आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक अशा तिन्ही प्रकारच्या तापापासून मुक्त झालेला.

६९०

## मनोजवस्तीर्थकरो वसुरेता वसुप्रद: ।
## वसुप्रदो वासुदेवो वसुर्वसुमना हवि: ।। ७४ ।।

६९०) **मनोजव:** – मनाप्रमाणे शीघ्र वेग असलेला.

६९१) **तीर्थकर:** – सर्व विद्यांना तीर्थ असे म्हणतात. त्या सर्व प्रकारच्या वेदमान्य आणि वेदबाह्य अशा विद्यांचा जो ज्ञाता आणि वक्ता आहे.

६९२) **वसुरेता** – ज्याचे वीर्य सुवर्णमय आहे. किंवा सर्व प्रकारचे ऐश्वर्य, संपत्ती ज्याच्या बीजापासून उत्पन्न झाली आहे.

६९३) **वसुप्रद:** – विपुलपणे धन देणारा.

६९४) **वसुप्रद:** – मोक्षरूप उत्कृष्ट फल देणारा किंवा 'दा' धातूचा तोडणे असा जो अर्थ आहे त्याला अनुसरून दुष्टांचे ऐश्वर्य नष्ट करणारा.

६९५) **वासुदेव:** – वसुदेवाचा पुत्र.

६९६) **वसु:** – सर्व भूते ज्याच्यामध्यें राहतात वा जो सर्व भूतांच्यामध्यें राहतो.

६९७) **वसुमना:** – ज्याचे मन ऐश्वर्याने युक्त आहे. सर्व ठिकाणी समभावाने राहण्यात त्याला आनंद आहे.

६९८) **हवि:** – हवन करण्याचे द्रव्य हे ज्याचे स्वरूप आहे.

## सद्गति: सत्कृति:७०० सत्ता सद्भूति: सत्परायण: ।
## शूरसेनो यदुश्रेष्ठ: सन्निवास: सुयामुन: ।। ७५ ।।

६९९) **सद्गतिः** – सज्जनांना मोक्ष देणारा, उत्कृष्ट गतिरूप मोक्ष ते ज्याचे स्वरूप आहे. किंवा गति म्हणजे बुद्धि, त्या अर्थाने उत्कृष्ट बुद्धीने युक्त.

७००) **सत्कृतिः** – ज्याची कृत्यें चांगली असतात. चांगली कृत्ये करणारा.

७०१) **सत्ताः** – अस्तित्वाने युक्त, स्वगत, सजातीय, विजातीय भेदाने रहित अशी जी असणेपणाची जाणीव तिला सत्ता असे म्हणतात. ती ज्याचे स्वरूप आहे.

७०२) **सद्भूतिः** – सत्स्वरूप असून जो अनेक प्रकारे व्यक्त होतो, भासमान होतो असा.

७०३) **सत्परायणः** – सज्जनांचे श्रेष्ठ असे आश्रयस्थान.

७०४) **शूरसेनः** – ज्याच्या सेनेमध्यें हनुमान, अर्जुन यांच्यासारखे पराक्रमी वीर आहेत. किंवा सेनेमध्यें म्हणजे सर्व लोकांमध्यें जो पराक्रमी आहे.

७०५) **यदुश्रेष्ठः** – यदुकुलातील सर्व लोकात श्रेष्ठ.

७०६) **सन्निवासः** – सत्पुरुषांचे निवासस्थान. किंवा संतजनांमध्ये राहणारा.

७०७) **सुयामुनः** – यमुनेच्या आसमंतात असणारा तो यामुन. अशा यमुनातीरावरील सर्व परिवारामध्यें शोभणारा. गोकुळ आणि मथुरा ही भगवंताची दोन्हीहि लीलाक्षेत्रे यमुनेच्या तीरावर आहेत. त्या संदर्भात हे नाव प्राप्त झाले आहे.

७१०

**भूतावासो वासुदेवः सर्वासुनिलयोऽनलः ।**
**दर्पहा दर्पदो दृप्तो दुर्धरोऽथापराजितः ।। ७६ ।।**

७०८) **भूतावासः** – सर्व भूतांमध्ये राहणारा किंवा सर्व ज्याच्यामध्ये राहते असा.

७०९) **वासुदेव** : – स्वतःच्या मायेने सर्व जगताचे आच्छादन करणारा असा देव.

७१०) **सर्वासुनिलयः** – सर्वांचे असु म्हणजे प्राण ज्याच्यामध्यें राहतात किंवा ज्याच्यामध्यें लीन होतात.

७११) **अनलः** – अग्निस्वरूप, ज्याच्या शक्तिसंपत्तीला मर्यादा नाही असा.

७१२) **दर्पहा** – दर्प, उन्मत्तता नाहीशी करणारा.

७१३) **दर्पदः** – गौरव, स्वाभिमान देणारा.

७१४) **दृप्तः** – आपापल्या ठिकाणीच आनंदात रममाण असल्यामुळे अन्य कशाचीहि क्षिति नसलेला.

७१५) **दुर्धरः** – ज्याला धरून ठेवणे दुर्घट आहे असा. भगवान निरुपाधिक असल्यामुळे सहजासहजी गंवसत नाहीत आणि धरण्याची इच्छा करणारा साधक पुरेसा विरक्त, एकनिष्ठ किंवा भक्त नसल्यामुळे भगवंत क्वचित सांपडला तरी धरून ठेवता येत नाही.

[**अथ – पादपूर्णार्थक अव्यय.**

**अथ –** सृष्टीचे आरंभी ब्रह्मदेवाचे मुखातून निघाल्याने तो शब्द मंगल आहे. तो शब्दच ज्याचे स्वरूप आहे – (हे नाव स्वतंत्र धरल्याने एक नाव वाढेल व एक पुनरुक्त उणावेल)]

७१६) **अपराजित :** – ज्याचा पराजय करणे शक्य नाही. जो कोणाकडूनहि पराजित होत नाही.

## विश्वमूर्तिर्महामूर्तिर्दीप्तमूर्तिरमूर्तिमान्[७२०] ।
## अनेकमूर्तिरव्यक्तः शतमूर्तिः शताननः ।। ७७ ।।

७१७) **विश्वमूर्तिः** – विश्व हीच ज्याची मूर्ति आहे.

७१८) **महामूर्तिः** – ज्याचे स्वरूप वा आकृति प्रचंड आहे.

७१९) **दीप्तमूर्तिः** – ज्याचे स्वरूप तेजस्वी, प्रकाशमान आहे.

७२०) **अमूर्तिमान्** – जो व्यक्त रूप धारण करीत नाही किंवा ज्याचा देह प्रारब्धादि कर्मांमुळे प्राप्त होणारा नसतो.

७२१) **अनेकमूर्तिः** – निरनिराळ्या अवतारांच्या रूपाने ज्याने अनेक प्रकारची स्वरूपे धारण केली आहेत.

७२२) **अव्यक्तः** – प्रगट नसणारा, 'असा, या प्रकारचा' या विशिष्टतेने ज्याचे वर्णन करता येत नाही.

७२३) **शतमूर्तिः** – शतावधी रूपे धारण करणारा.

७२४) **शताननः** – शतावधी मुखे असलेला.

## एको नैक: सव: क: किं यत्[७३०] तत् पदमनुत्तमम् ।
## लोकबन्धुर्लोकनाथो माधवो भक्तवत्सल: ।।७८।।

**७२५) एक:** – परमार्थत: ज्याच्यामध्ये भेद दाखविता येत नाहीत. किंवा ज्याच्या व्यतिरिक्त वेगळे असे काही नाही.

**७२६) नैक:** – मायेच्या बळावर अनेक रूपे धारण करणारा.

**७२७) सव:** – सोमरस ज्यामध्ये काढला जातो अशा यज्ञाला सव म्हणतात. तो सव ज्याचें स्वरूप आहे.

**७२८) क:** – क: शब्दाचा अर्थ सुख असा आहे. ते ज्याचे स्वरूप आहे किंवा क म्हणजे ब्रह्मदेव वा ब्रह्म ते ज्याचे स्वरूप आहे किंवा संपूर्ण ज्ञानाच्या अशक्यतेमुळे आश्चर्यचकित होऊन ज्याच्याविषयी कोण असा प्रश्न केला जातो.

**७२९) किम्** – विचार करण्यासारखे जे एकमेव तत्त्व आहे त्या ब्रह्मास किम् असे म्हणतात. ते ज्याचे स्वरूप आहे.

**७३०) यद्** – हे सर्वनाम स्वत:सिद्ध अशा वस्तूचे वाचक आहे म्हणून ब्रह्मरूपाने ते भगवंतासाठी वापरले जाते.

**७३१) तद्** – ज्याच्या साहाय्याने ओळख करून दिली जाते. म्हणजे पटण्याचे जे महत्त्वाचे साधन व यद् रूपाने ते त्यापूर्वीहि अस्तित्वात असते ते. 'तद्' म्हणजे 'ते' या पदाने ओळखले जाणारे ब्रह्म हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा 'तद्' शब्दाचा विस्तार करणे असाहि अर्थ आहे. ब्रह्मामधेहि तो आहे म्हणून विस्तार पावलेला, विस्तार करणारा असाहि अर्थ या नांवाचा होतो.

**७३२) पदमनुत्तमम्** – ज्याच्यापेक्षा उत्कृष्ट दुसरे कांही नाही असे पद जे मोक्ष तेच ज्याचे स्वरूप आहे.

**७३३) लोकबन्धु:** – लोकांचा हितकर्ता किंवा ज्याच्यामध्ये सर्वलोक बांधले जातात म्हणजे ज्याच्या आधाराने सर्व लोक राहतात.

**७३४) लोकनाथ:** – लोकांचा स्वामी. किंवा लोक ज्याच्या प्राप्तीची याचना करतात असा.

**७३५) माधव :** – मधुकुलामध्ये उत्पन्न झालेला किंवा लक्ष्मीचा पति.

**७३६) भक्तवत्सल :** – भक्तांच्याविषयी स्नेहयुक्त, प्रेमळ.

७४०

## सुवर्णवर्णो हेमाङ्गो वराङ्गश्चन्दनाङ्गदी ।
## वीरहा विषम: शून्यो घृताशीरचलश्चल: ।।७९ ।।

**७३७) सुवर्णवर्ण :** – ज्याची अंगकांति सुवर्णाप्रमाणे आहे.

**७३८) हेमाङ्ग:** – ज्याची अंगे सोन्यासारखी आहेत.

**७३९) वराङ्ग:** – ज्याचे अवयव वा अंग सौंदर्यामध्ये व सामर्थ्यामध्ये अत्यंत श्रेष्ठ आहे.

**७४०) चन्दनाङ्गदी** – ज्याचे शरीर चंदनाच्या उटीने आणि बाहूभूषणांनी सुशोभित झालेले आहे.

**७४१) वीरहा** – रणांगणामध्यें शत्रुपक्षातील वीरांचा नाश करणारा.

**७४२) विषम:** – ज्याच्यासारखा दुसरा कोणी नाही. किंवा ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे भोग देत असल्यामुळे व्यवहारत: ज्याच्या कृतीत वेगवेगळेपणा दिसतो.

**७४३) शून्य:** – अपेक्षेने युक्त असलेल्या सत् व असत्, आहे वा नाही अशा भावाच्या पलीकडील असल्यामुळे इंद्रियगम्य ज्ञानाच्या पलीकडे असल्यामुळे, गुणरहित, आकाररहित असल्यामुळे, कोणत्याहि प्रकाराने वस्तुत: वर्णन करून सांगता येत नसल्यामुळे ब्रह्माचे वर्णन शून्य या शब्दाने केले जाते. याचा अर्थ वर वर्णन केलेल्या वस्तुस्थितीमुळे ते शून्यासारखे आहे. असे म्हणून ब्रह्माची जी काही वस्तुस्थिती आहे तिच्याजवळ वर्णनाच्या सहाय्याने जाण्याचा हा एक प्रयत्न आहे. शून्य शब्दाचा अर्थ अभावात्मक नाही. शून्य हे नांवहि एक प्रकारे ब्रह्माचे तटस्थ लक्षणच आहे.

**७४४) घृताशी :** – घृत हे ओज, तेज वाढविणारे बुद्धिवर्धक, पुष्टिवर्धक असे आहे. त्या घृतासारखे परिणाम करणारे ज्याचे आशीर्वाद आहेत. किंवा ज्याच्या आशा, आकांक्षा घृताप्रमाणे परिणाम करणाऱ्या आहेत. किंवा तूप जसे उष्णतेने वितळते त्या प्रमाणे ज्याच्या आशा, आकांक्षा वितळून जाऊन जो निष्काम झाला आहे. घृतासारख्या सारभागाचे जो भक्षण करतो. सार तेच घेतो.

**७४५) अचल:** – स्वरूप, सामर्थ्य वा ज्ञानऐश्वर्यादि धर्म यांच्यापासून जो कधीहि चलित होत नाही. स्थिर, न हालणारा.

**७४६) चल:** – गतिरूप. वायू हे ज्याचे स्वरूप आहे.

७५०

## अमानी मानदो मान्यो लोकस्वामी त्रिलोकधृक् ।
## सुमेधा मेधजो धन्यः सत्यमेधा धराधरः ।।८० ।।

**७४७) अमानी** – अभिमान नसलेला. मानसन्मानाची इच्छा नसलेला. भगवान शुद्ध, ज्ञानस्वरूप असल्यामुळे अनात्म, जड, मायिक अशा वस्तूंविषयी त्याला अभिमान नसतो.

**७४८) मानद:** – मान देणारा. किंवा मानाचे खंडण करणारा. भक्तांचा सन्मान करणारा किंवा भक्तांविषयी सन्मान बाळगणारा; दुर्जनांच्या अभिमानाचा नाश करणारा किंवा आपल्या मायेने ज्ञानाला आच्छादित करून जीवाच्या ठिकाणी अनात्मवस्तूंविषयी वैषयिक, मायिक गोष्टीविषयी मी आणि माझे असा अभिमान उत्पन्न करणारा.

**७४९) मान्य:** – सर्वांना माननीय, आदरणीय असलेला.

**७५०) लोकस्वामी** – चौदाहि भुवनांचा धनी.

**७५१) त्रिलोकधृक्** – तिन्ही लोकांचे धारण करणारा.

**७५२) सुमेधा** – ज्याची मेधा म्हणजे धारणाशक्ति, ग्रहणशक्ति किंवा प्रेरणा उत्तम आहे.

**७५३) मेधज:** – मेध म्हणजे यज्ञ. यज्ञामुळे वा यज्ञात प्रगट होणारा. यज्ञ हा ईश्वरप्राप्तीचा एक मार्ग असल्यामुळे किंवा रामावताराच्या वेळी दशरथाने केलेल्या पुत्रकामेष्टी यज्ञामुळे भगवंत प्रगट झाले म्हणून हे नांव प्राप्त झाले आहे.

**७५४) धन्य:** – कृतकृत्य, कृतार्थ. ज्याची संकल्पित व आवश्यक कर्तव्ये यशस्वीरीत्या संपूर्णपणे पार पडली आहेत असा.

**७५५) सत्यमेधा:** – परमेश्वराची मेधा म्हणजे बुद्धि सत्य आहे. त्यांत कोणत्याहि प्रकारे चंचलता व उणीव येत नाही असा.

**७५६) धराधर:** – पृथ्वीचे धारण करणारा.

## तेजोवृषो द्युतिधरः सर्वशस्त्रभृतां वरः ।
## [७६०] प्रग्रहो निग्रहो व्यग्रो नैकशृङ्गो गदाग्रजः ।।८१।।

**७५७) तेजोवृषः** – आदित्यरूपाने, सूर्यरूपाने, तेजाची जलाची वृष्टी करणारा.

**७५८) द्युतिधरः** – तेज, कांति, प्रभा धारण करणारा.

**७५९) सर्वशस्त्रभृतां वरः** – शस्त्र धारण करणाऱ्या सर्व शूर, वीर योध्यांच्यामधे श्रेष्ठ.

**७६०) प्रग्रहः** – विशेषरूपाने ग्रहण करणारा. भक्तांनी समर्पण केलेली पानेफुलेही प्रेमाने स्वीकारणारा. किंवा प्रग्रह म्हणजे लगाम. लगाम ज्याप्रमाणे अवखळ घोड्यालाहि आवरून योग्य मार्गावर ठेवतो त्याप्रमाणे जो इंद्रिय आणि मन यांना आवरून योग्य मार्गांवर ठेवण्यास सहाय्य करतो.

**७६१) निग्रहः** – स्वतःच्या स्वाधीन करून घेऊन नियमन करणारा.

**७६२) व्यग्रः** – ज्याचे अग्र म्हणजे टोक वा शेवट नाहीसे झाले आहे, जो अविनाशी आहे. किंवा धर्मस्थापनेच्या कार्यात वा भक्तांना पावण्यात जो गढून गेला आहे.

**७६३) नैकशृङ्गः** – ज्याला अनेक शिंगे आहेत. वेदामध्यें अग्निरूपाने प्रगट झालेल्या महादेव रुद्राचे चार शिंगे असलेला असे वर्णन आले आहे.

**७६४) गदाग्रजः** – गद नांवाच्या वसुदेवपुत्राचा थोरला भाऊ.

## चतुर्मूर्तिश्चतुर्बाहुश्चतुर्व्यूहश्चतुर्गतिः ।
## चतुरात्मा [७७०] चतुर्भावश्चतुर्वेदविदेकपात् ।। ८२ ।।

**७६५) चतुर्मूर्तिः** – विराट, सूत्रात्मा, अव्याकृत आणि तुरीय या भगवंताच्या चार मूर्ति आहेत. त्यांच्या रूपाने प्रगट झालेला. किंवा श्वेत, रक्त, पीत, कृष्ण अशी चार रंगाची रूपे चार युगामध्ये धारण करणारा.

**७६६) चतुर्बाहुः** – ज्याला चार हात आहेत असा.

७६७) **चतुर्व्यूह:** – चार व्यूह (रचना विशेष) असलेला किंवा शरीरपुरुष, छंदपुरुष, वेदपुरुष आणि महापुरुष याप्रमाणे ऐतरेयात सांगितलेले चार व्यूह, रूपविशेष धारण करणारा. किंवा पांचरात्र वैष्णव मताने घेतलेला व्यूह; वासुदेव–संकर्षण–प्रद्युम्न–अनिरुद्ध.

७६८) **चतुर्गतिः** – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण; ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यास हे चारी आश्रम; वा धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ; कर्म, भक्ति, योग, ज्ञान हे चारहि मार्ग शेवटी ज्याच्यापर्यंत जाऊन पोचतात असा.

७६९) **चतुरात्मा** – ज्याचे मन, बुद्धि हे चतुर आहेत असा. चातुर्ययुक्त. किंवा मन, बुद्धि, चित्त, अहंकार किंवा मन, बुद्धि, इच्छा, अहंकार या अंत:करण चतुष्टयाने जो युक्त आहे.

७७०) **चतुर्भाव:** – चार वर्ण, चार आश्रम, चार पुरुषार्थ वा चार मार्ग यांना निर्माण करणारा.

७७१) **चतुर्वेदविद्** – चारहि वेदांचे यथावत् ज्ञान असलेला.

७७२) **एकपाद्** – एक चाकाच्या रथाने युक्त असलेला सूर्य हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा संपूर्ण विश्व हाच ज्याचा एक पाय आहे.

## समावर्तोऽनिवृत्तात्मा दुर्जयो दुरतिक्रम: ।
## दुर्लभो दुर्गमो दुर्गो दुरावासो दुरारिहा ।। ८३ ।।

७७३) **समावर्तः** – संसारचक्राला चांगल्या रीतीने फिरविणारा.

७७४) **अनिवृत्तात्मा** – जो सर्वत्र सारखेपणाने व्यापून आहे. जो कोठेहि नाही अशी स्थिति नाही. 'निवृत्तात्मा' असा संधी सोडविल्यास– अलिप्त.

७७५) **दुर्जयः** – ज्याला जिंकणे शक्य नाही.

७७६) **दुरतिक्रमः** – ज्याचे अतिक्रमण करणे शक्य नाही, म्हणजे ज्याची आज्ञा मोडणे शक्य नाही.

७७७) **दुर्लभः** – ज्याला प्राप्त करून घेणे अवघड आहे.

७७८) **दुर्गमः** – ज्याच्याविषयी ज्ञान मिळविणे कठिण आहे.

**७७९) दुर्गः** – ज्याच्यापर्यंत जाऊन पोंचणे दुष्कर आहे.

**७८०) दुरावास :** – ज्याला ठेवून घेणे, राहविणे, बसविणे कठिण आहे. योगी मोठ्या कष्टाने, प्रयत्नपूर्व ज्याला आपल्या हृदयामध्ये ध्यानादींच्या बळावर बसवू शकतात.

**७८१) दुरारिहा** – दुष्ट शत्रूंचा नाश करणारा.

## शुभाङ्गो लोकसारङ्गः सुतन्तुस्तन्तुवर्धनः ।
## इन्द्रकर्मा महाकर्मा कृतकर्मा कृतागमः ।।८४।।

**७८२) शुभाङ्गः** – सुंदर कल्याणकर देह धारण करणारा.

**७८३) लोकसारङ्गः** – सारंग म्हणजे भ्रमर. तो जसा फुलातील सारभाग ग्रहण करतो त्याप्रमाणे लोकामंधील चांगलेपणाचा स्वीकार करणारा. किंवा प्रणवाला, ॐकाराला लोकसार असे म्हणतात. त्या प्रणवाच्या सहाय्याने ज्याचे ज्ञान होते.

**७८४) सुतन्तु :** – विश्वरूपी पटाला कारणीभूत असलेला उत्तम असा तंतू.

**७८५) तन्तुवर्धनः** – जगद्रूपी पटाला कारणीभूत असलेल्या प्रकृतिरूप तंतूची वृद्धि करणारा, किंवा प्रकृतीरूप तंतूचे छेदन करणारा.

**७८६) इन्द्रकर्मा** – इंद्राप्रमाणे कृत्ये करणारा.

**७८७) महाकर्मा** – ज्याचे विश्वरूप कर्म महान आहे असा.

**७८८) कृतकर्मा** – ज्याची कर्तव्ये पार पडली आहेत असा.

**७८९) कृतागमः** – ज्याने वेदशास्त्रे निर्माण केली आहेत असा.

७९०
## उद्भवः सुन्दरः सुन्दो रत्ननाभः सुलोचनः ।
## अर्को वाजसनः शृङ्गी जयन्तः सर्वविज्जयी ।।८५।।

**७९०) उद्‌भव :** – उत्कृष्ट जन्म स्वतःच्या इच्छेने धारण करणारा किंवा सर्वांचे कारण असल्यामुळे जन्म नांवाची अवस्था ज्याला प्राप्तच होत नाही. सर्वांचे उगमस्थान.

**७९१) सुन्दर :** – सुस्वरूप, सौभाग्यशाली.

७९२) **सुन्द:** – करुणाकर, दयाळू.

७९३) **रत्ननाभ:** – रत्नाप्रमाणे सुंदर नाभी असलेला. किंवा ज्याची नाभी रत्नांनी सुशोभित आहे.

७९४) **सुलोचन:** – ज्याचे डोळे किंवा ज्ञान सुंदर आहेत असा.

७९५) **अर्क:** – सूर्यस्वरूप.

७९६) **वाजसन:** – अन्नाचे दान करणारा.

७९७) **शृङ्गी** – शिंग असलेला. मत्स्यावताराला उद्देशून हे नांव आले आहे.

७९८) **जयन्त:** – इंद्राचा पुत्र हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा सर्वदा जय मिळविणारा. शत्रूंना जिंकणारा.

७९९) **सर्वविज्जयी** – सर्व विषयाचे ज्ञान असल्यामुळे जो सर्वदा विजयी होतो असा.

## ८०० सुवर्णबिन्दुरक्षोभ्य: सर्ववागीश्वरेश्वर: ।
## महाह्रदो महागर्तो महाभूतो महानिधि: ।।८६ ।।

८००) **सुवर्णबिन्दु:** – ज्याचे अवयव सोन्यासारखे आहेत. किंवा ज्याच्यामध्ये चांगले वर्ण व बिन्दु आहेत असा मंत्रस्वरूप ॐकार हे ज्याचे स्वरूप आहे.

८०१) **अक्षोभ्य:** – ज्याला क्षुब्ध करता येत नाही. रागद्वेषादि विकारांनी, शब्दस्पर्शादि विषयांनी किंवा शत्रूंच्या कृत्यांनी ज्याचे अंत:करण चलित होत नाही.

८०२) **सर्ववागीश्वरेश्वर:** – वागीश्वर-वाणीचे वा विद्येचे स्वामी असे जे व्यास, ब्रह्मदेवादि त्या सर्वांचा धनी.

८०३) **महाह्रद:** – विशाल सरोवर हे ज्याचे स्वरूप आहे. सरोवरामध्ये जलक्रीडा करावी त्याप्रमाणे भक्त, ज्ञानी, योगी ज्याच्यामध्ये आनंदाने पोहत असतात.

८०४) **महागर्त:** – ओलांडण्यास कठिण अशी विशाल दरी. भगवंताची माया पार न लावता येण्याइतकी कठिण आहे. व ती भगवंताजवळ असते. त्या संदर्भात हे नांव प्राप्त झाले आहे. किंवा गर्त

म्हणजे रथ ज्याचा विशाल आहे वा जो महारथी आहे.

८०५) **महाभूतः** – पंचमहाभूते हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा जो तिन्ही कालाच्या अतीत असल्यामुळे भूतसमुदायापेक्षा श्रेष्ठ आहे.

८०६) **महानिधिः** – सर्व काही ज्याच्यामध्ये साठविले जाते असा.

**कुमुदः कुन्दरः कुन्दः [८१०] पर्जन्यः पावनोऽनिलः ।**
**अमृतांशोऽमृतवपुः सर्वज्ञः सर्वतोमुखः ।।८७ ।।**

८०७) **कुमुदः** – पृथ्वीला आनंदित करणारा.

८०८) **कुन्दरः** – पृथ्वीचे विदारण करणारा. वराह अवतारामध्ये हिरण्याक्षाला शोधण्यासाठी भगवान पृथ्वीला विवर करून पाताळापर्यंत गेले या कथेच्या संदर्भात हे नाव प्राप्त झाले आहे. किंवा कुंदाच्या फुलाप्रमाणे शुद्ध फले देणारा. किंवा कुंदाच्या फुलाप्रमाणे जे शुद्ध, पवित्र असते त्याचा स्वीकार करणारा.

८०९) **कुन्दः** – कुंदाप्रमाणे सुंदर, स्वच्छ शरीर असलेला किंवा कश्यपाला ज्याने पृथ्वीचे दान केले आहे असा.

८१०) **पर्जन्यः** – पृथ्वीवर समृद्धि आणणारा पाऊस हे ज्याचे स्वरूप आहे किंवा पाऊस जसा वरसतो त्याप्रमाणे इच्छित वरांचा वर्षाव करणारा.

८११) **पावनः** – पवित्र करणारा. शुद्ध करणारा, पाप नाहीसे करणारा.

८१२) **अनिलः** – प्रेरणारहित किंवा जागरूक. अज्ञानरहित किंवा ज्याचे ठिकाणी प्राप्तीची कठिणता नाही असा सुलभ. वायु.

८१३) **अमृतांशः** – अमृत ज्याचा अंश आहे वा अवताररूपात जो अमृताचा म्हणजे ब्रह्माचा अंश आहे. (अमृताशः असा पाठ घेतला तर) अमृताचे सेवन करणारा किंवा ज्याची आशा, इच्छा अमृतस्वरूप आहे.

८१४) **अमृतवपुः** – ज्याचे शरीर अमर आहे.

८१५) **सर्वज्ञः** – सर्व कांही जाणणारा.

८१६) **सर्वतोमुखः** – सगळीकडे मुखे असलेला.

## सुलभः सुव्रतः सिद्धः शत्रुजिच्[८२०]छत्रुतापनः ।
## न्यग्रोधोदुम्बरोऽश्वत्थश्चाणूरान्ध्रनिषूदनः ।।८८ ।।

८१७) **सुलभः** – मिळविण्यास सोपा. भक्तीने अर्पण केलेल्या पानफुलानेहि जो प्रसन्न होतो असा.

८१८) **सुव्रतः** – ज्याने चांगले व्रत स्वीकारले आहे असा. धर्माचे संस्थापन करणे, भक्तांचा योगक्षेम वाहणे, दुष्टांचे पारिपत्य करणे इत्यादि कल्याणकारी व्रते ज्याने स्वीकारली आहेत असा.

८१९) **सिद्धः** – स्वतःच्या इच्छा पूर्ण करून घेणे हे ज्याचे त्याच्या स्वतःच्या स्वाधीन आहे. आपल्या इच्छापूर्तीकरिता ज्याला दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत नाही.

८२०) **शत्रुजित्** – शत्रूंना जिंकणारा.

८२१) **शत्रुतापनः** – शत्रूंना पीडा देणारा.

८२२) **न्यग्रोधः** – वटवृक्ष हे ज्याचे स्वरूप आहे. जो सर्वांच्या खाली आणि वर विराजमान आहे.

८२३) **उदुम्बरः** – आकाशाच्याहि पलीकडे असलेला. किंवा पोषण करणारे अन्न हे ज्याचे स्वरूप आहे. उंबरासारखा पवित्र वृक्ष ज्याचे स्वरूप आहे.

८२४) **अश्वत्थः** – पिंपळ ही ज्याची विभूति आहे किंवा उद्यापर्यंतही न राहणारे भंगुर जगत् हे ज्याचे स्वरूप आहे.

८२५) **चाणूरान्ध्रनिषूदनः** – आंध्रप्रदेशातील चाणूर नांवाच्या दैत्याला ठार मारणारा.

## सहस्त्रार्चिः सप्तजिह्वः सप्तैधाः सप्तवाहनः ।
## [८३०]अमूर्तिरनघोऽचिन्त्यो भयकृद् भयनाशनः ।।८९ ।।

८२६) **सहस्त्रार्चिः** – सहस्रावधि किरणे असलेला.

८२७) **सप्तजिह्वः** – सात जिभा असलेला अग्नि हे ज्याचे स्वरूप आहे. काली, कराली, मनोजवा, लोहिता, धूम्रवर्णा, स्फुल्लिंगिनी, विश्वरुचि या देवतास्वरूप अग्नीच्या सात जिभा मानल्या जातात.

८२८) **सप्तैधाः** – ज्याच्या हवनासाठी सात समिधा वापरल्या जातात असा अग्नि हे ज्याचे स्वरूप आहे.

८२९) **सप्तवाहन:** – सात वर्णांचे किरण हे ज्याचे घोडे आहेत असा सूर्य हे ज्याचे स्वरूप आहे.

८३०) **अमूर्ति:** – ज्याची आकृती–रूप अव्यक्त आहे.

८३१) **अनघ :** – निष्पाप.

८३२) **अचिन्त्य:** – ज्याचे चिंतन करणे कठिण आहे असा. प्रमाणांना वा इंद्रियांना जो अविषय आहे.

८३३) **भयकृत्** – भय उत्पन्न करणारा, भिवविणारा, अधर्माने वागणाऱ्याला जो घाबरवितो.

८३४) **भयनाशन:** – भय नाहीसे करणारा, भक्तांना अभय देणारा.

## अणुर्बृहत् कृशः स्थूलो गुणभृन्निर्गुणो[८४०] महान् ।
## अधृतः स्वधृतः स्वास्यः प्राग्वंशो वंशवर्धनः ।।९० ।।

८३५) **अणु:** – परिमाणाने अत्यंत सूक्ष्म. कोणत्याहि द्रव्याच्या अंतिम विभागाला अणु असे म्हणतात. सर्व वस्तु शेवटी भगवद्रूप असल्याने हे नांव प्राप्त झाले आहे.

८३६) **बृहत्** – परिमाणाने मोठा.

८३७) **कृशः** – बारीक, उपाधिरहित.

८३८) **स्थूल:** – जाड, लठ्ठ, सहज दिसणारा. सर्व विश्व हे भगवंताचे स्वरूप असल्यामुळे हे नांव प्राप्त झाले आहे.

८३९) **गुणभृत्** – सत्व, रज, तम या तीन गुणांना धारण करणारा. सर्व सद्गुणांनी युक्त.

८४०) **निर्गुण:** – गुणसंबंधरहित. त्रिगुणातीत.

८४१) **महान्** – बुद्धिस्वरूप. जगत्कारण प्रकृतिपासून सत्वगुणप्रधान असे जे पहिले तत्त्व निर्माण होते त्याला महान् असे म्हणतात. तेच भगवंताचे रूप आहे. किंवा थोर, मोठा, श्रेष्ठ. भगवान गुणरहित, नित्यशुद्ध आणि सर्वव्यापक असल्यामुळे कोणत्याहि प्रकारचे दोष त्याचे ठिकाणी संभवत नाहीत. म्हणून त्यांना महान्, थोर असे म्हटले आहे.

८४२) **अधृत:** – कुणीही धारण न केलेला. ज्याला कशाचाहि, कोणाचाहि आधार लागत नाही असा.

८४३) **स्वधृतः** – उत्तम प्रकारे धरला गेलेला. निराधार वस्तु टिकत नाहीत. डळमळतात. परमेश्वराची स्थिति तशी नाही. तो स्वतःच्याच थोरवीमध्ये चांगल्या रीतीने प्रतिष्ठित आहे.

८४४) **स्वास्य :** – सुंदर मुख असलेला किंवा ज्याच्या मुखातून पुरुषार्थाचा उपदेश करण्यासाठी वेदशास्त्ररूपी थोर शब्दसमुदाय निघाला.

८४५) **प्राग्वंश :** – ज्याचा वंश सतत प्रगत होत राहतो. कधीहि मागासलेला ठरत नाही. अवनतीला जात नाही. भगवंताचा प्रपंचरूपी वंश असा आहे म्हणून हे नांव प्राप्त झाले आहे.

८४६) **वंशवर्धन :** – वंशाची वाढ करणारा, प्रपंच वाढविणारा, किंवा प्रपंचाचे छेदन करणारा.

## भारभृत् कथितो योगी योगीशः[८५०] सर्वकामदः ।
## आश्रमः श्रमणः क्षामः सुपर्णो वायुवाहनः ।।९१ ।।

८४७) **भारभृत्** – भार वाहणारा, विश्वाचे ओझे वागविणारा, सर्वांचे कल्याण करण्याचे दायित्व स्वीकारणारा.

८४८) **कथितः** – सांगितला गेलेला. वेदशास्त्रपुराण ऋषिमुनि इत्यादींनी ज्याचे श्रेष्ठत्व, महत्व, व्यापकत्व, सामर्थ्य इत्यादि सांगितले आहे.

८४९) **योगी** – योग ज्याला अवगत आहे असा. योगाचे आचरण करणारा. ज्ञानी.

८५०) **योगीशः** – योग आचरणाऱ्यांमध्ये सर्वश्रेष्ठ. सामान्य योगी हे योगाचे आचरण करीत असतांना अडचणीत येतात. दुःखे भोगतात. ती स्थिति भगवंताची कधी होत नाही. म्हणून श्रेष्ठत्व. योगाचा स्वामी.

८५१) **सर्वकामदः** – सर्व प्रकारच्या इच्छा सफल करणारा, पुरविणारा.

८५२) **आश्रमः** – विश्रांति घेण्याचे स्थान. प्रपंचरूपी अरण्यामध्ये इतस्ततः भटकून श्रमणाऱ्यांना जो विसावा घेण्याचे स्थान ठरतो.

८५३) **श्रमण :** – अविवेकी जनांना संतापविणारा, किंवा विरक्त, किंवा श्रमाला न कंटाळणारा.

८५४) **क्षामः** – कृश किंवा क्षीण करणारा.

**८५५) सुपर्णः** – पंख समर्थ व सुंदर असलेला गरुड हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा ज्याची छंद ही पाने चांगली आहेत. कल्याणप्रद आहेत.

**८५६) वायुवाहनः** – ज्याच्या आदेशाने वायु वाहतो असा. किंवा वायु हे ज्याचे वाहन आहे.

## धनुर्धरो धनुर्वेदो दण्डो दमयिता[८६०] दमः ।
## अपराजितः सर्वसहो नियन्ता नियमो यमः ॥९२॥

**८५७) धनुर्धरः** – धनुष्य धारण करणारा.

**८५८) धनुर्वेदः** – जो धनुर्वेद म्हणजे शस्त्रविद्या, युद्धशास्त्र जाणतो. किंवा शस्त्रविद्या, युद्धशास्त्र ज्यामध्ये विस्ताराने सांगितली आहेत असा धनुर्वेद हेच ज्याचे स्वरूप आहे.

**८५९) दण्डः** – दंड, शिक्षा, शासन, नियंत्रण हेच ज्याचे स्वरूप आहे.

**८६०) दमयिता** – दमन करणारा, दुष्टांचे शासन करणारा,

**८६१) दमः** – इंद्रिये जिंकणे, इंद्रिये नियंत्रणात ठेवणे म्हणजे दम तेच ज्याचे स्वरूप आहे.

**८६२) अपराजितः** – ज्याचा पराभव कोणी करू शकत नाही.

**८६३) सर्वसहः** – सर्व प्रकारची कर्मे करण्यास समर्थ किंवा सर्व काही सोसणारा.

**८६४) नियन्ता** – नियंत्रण करणारा. व्यवस्था लावणारा सर्वांना आपआपल्या कर्तव्यात ठेवणारा.

**८६५) नियमः** – योगशास्त्रात सांगितलेला शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधानरूप जो नियम तो ज्याचे स्वरूप आहे.

**८६६) यमः** – योगशास्त्रात वर्णिलेला, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रहरूप जो यम तो ज्याचे स्वरूप आहे. अयम असा पाठ घेतल्यास ज्याचा नियंता कुणी नाही. किंवा यम म्हणजे मृत्यू ज्याला नाही असा अर्थ करावा.

## सत्त्ववान् सात्त्विकः सत्यः सत्यधर्मपरायणः[८७०] ।
## अभिप्रायः प्रियार्होऽर्हः प्रियकृत् प्रीतिवर्धनः ।।९३।।

८६७) **सत्त्ववान्** – शौर्य, धैर्य, सोशिकपणा इत्यादींना सत्त्व असे म्हणतात. त्यांनी जो युक्त आहे.

८६८) **सात्त्विकः** – सत्त्वगुणप्रधान.

८६९) **सत्यः** – सत्यस्वरूप, चांगल्याशी चांगला असलेला.

८७०) **सत्यधर्मपरायणः** – सत्यधर्माच्या आचरणामध्ये तत्पर असलेला.

८७१) **अभिप्रायः** – पुरुषार्थप्राप्तीची इच्छा असलेले लोक ज्याच्याविषयी अभिलाषा बाळगतात किंवा जगत् ज्याच्यामध्ये समाविष्ट होते.

८७२) **प्रियार्हः** – प्रिय असलेल्या वस्तू अर्पण करण्यास जो योग्य आहे.

८७३) **अर्हः** – योग्यता असलेला, योग्य. स्वागत, आसन, स्तुति, अर्घ्य, पाद्य, प्रार्थना आणि नमस्कार इ. साधनांनी ज्याचे पूजन करावे असा.

८७४) **प्रियकृत्** – प्रिय करणारा, प्रियकर.

८७५) **प्रीतिवर्धनः** – प्रेम वाढविणारा. आसक्ति नाहीशी करणारा.

## विहायसगतिर्ज्योतिः सुरुचिर्हुतभुग्विभुः[८८०] ।
## रविर्विरोचनः सूर्यः सविता रविलोचनः ।।९४।।

८७६) **विहायसगतिः** – आकाशहि ज्याच्यामध्ये लीन होते. किंवा आकाश हे ज्याचे आश्रयस्थान आहे.

८७७) **ज्योतिः** – प्रकाशस्वरूप.

८७८) **सुरुचिः** – ज्याची कांति किंवा प्रभा चांगली आहे. किंवा ज्याच्या आवडी श्रेष्ठ प्रकारच्या आहेत.

८७९) **हुतभुग्** – हवन केलेले भक्षण करणारा अग्नि हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा देव हेहि अग्निमुखाने हविर्द्रव्याचे भक्षण करतात म्हणून तेहि हुतभुक् आहेत.

८८०) **विभु :** – सर्वव्यापक.

८८१) **रविः** – रसांचे ग्रहण करणारा. किंवा सूर्य.

८८२) **विरोचनः** – जो विविध प्रकाराने शोभतो.

८८३) **सूर्यः** – निर्माण करणारा. ऐश्वर्य, संपत्ति देणारा.

८८४) **सविता** – प्रसवता, प्रसवणारा, जन्म देणारा, विश्व उत्पन्न करणारा.

८८५) **रविलोचनः** – सूर्य हा ज्याचा डोळा आहे.

## अनन्तो हुतभुग्भोक्ता सुखदो नैकजोऽग्रजः [८९०] ।
## अनिर्विण्णः सदामर्षी लोकाधिष्ठानमद्भुतः ॥९५॥

८८६) **अनन्तः** – शेष हे ज्याचे स्वरूप आहे. जो निःसीम, अमर्याद आहे.

८८७) **हुतभुग्** – अर्पण केलेली द्रव्ये सेवन करणारा.

८८८) **भोक्ता** – उपभोग घेणारा. चेतनरूप असल्यामुळे जड असलेल्या प्रकृतीचा ईश्वर भोग घेतो.

८८९) **सुखद :** – सुख देणारा. असुखदः असा पाठ घेतल्यास दुःखाचा नाश करणारा असा अर्थ घ्यावा.

८९०) **नैकजः** – अनेकवेळा अवतार धारण करणारा.

८९१) **अग्रजः** – सर्वाआधी जन्मलेला हिरण्यगर्भ हा ज्याचे स्वरूप आहे.

८९२) **अनिर्विण्ण :** – खेद, विषाद हे ज्याच्यावळ नाहीत असा.

८९३) **सदामर्षी** – सदैव क्षमाशील. अमर्षी असे पद धरल्यास ज्याला वाईट असे काही कधीच चालत नाही तो.

८९४) **लोकाधिष्ठानम्** – ज्याच्या आधारावर, आश्रयावर तिन्ही लोक आहेत.

८९५) **अद्भुतः** – आश्चर्यचकित करणारा. ज्याचे सामर्थ्य, प्रभाव, कार्य विचारवंतालाही आश्चर्यचकित करणारे आहे.

**सनात्सनातनतमः कपिलः कपिरव्ययः[९००] ।**
**स्वस्तिदःस्वस्तिकृत्स्वस्ति स्वस्तिभुक्स्वस्तिदक्षिणः ॥९६॥**

८९६) **सनात्** – सनातन टिकणारा – चिरकालीन.

८९७) **सनातनतमः** – सनातन म्हणजे कालावर मात करून टिकून राहणारा, सर्वांचे कारण असलेला. त्यामध्येही श्रेष्ठ.

८९८) **कपिलः** – पिंगट वर्णाचा, वडवानलस्वरूप.

८९९) **कपिः** – जलाचे प्राशन करणारा असा सूर्य किंवा कमल हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा मर्कटकुलात जन्मास आलेला मारुती हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा वराह.

९००) **अव्ययः** – सर्व विश्व ज्याच्यामध्ये लीन होते.

९०१) **स्वस्तिदः** – मांगल्य, कल्याण देणारा.

९०२) **स्वस्तिकृत्** – शुभ करणारा.

९०३) **स्वस्ति** – शुभ, कल्याण, मांगल्य हेच ज्याचे स्वरूप आहे.

९०४) **स्वस्तिभुग्** – जे मंगल आहे तेच स्वीकारणारा.

९०५) **स्वस्तिदक्षिणः** – मंगल करण्यामध्ये दक्ष असलेला. किंवा शीघ्र गतीने शुभ करणारा.

**अरौद्रः कुण्डली चक्री विक्रम्यूर्जितशासनः[९१०] ।**
**शब्दातिगः शब्दसहः शिशिरः शर्वरीकरः ॥९७॥**

९०६) **अरौद्रः** – भयानक नसलेला. किंवा कर्म–राग (आसक्ती) आणि क्रोध यांना रौद्र म्हणतात. हे भाव ज्याच्याजवळ नाहीत असा.

९०७) **कुण्डली** – कुंडले धारण करणारा. किंवा योगशास्त्रात वर्णन केलेली साडेतीन वळणे असणारी कुंडलिनी ही ज्याचे स्वरूप आहे.

९०८) **चक्री** – चक्र धारण करणारा.

९०९) **विक्रमी** – पराक्रमी.

९१०) **ऊर्जितशासनः** – ज्याचे शासन, राज्यव्यवस्था ही अत्यंत विकसित, ऊर्जित अवस्थेला गेलेली अशी आहेत. जगताची व्यवस्था भगवान् श्रुति, स्मृति इत्यादींच्या आदेशाने ठेवतात. त्या संदर्भात हे नाव प्राप्त झाले आहे.

**९११) शब्दातिगः** – शब्दाने वर्णन करण्याच्या पलीकडे असलेला.

**९१२) शब्दसहः** – शब्दांच्या सामर्थ्याच्या पलीकडे असूनहि वेद, संत यांनी केलेली स्तुति वा वर्णने ज्याला मानवतात.

**९१३) शिशिरः** – शीत असा शिशिर ऋतु हे ज्याचे स्वरूप आहे किंवा तापत्रयांनी संतप्त झालेल्याला निववणारा, शांत करणारा.

**९१४) शर्वरीकरः** – शर्वरी = रात्र. ती निर्माण करणारा चंद्र हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा प्रापंचिक लोकांना ब्रह्मज्ञान ही रात्र आहे तर सत्पुरुषांना विषयसुख ही रात्र आहे. अशी रात्र ज्याच्यामुळे होते.

## अक्रूरः पेशलो दक्षो दक्षिणः क्षमिणां वरः ।
## विद्वत्तमो वीतभयः पुण्यश्रवणकीर्तनः ॥९८॥

**९१५) अक्रूरः** – क्रूरताविरहित. दुष्टांचा संहार करण्यामागे क्रूरता हा हेतू नसून सज्जनरक्षण व धर्मसंस्थापन हा हेतू असतो.

**९१६) पेशलः** – कोमल. ज्याचे वागणे, बोलणे, मन आणि शरीर हे सर्वच हवेहवेसे वाटणारे, लोभस असे आहे.

**९१७) दक्षः** – सावध, सर्व गोष्टी करतांना सर्व वेळी ज्याचा नेमकेपणा अबाधित राहतो. योग्य वेळी योग्य गोष्टी करण्यात जो तत्पर आहे.

**९१८) दक्षिणः** – जो सदा सावध असतो, किंवा ज्याचा संचार सर्वत्र आहे.

**९१९) क्षमिणां वरः** – क्षमाशील अशा सत्पुरुषांमध्ये जो श्रेष्ठ आहे. किंवा पृथ्वीपेक्षाहि ज्याचे सहन करण्याचे सामर्थ्य अधिक आहे. किंवा सर्व क्रिया करण्याची क्षमता व सामर्थ्य ज्याच्याजवळ उत्कृष्ट रीतीने आहे.

**९२०) विद्वत्तमः** – विद्वानांच्यामध्ये श्रेष्ठ.

**९२१) वीतभयः** – सर्व प्रकारचे भय ज्याच्यापासून दूर गेले आहे. परमात्मा हा सर्वेश्वर आणि नित्यमुक्त असल्यामुळे त्याला कशाचेही भय बाळगण्याचे कारण नाही.

**९२२) पुण्यश्रवणकीर्तनः** – ज्याच्या लीलांचे आणि गुणांचे श्रवण आणि कीर्तन हे पुण्यकर आहे, पवित्र करणारे आहे.

**उत्तारणो दुष्कृतिहा पुण्यो दुःस्वप्ननाशनः ।**
**वीरहा रक्षणः सन्तो जीवनः[९३०] पर्यवस्थितः ।।९९।।**

**९२३) उत्तारणः** – तारून नेणारा. संसारातून व संकटातून पार नेणारा.

**९२४) दुष्कृतिहा** – पाप नाहीसे करणारा, किंवा पातक्यांचा नाश करणारा.

**९२५) पुण्यः** – पुण्यस्वरूप, पवित्र

**९२६) दुःस्वप्ननाशनः** – वाईट स्वप्नांचा नाश करणारा. ज्याचे नांव घेतल्याने वा चिंतन केल्याने वाईट स्वप्ने पडत नाहीत, वा अशुभ स्वप्नांचे परिणाम नाहीसे होतात असा. किंवा ब्रह्मावर ब्रह्मापेक्षा वेगळे भासणारे असे जे जगत् तेच एक दुःस्वप्न आहे. ज्याच्या ज्ञानाने या दुःस्वप्नाचा नाश होतो.

**९२७) वीरहा** – संसारचक्रात सापडून सतत फिरत राहण्याची गति जो मुक्ति देऊन नाहीशी करतो.

**९२८) रक्षणः** – जगाचे रक्षण करणारा.

**९२९) सन्तः** – सत्पुरुषांच्या रूपाने प्रगट होणारा किंवा सत्पुरुष हेच ज्याचे स्वरूप आहेत असा.

**९३०) जीवनः** – सर्वांना जीवन देणारा.

**९३१) पर्यवस्थितः** – विश्वाला सगळीकडे अंतर्बाह्य व्यापून असणारा.

**अनन्तरूपोऽनन्तश्रीर्जितमन्युर्भयापहः ।**
**चतुरस्रो गभीरात्मा विदिशो व्यादिशो दिशः[९४०] ।।१००।।**

**९३२) अनन्तरूपः** – असंख्यात रूपाने प्रगट होणारा.

**९३३) अनन्तश्रीः** – ज्याचे ऐश्वर्य अपरिमित आहे.

**९३४) जितमन्युः** – ज्याने क्रोध जिंकला आहे.

**९३५) भयापहः** – भय नाहीसे करणारा.

**९३६) चतुरस्रः** – सर्व कार्यामध्ये कुशल. चौफेर क्षमता ठेवणारा.

चतुरश्र असा पाठ घेतल्यास न्यायाने युक्त माणसांना त्यांच्या त्यांच्या कर्मानुरूप फल देणारा असा अर्थ होतो.

**९३७) गभीरात्मा** – ज्याचे स्वरूप सहजपणे कळू शकत नाही.

**९३८) विदिशः** – विविध प्रकारची फले देणारा. निरनिराळ्या दिशांमध्ये राहणारा. विविधस्थानी वास करणारा.

**९३९) व्यादिशः** – आदेश देणारा, आज्ञा करणारा.

**९४०) दिश :** – वेदरूपाने कर्मफले सांगणारा. सर्व दिशांमध्यें राहणारा.

## अनादिर्भूर्भुवो लक्ष्मीः सुवीरो रुचिराङ्गदः ।
## जननो जनजन्मादिर्भीमो भीमपराक्रमः ।।१०१।।

**९४१) अनादिः** – सर्वांचे कारण असल्यामुळे ज्याचा आरंभ झाला असे ज्याच्याविषयी म्हणता येत नाही. आरंभरहित, उत्पत्तिरहित.

**९४२) भूर्भुवः** – सर्वांना आधार असलेल्या पृथ्वीचाहि आधार असलेला.

**९४३) लक्ष्मीः** – संपत्तीची, सौन्दर्याची अधिदेवता असलेली लक्ष्मी ही ज्याचे स्वरूप आहे. किंवा लक्ष्मी म्हणजे आत्मविद्या. ती आत्मविद्याच ज्याचे स्वरूप आहे. (ज्ञानेश्वरी १०)

**९४४) सुवीरः** – ज्याच्या हालचाली सुंदर, आकर्षक, वा मंगल आहेत असा. किंवा ज्याचे स्फुरण, स्फूर्ति ही विविध रीतीने सुंदर वा कल्याणप्रद आहे. किंवा श्रेष्ठ वीर.

**९४५) रुचिराङ्गदः** – ज्याची बाहुभूषणे सुंदर आहेत.

**९४६) जननः** – जन्म देणारा, निर्माण करणारा.

**९४७) जनजन्मादिः** – जनांच्या उत्पत्तीचे मूलकारण असलेला.

**९४८) भीमः** – भव्य, भयप्रद.

**९४९) भीमपराक्रमः** – ज्याचा पराक्रम भीषण आहे.

९५०
## आधारनिलयोऽधाता पुष्पहासः प्रजागरः ।
## ऊर्ध्वगः सत्पथाचारः प्राणदः प्रणवः पणः ।।१०२।।

**९५०) आधारनिलयः** – आधार देणाऱ्या पृथ्वीसारख्या वस्तूंचाही आश्रयस्थान असलेला.

**९५१) अधाता :** – ज्याचा निर्माण करणारा कोणी नाही. किंवा प्रलयाचे वेळी सर्वांचे प्राशन करणारा.

**९५२) पुष्पहास :** – विकसित पुष्पाप्रमाणे ज्याचे हास्य विलोभनीय आहे. किंवा पुष्पहास म्हणजे फुलाचे प्रफुल्ल होणे. आधी कळीच्या अवस्थेत असलेले फूल जसे नंतर विकसित होते त्याप्रमाणे ज्याच्यापासून सर्व जग विस्तार पावले आहे. किंवा सर्व फुले हेच ज्याचे हास्य आहे.

**९५३) प्रजागरः** – सदैव जागरूक असलेला. नित्यबुद्ध, नित्यज्ञानी.

**९५४) ऊर्ध्वगः** – सर्वांच्यावर असलेला किंवा उन्नतीकडे वाटचाल करणारा.

**९५५) सत्पथाचारः** – सन्मार्गाचे आचरण करणारा.

**९५६) प्राणदः** – जीवन देणारा.

**९५७) प्रणवः** – ॐकारस्वरूप.

**९५८) पण :** – व्यवहारस्वरूप किंवा पुण्यकर्मांचा संग्रह करून योग्यतेप्रमाणे अधिकाऱ्याला त्याची फले जो देतो तो. कारण पण म्हणजे नाणे. हे विनिमयाचे साधन आहे.

९६०

**प्रमाणं प्राणनिलयः प्राणभृत् प्राणजीवनः ।**
**तत्त्वं तत्त्वविदेकात्मा जन्ममृत्युजरातिगः ।।१०३।।**

**९५९) प्रमाणम्** – सत्यज्ञानाच्या साधनास प्रमाण म्हणतात. ते ज्याचे स्वरूप आहे.

**९६०) प्राणनिलय :** – प्राणाचे निवासस्थान. जीवनाधार किंवा इंद्रिये वा प्राणशक्ति ज्यात विलीन होते असा.

**९६१) प्राणभृत्** – प्राण धारण करणारा. अन्नरूपाने प्राणाचे पोषण करणारा.

**९६२) प्राणजीवन :** – प्राणांचे जीवन असलेला. प्राणांना प्रेरणा देणारा.

९६३) **तत्त्वम्** – तथ्य, सत्य, टिकून राहणारा अंतर्गत सारभाग.

९६४) **तत्त्वविद्** – तत्त्वज्ञानी.

९६५) **एकात्मा** – विश्वाचा एकमेव आत्मा. किंवा एकमेव आत्मरूपाने सर्वदा सर्वत्र असणारा.

९६६) **जन्ममृत्युजरातिगः** – जन्म, मरण आणि म्हातारपण या विकारांच्या पार असलेला. जन्मादि विकार ज्यास बांधू शकत नाहीत असा.

## भूर्भुवःस्वस्तरुस्तारः सपिता प्रपितामहः[९७०] ।
## यज्ञो यज्ञपतिर्यज्वा यज्ञाङ्गो यज्ञवाहनः ॥१०४॥

९६७) **भुर्भुवःस्वस्तरुः** – भूः, भुवः, स्वः या तीन व्याहृति वेदत्रयांचे सार म्हणून मानल्या जातात. त्यांच्या सहाय्याने लोक तरून जातात, उद्धरून जातात. म्हणून उद्धरून नेणाऱ्या व्याहृति हे ज्याचे स्वरूप आहे. किंवा भूः, भुवः, स्वः हे तीन शब्द तीन लोकांचे प्रतीक म्हणून मानले जातात. या तीन शाखांनी विस्तारलेला वृक्ष हे ज्याचे स्वरूप आहे असा.

९६८) **तारः** – उद्धरून नेणारा, तारणारा.

९६९) **सपिता** – समानरूपाने सर्वांना पिता असलेला.

९७०) **प्रपितामहः** – पितामह जो ब्रह्मदेव त्याचा पिता असलेला.

९७१) **यज्ञः** – यज्ञस्वरूप.

९७२) **यज्ञपतिः** – यज्ञाचा स्वामी.

९७३) **यज्वा** – यज्ञ करणारा, यजमान

९७४) **यज्ञाङ्गः** – यज्ञ हेच ज्याचे अंग आहे. किंवा वराहस्वरूप.

९७५) **यज्ञवाहनः** – यज्ञ हे ज्याचे वाहन आहे, यज्ञ ज्याला वाहून आणतो. यज्ञ हे ज्याच्या प्राप्तीचे साधन आहे.

९८०
**यज्ञभृद् यज्ञकृद् यज्ञी यज्ञभुग् यज्ञसाधनः ।**
**यज्ञान्तकृद् यज्ञगुह्यमन्नमन्नाद एव च ।।१०५।।**

९७६) **यज्ञभृत्** – यज्ञाचे धारण करणारा.

९७७) **यज्ञकृत्** – यज्ञ करणारा.

९७८) **यज्ञी** – यज्ञाची पूर्तता करणारा.

९७९) **यज्ञभुग्** – यज्ञाचा उपभोग घेणारा. यज्ञाचे सेवन करणारा.

९८०) **यज्ञसाधनः** – यज्ञाची साधने, समिधा, आज्य, स्रुक्, स्रुवा इ. हे ज्याचे स्वरूप आहे.

९८१) **यज्ञान्तकृत्** – यज्ञाची समाप्ति करणारा. किंवा यज्ञाचा नाश करणारा. शंकराने दक्ष यज्ञाचा विध्वंस केला होता. त्या संदर्भात शिवविष्णूंच्या एकतेमुळे हे नाव प्राप्त झाले आहे.

९८२) **यज्ञगुह्यम्** – गुह्य असा यज्ञ म्हणजे निष्काम यज्ञ. वा ज्ञानमय हे ज्याचे स्वरूप आहे.

९८३) **अन्नम्** – भूतमात्राकडून जे खाल्ले जाते व शेवटी जे भूतांचे भक्षण करते ते अन्न ज्याचे स्वरूप आहे.

९८४) **अन्नाद** – अन्नाचे भक्षण करणारा.

**आत्मयोनिः स्वयंजातो वैखानः सामगायनः ।**
९९०
**देवकीनन्दनः स्रष्टा क्षितीशः पापनाशनः ।।१०६।।**

९८५) **आत्मयोनिः** – स्वतःच स्वतःचे उत्पत्तिस्थान असलेला.

९८६) **स्वयंजातः** – स्वतःच स्वतःमध्ये जन्म घेणारा.

९८७) **वैखानः** – विशेष रीतीने पृथ्वी खोदणारा असा वराह हे ज्याचे स्वरूप आहे.

९८८) **सामगायनः** – सामाचे गायन करणारा.

९८९) **देवकीनन्दनः** – वसुदेव पत्नी देवकीचा लाडका पुत्र.

९९०) **स्रष्टा** – निर्माण करणारा, सर्व विश्वे ज्याने उत्पन्न केली आहेत असा.

९९१) **क्षितीशः** – पृथ्वीचा ईश्वर, स्वामी.

९९२) **पापनाशन:** – ज्याचे कीर्तन, पूजन, स्मरण, ध्यान हे पातकांचा नाश करणारे आहे.

## शंखभृन्नन्दकी चक्री शार्ङ्गधन्वा गदाधर: [१०००] ।
## रथाङ्गपाणिरक्षोभ्य: सर्वप्रहरणायुध: ॥१०७॥

**॥ सर्वप्रहरणायुध ॐ नम इति ॥**

९९३) **शंखभृत्** – पांचजन्य नांवाचा शंख धारण करणारा.

९९४) **नन्दकी** – नंदक नांवाचे खड्ग ज्याच्याजवळ आहे असा.

९९५) **चक्री** – सुदर्शन नांवाचे चक्र ज्याच्याजवळ आहे असा.

९९६) **शाङ्र्गधन्वा** – शार्ङ्ग नांवाचे धनुष्य धारण करणारा.

९९७) **गदाधर:** – कौमोदकी नावाची गदा ज्याच्याजवळ आहे असा.

९९८) **रथाङ्गपाणि:** – ज्याच्या हातात चक्र आहे असा. (भूतादि तामस अहंकार म्हणजे पांचजन्य. विद्या म्हणजे नंदक खड्ग, सुदर्शन हे मनस्तत्त्वात्मक आहे. इंद्रियकारण असा राजस अहंकार हे शार्ङ्ग धनुष्य आहे आणि कौमोदकी गदा ही बुद्धितत्त्वात्मक आहे असे म्हणतात.)

९९९) **अक्षोभ्य:** – ज्याला कुणीहि क्षुब्ध करू शकत नाही; संतापाने ज्याचा कधी तोल सुटत नाही.

१०००) **सर्वप्रहरणायुध:** – आघात करून शत्रूचा नि:पात करणारी सर्व प्रकारची आयुधे ज्याने धारण केली आहेत असा.

**ॐ श्री: 卐**

✡ ✡ ✡

# फलश्रुति

इतीदं कीर्तनीयस्य केशवस्य महात्मनः ।
नाम्नां सहस्रं दिव्यानामशेषेण प्रकीर्तितम् ॥१॥
य इदं श्रृणुयान्नित्यं यश्चापि परिकीर्तयेत् ।
नाशुभं प्राप्नुयात्किंचित्सोऽमुत्रेह च मानवः ॥२॥
वेदान्तगो ब्राह्मणः स्यात्क्षत्रियो विजयी भवेत् ।
वैश्यो धनसमृद्धः स्याच्छूद्रः सुखमवाप्नुयात् ॥३॥
धर्मार्थी प्राप्नुयाद्धर्ममर्थार्थी चार्थमाप्नुयात् ।
कामानवाप्नुयात्कामी प्रजार्थी चाप्नुयात्प्रजाम् ॥४॥
भक्तिमान् यः सदोत्थाय शुचिस्तद्गतमानसः ।
सहस्रं वासुदेवस्य नाम्नामेतत्प्रकीर्तयेत् ॥५॥
यशः प्राप्नोति विपुलं ज्ञातिप्राधान्यमेव च ।
अचलां श्रियमाप्नोति श्रेयः प्राप्नोत्यनुत्तमम् ॥६॥
न भयं क्वचिदाप्नोति वीर्यं तेजश्च विन्दति ।
भवत्यरोगो द्युतिमान्बलरूपगुणान्वितः ॥७॥
रोगार्तो मुच्यते रोगाद्बद्धो मुच्येत बन्धनात् ।
भयान्मुच्येत भीतस्तु मुच्येतापन्न आपदः ॥८॥
दुर्गाण्यतितरत्याशु पुरुषः पुरुषोत्तमम् ।
स्तुवन्नामसहस्रेण नित्यं भक्तिसमन्वितः ॥९॥

वासुदेवाश्रयो मर्त्यो वासुदेवपरायणः ।
सर्वपापविशुद्धात्मा याति ब्रह्म सनातनम् ॥१०॥
न वासुदेवभक्तानामशुभं विद्यते क्वचित् ।
जन्ममृत्युजराव्याधिभयं नैवोपजायते ॥ ११ ॥
इमं स्तवमधीयानः श्रद्धाभक्तिसमन्वितः ।
युज्येतात्मा सुखक्षान्तिश्रीधृतिस्मृतिकीर्तिभिः ॥१२॥
न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभा मतिः ।
भवन्ति कृतपुण्यानां भक्तानां पुरुषोत्तमे ॥१३॥
द्यौः सचन्द्रार्कनक्षत्रा खं दिशो भूर्महोदधिः ।
वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः ॥१४॥
ससुरासुरगन्धर्वं सयक्षोरगराक्षसम् ।
जगद्वशे वर्ततेदं कृष्णस्य सचराचरम् ॥ १५ ॥
इन्द्रियाणि मनो बुद्धिः सत्त्वं तेजो बलं धृतिः ।
वासुदेवात्मकान्याहुः क्षेत्रं क्षेत्रज्ञ एव च ॥१६॥
सर्वागमानामाचारः प्रथमं परिकल्पते ।
आचारप्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः ॥ १७ ॥
ऋषयः पितरो देवा महाभूतानि धातवः ।
जङ्गमाजङ्गमं चेदं जगन्नारायणोद्भवम् ॥१८॥
योगो ज्ञानं तथा सांख्यं विद्याः शिल्पादिकर्म च ।
वेदाः शास्त्राणि विज्ञानमेतत्सर्वं जनार्दनात् ॥१९॥

**एको विष्णुर्महद्भूतं पृथग्भूतान्यनेकशः ।**
**त्रीलँल्लोकान्व्याप्य भूतात्मा भुङ्क्ते विश्वभुगव्ययः ।।२०।।**
**इमं स्तवं भगवतो विष्णोर्व्यासेन कीर्तितम् ।**
**पठेद्य इच्छेत्पुरुषः श्रेयः प्राप्तुं सुखानि च ।।२१ ।।**
**विश्वेश्वरमजं देवं जगतः प्रभवाप्ययम् ।**
**भजन्ति ये पुष्कराक्षं न ते यान्ति पराभवम् ।।२२ ।।**

१) स्तुति करण्यास अत्यंत योग्य असलेल्या महात्म्या केशवाचे हे दिव्य सहस्रनाम अशाप्रकारे पूर्णपणे वर्णिले आहे.

२) जो हे प्रतिदिनी ऐकेल वा गाईल त्या मनुष्याचें इहलोकीं वा परलोकीं थोडेही अशुभ होणार नाहीं.

३) या स्तोत्राच्या पाठानें ब्राह्मण वेदांमध्यें निपुण होईल, वेदपारंगत तत्त्ववेत्ता होईल, क्षत्रिय विजयी होईल, वैश्य धनानें समृद्ध होईल, शूद्राला सुख मिळेल.

४) धर्माची इच्छा असणाराला धर्म मिळेल. अर्थाची म्हणजे संपत्तीची आकांक्षा असणाराला अर्थप्राप्ति होईल. सकाम व्यक्तीच्या कामना पूर्ण होतील. प्रजेची अपेक्षा करणाराला प्रजा लाभेल. (गुणवान् मुले होतील.)

५) जो कोणी मोठ्या उत्साहाने, शुद्ध होऊन, भक्तीनें अंत:करण ईश्वराचें ठिकाणीं ठेवून वासुदेवाच्या या सहस्रनामाचें योग्य रीतीनें सदैव संकीर्तन करील

६) त्याला यश प्राप्त होईल, स्वत:च्या समाजामधें मोठेपणा लाभेल. त्याला स्थिर स्वरूपाची संपत्ती मिळेल आणि अत्त्युत्तम श्रेयाची प्राप्ती होईल.

७) त्याला कोठेही कसलेही भय उरणार नाही. त्याला पराक्रम आणि तेजस्विता यांचा लाभ होईल. तो निरोगी आणि कांतिमान् होईल. त्याचे बल, रूप आणि गुण वाढतील.

८) रोगी रोगांतून मुक्त होईल. अडकलेला बंधनांतून सुटेल. भ्यालेल्यांची भीति नाहीशी होईल. आणि संकटग्रस्ताची संकटे टळतील.

९) भक्तीने युक्त होऊन जो माणूस पुरुषोत्तम विष्णूची या सहस्रनामाने प्रतिदिनी स्तुति करतो तो सर्व आपत्तींतून त्वरित तरून जातो. (त्याला अवघड असें कांही उरत नाहीं.)

१०) जो कोणी वासुदेवाशीं अनन्य होऊन त्याच्या आश्रयाला राहतो त्याचें अंत:करण-सर्व पातकें नष्ट होऊन-शुद्ध होते. आणि तो सनातन, नित्य नूतन, अनादि, अनंत, अक्षय अशा ब्रह्माला प्राप्त होतो.

११) जे वासुदेवाचे भक्त आहेत, त्यांना अशुभ कांहींच उरत नाही. तसेंच जन्ममरण-म्हातारपण-रोग यांच्यामुळे उत्पन्न होणारे भयहि त्यांना नसते.

१२) श्रद्धा आणि भक्तीनें युक्त होऊन जो या विष्णुसहस्रनाम स्तोत्राचें अध्ययन करतो, मननपूर्वक पठण करतो तो स्वत: सुख, सहनशीलता, ऐश्वर्य, धैर्य, स्मरणशक्ति, कीर्ति यांनी युक्त होतो.

१३) अनेक पुण्यकृत्यें करून जे पुरुषोत्तम विष्णूचें भक्त होतात त्यांचेजवळ क्रोध, मत्सर, लोभ आणि (वाईट करण्या-वागण्याची) अशुभ बुद्धि राहत नाहीं.

१४) सूर्य-चंद्र-नक्षत्रांसह सर्व द्युलोक, आकाश, दिशा, पृथ्वी, समुद्र अशी सर्व सृष्टी महात्म्या वासुदेवाच्या सामर्थ्यानें धारण केलेली आहे.

१५) देव, असुर, गंधर्व, यक्ष, सर्प, राक्षस, असें सर्व चराचर, जड-चेतन जगत् कृष्णाच्या स्वाधीन राहते.

१६) इंद्रिये, मन, बुद्धि, सत्त्व, तेज, बल, धैर्य, क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ हे सर्व वासुदेवानेंच भरलेले आहे असें शास्त्र सांगतें.

१७) आचरण हे सर्व शास्त्राचें सार आहे. धर्म आचरणांतून उत्पन्न व्हावयाचा असतो. आणि त्या धर्माचाहि स्वामी अच्युत विष्णू आहे.

१८) ऋषि, पितर, देव, महाभूतें, रसादि धातू किंवा सुवर्णादि धातू असें एकूण सर्व जगत् नारायणापासून उत्पन्न झालेले आहे.

१९) योग, ज्ञान, सांख्यशास्त्र, चौदा विद्या, शिल्पादि कौशल्याची

कामें, वेद-शास्त्रें, विज्ञान हे सर्व जनार्दन विष्णूपासूनच निर्माण झाले आहे.

२०) विष्णू हे एकच महद्भूत आहे. त्याच्यापासून निरनिराळी अनेक भूतें जन्माला आली आहेत. सर्व भूतांचा हाच आत्मा असून तिन्ही लोकांना व्यापून हा अव्यय परमात्मा त्या तिन्ही लोकांचा उपभोग घेतो. म्हणूनच तो विश्वभुग्हि आहे.

२१) ज्याला आपलें कल्याण व्हावे आणि सुख मिळावे असें वाटते त्यानें व्यासांनी गायिलेल्या भगवान् विष्णूच्या या सहस्रनामरूप स्तवनाचें पठण करावें.

२२) कमलासारखें नेत्र असलेला विष्णू हा विश्वाचा ईश्वर, जन्मरहित, प्रकाशमान् आणि जगताची उत्पत्ति-स्थिति-लय करणारा आहे. त्याची जे भक्ति करतात ते कधीही पराभूत होत नाहीत.

।। इति फलश्रुति ।।

✡ ✡ ✡

# परिशिष्ट १

।। अर्जुन उवाच ।।

पद्मपत्रविशालाक्ष पद्मनाभ सुरोत्तम ।
भक्तानामनुरक्तानां त्राता भव जनार्दन ।। २३ ।।

।। श्रीभगवानुवाच ।।

यो मां नामसहस्रेण स्तोतुमिच्छति पाण्डव ।
सोऽहमेकेन श्लोकेन स्तुत एव न संशयः ।।२४।।

नमोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये
सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते
सहस्रकोटीयुगधारिणे नमः ।। २५ ।।

नमः कमलनाभाय नमस्ते जलशायिने ।
नमस्ते केशवानन्त वासुदेव नमोऽस्तु ते ।। २६ ।।
वासनाद्वासुदेवस्य वासितं भुवनत्रयम् ।
सर्वभूतनिवासोऽसि वासुदेव नमोऽस्तु ते ।।२७।।
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च ।
जगद्धिताय कृष्णाय गोविन्दाय नमो नमः ।।२८।।
आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ।।२९।।
एष निष्कण्टकः पन्था यत्र संपूज्यते हरिः ।
कुपथं तं विजानीयाद्गोविन्दरहितागमम् ।।३०।।

सर्ववेदेषु यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलम् ।
तत्फलं समवाप्नोति स्तुत्वा देवं जनार्दनम् ।।३१।।
यो नरः पठते नित्यं त्रिकालं केशवालये ।
द्विकालमेककालं वा क्रूरं सर्वं व्यपोहति ।।३२।।
दह्यन्ते रिपवस्तस्य सौम्याः सर्वे सदा ग्रहाः ।
विलीयन्ते च पापानि स्तवे ह्यस्मिन् प्रकीर्तिते ।३३।
येन ध्यातः श्रुतो येन येनायं पठ्यते स्तवः ।
दत्तानि सर्वदानानि सुराः सर्वे समर्चिताः ।।३४।।
इह लोके परे वापि न भयं विद्यते क्वचित् ।
नाम्नां सहस्रं योऽधीते द्वादश्यां मम सन्निधौ ।।३५।।
शनैर्दहति पापानि कल्पकोटिशतानि च ।
अश्वत्थसन्निधौ पार्थ ध्यात्वा मनसि केशवम् ।।३६।।
पठेन्नामसहस्रं तु गवां कोटिफलं लभेत् ।
शिवालये पठेन्नित्यं तुलसीवनसंस्थितः ।।३७।।
नरो मुक्तिमवाप्नोति चक्रपाणेर्वचो यथा ।
ब्रह्महत्यादिकं घोरं सर्वपापं विनश्यति ।।३८।।
विलयं यान्ति पापानि चान्यपापस्य का कथा ।
सर्वपापविनिर्मुक्तो विष्णुलोकं स गच्छति ।।३९।।

इति श्रीमन्महाभारते शतसाहस्त्र्यां संहितायां वैयासिक्यामानुशासनिके पर्वणि
दानधर्मेषु भीष्मयुधिष्ठिर संवादे श्रीविष्णोर्दिव्यसहस्रनामस्तोत्रं संपूर्णम् ।

**अर्जुन म्हणाला –**

२३) हे कमलाच्या पाकळीप्रमाणें विशाल नेत्र असलेल्या कमलनाभ देवाधिदेवा ! हे जनार्दना ! तुझ्यावर प्रेम करणाऱ्या भक्तांचे रक्षण करणारा हो. (दुर्बलासाठी लहान, सोपे साधन सांगा.)

**भगवान म्हणाले –**

२४) अर्जुना ! जो सहस्रनामांनी माझी स्तुति करावी अशी इच्छा करतो त्याने (पुढील) एक श्लोक जरी म्हटला तरी त्यानें माझी स्तुति केली असें निश्चयानें समजावें.

२५) सहस्ररूपें धारण करणाऱ्या सहस्रपाद, सहस्रनेत्र, सहस्रशिर, सहस्रबाहू असलेल्या अनंताला नमस्कार असो. सहस्रकोटी युगें धारण करणाऱ्या, सहस्रनामानें संबोधिल्या जाणाऱ्या शाश्वत पुरुषाला नमस्कार असो.

२६) ज्याच्या नाभीमध्यें कमळ आहे, त्याला नमस्कार असो. जो जलामधें शयन करतो, त्याला नमस्कार असो. केशवाला, अनंताला नमस्कार असो. वासुदेवा ! तुला नमस्कार असो.

२७) वासुदेवाच्या आच्छादनानेंच सर्व त्रिभुवन झांकले गेले आहे. (विष्णूच्या कृपेच्या साऊलीत सर्व विश्व नांदते.) हे वासुदेवा ! तूं सर्व भूतांचे आश्रयस्थान आहेस. (सर्व भूतांत तुझाच वास आहे.) तुला नमस्कार असो.

२८) वेदांचे आराध्यदैवत असलेल्या, गायी–ब्राह्मणांचे हित साधणाऱ्या, जगाचें कल्याण करणाऱ्या गोविंदाला–कृष्णाला वारंवार नमस्कार असोत.

२९) आकाशांतून पडलेले पाणी (कोणत्याहि दिशेनें वाहिले तरी) जसें शेवटीं समुद्रालाच मिळते, त्याचप्रमाणें सर्व देवांना (कोणत्याही देवाला) केलेला नमस्कार शेवटी केशवालाच पोंचतो.

३०) जेथे श्रीहरीची पूजा होते, तोच मार्ग निष्कंटक समजावा. गोविंदाविरहित (असे पाखंडी) ज्ञान जेथे सांगितले जाते तोच कुमार्ग आहे हे ओळखावे.

३१) सर्व वेदांमध्यें जे पुण्य आहे, सगळ्या तीर्थांमधें जे फल प्राप्त होते, ते सर्व जनार्दन विष्णूची स्तुति केली असतांना प्राप्त होते.

३२) विष्णूच्या मंदिरांत बसून जो या विष्णुसहस्रनामाचा तीन वेळां, दोन वेळां किंवा एक वेळा प्रतिदिनीं पाठ करतो, त्याचें सर्व अहित नाहींसे होते. त्याला छळणाऱ्या सर्व गोष्टींचा परिहार होतो.

३३) या स्तोत्राचा पाठ केला असतां शत्रू भस्म होतात. ग्रहबाधा नाहीशीं होते. पातके विरघळून जातात.

३४) जो हे स्तोत्र ऐकेल, जो या स्तोत्राचें पठण करील, वा जो याचें ध्यान करील त्यानें दिली पाहिजेत अशी सर्व दानें दिली आहेत आणि सर्व देवांचे पूजन केले आहे असें समजावे.

३५) द्वादशीच्या दिवशीं माझ्याजवळ बसून जो सहस्रनामाचा पाठ करतो त्याला इहलोकीं वा परलोकीं कोणतेहि भय उरत नाहीं.

३६) पिंपळाच्या पारावर बसून मनामधें केशवाचें ध्यान करीत (जो विष्णुसहस्रनाम म्हणतो), अर्जुना, त्याची शतकोटी कल्पांतील सांचलेली पातकेंहि हळूहळू नष्ट होतात.

३७-३८-३९) शिवालयामधें व तुलसीवनामधें बसून जो प्रतिदिनीं विष्णुसहस्रनामाचा पाठ करतो त्याला कोट्यवधि गायी दान दिल्यासारखे फल प्राप्त होते, त्या मनुष्याला मोक्ष प्राप्त होतो, असें चक्रपाणी विष्णूचें वचन आहे. विष्णुसहस्रनामाच्या पाठानें ब्रह्महत्येसारखी सगळी भयंकर पातकेहि नष्ट होतात. मग इतर पापांची काय कथा ? ती तर सहज विरून जातात. अशा रीतीनें सर्व पापांतून मुक्त होऊन मनुष्य विष्णुलोकाला जातो.

✡ ✡ ✡

# परिशिष्ट २

## विष्णोरष्टाविंशतिनामस्तोत्रम्

।। श्रीगणेशाय नमः ।।

।। अर्जुन उवाच ।।

**किं नु नामसहस्राणि जपन्ते च पुनः पुनः ।**
**यानि नामानि दिव्यानि तानि चाचक्ष्व केशव ।।१।।**

।। श्रीभगवानुवाच ।।

**मत्स्यं कूर्मं वराहं च वामनं च जनार्दनम् ।**
**गोविन्दं पुण्डरीकाक्षं माधवं मधुसूदनम् ।।२।।**
**पद्मनाभं सहस्राक्षं वनमालिं हलायुधम् ।**
**गोवर्धनं हृषीकेशं वैकुण्ठं पुरुषोत्तमम् ।।३।।**
**विश्वरूपं वासुदेवं रामं नारायणं हरिम् ।**
**दामोदरं श्रीधरं च वेदाङ्गं गरुडध्वजम् ।।४।।**
**अनन्तं कृष्णगोपालं जपतो नास्ति पातकम् ।**
**गवां कोटिप्रदानस्य अश्वमेधशतस्य च ।।५।।**
**कन्यादानसहस्राणां फलं प्राप्नोति मानवः ।**
**अमायां वा पौर्णमास्यामेकादश्यां तथैव च ।।६।।**
**संध्याकाले स्मरन्नित्यं प्रातःकाले तथैव च ।**
**मध्याह्ने च जपन्नित्यं सर्वपापैः प्रमुच्यते ।।७।।**

।। इति श्रीकृष्णार्जुनसंवादे विष्णोरष्टाविंशतिनामस्तोत्रं संपूर्णम् ।।

## श्रीविष्णूच्या अठ्ठावीस नावांचे स्तोत्र

अर्जुन म्हणाला, ‘ हे केशवा ! तुमच्या सहस्रावधि नामामधील कोणती नावे पुन:पुन: जपली जातात आणि कोणती विशेष अलौकिक (दिव्य) आहेत ते मला सांगा.’

भगवान म्हणाले, ‘मत्स्य, कूर्म पासून अनंत, कृष्णगोपाल पर्यंत जी (अठ्ठावीस) नावे आहेत ती उच्चारली असता पातक उरत नाही. या नावांच्या पठणाने कोटी गाई दान दिल्याचे, शंभर अश्वमेध केल्याचे, सहस्र–कन्यादानाचे फळ (पुण्य) मनुष्यास मिळते. अमावास्या, पूर्णिमा, एकादशी, संध्याकाळ, सकाळ, दुपार या दिवशी व वेळी (अधिकात अधिक जे शक्य आहे त्याप्रमाणे) या नावांचा जप केल्यास सर्व प्रकारच्या पातकांतून मनुष्य मुक्त होतो.

✡ ✡ ✡

**सर्वेऽत्र सुखिनः सन्तु**
**सर्वे सन्तु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु**
**मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ।।**

# श्रीविष्णुसहस्रनाम सूचि


| नाम | क्रमांक |
|---|---|
| अक्रूर | ९१५ |
| अक्षर | १७,४८१ |
| अक्षोभ्य | ८०१,९९९ |
| अग्रज | ८९१ |
| अग्रणी | २१८ |
| अग्राह्य | ५५ |
| अचल | ७४५ |
| अचिन्त्य | ८३२ |
| अच्युत | १००,३१८ |
| अज | ९५,२०४,५२१ |
| अजित | ५४९ |
| अणु | ८३५ |
| अतीन्द्र | १५७ |
| अतीन्द्रिय | १६९ |
| अतुल | ३५५ |
| अदृश्य | ३०४ |
| अद्‌भुत | ८९५ |
| अधातृ | ९५१ |
| अधिष्ठान | ३२४ |
| अधृत | ८४२ |
| अधोक्षज | ४१५ |
| अनघ | १४६,८३१ |
| अनन्त | ६५९,८८६ |
| अनन्तजित् | ३०७ |
| अनन्तरूप | ९३२ |
| अनन्तश्री | ९३३ |
| अनन्तात्मन् | ५१८ |
| अनय | ४०० |
| अनर्थ | ४३१ |
| अनल | २९३,७११ |
| अनादि | ९४१ |
| अनादिनिधन | ४२ |
| अनामय | ६८९ |
| अनिमिष | २१५ |
| अनिरुद्ध | १८५,६३८ |
| अनिर्देश्यवपुस् | १७७,६५६ |
| अनिर्विण्ण | ४३५,८९२ |
| अनिल | २३४,८१२ |
| अनिवर्तिन् | ५९६ |
| अनिवृत्तात्मन् | ७७४ |
| अनीश | ६२६ |
| अनुकूल | ३४२ |
| अनुत्तम | ८० |
| अनुत्तमपद | ७३२ |
| अनेकमूर्ति | ७२१ |
| अन्तक | ५२० |
| अन्न | ९८३ |
| अन्नाद | ९८४ |
| अपराजित | ७१६,८६२ |
| अपां निधि | ३२३ |
| अप्यय | ९०० |
| अप्रतिरथ | ६३९ |
| अप्रमत्त | ३२५ |
| अप्रमेय | ४६ |
| अप्रमेयात्मन् | २४८ |
| अभिप्राय | ८७१ |
| अभू | ४३७ |
| अमरप्रभु | ४९ |
| अमानिन् | ७४७ |
| अमितविक्रम | ५१६,६४१ |
| अमिताशन | ३७२ |
| अमूर्ति | ८३० |
| अमूर्तिमत् | ७२० |
| अमृत | ११९ |

| नाम | क्रमांक | नाम | क्रमांक |
|---|---|---|---|
| अमृतप | ५०४ | आदिदेव | ३३४,४९० |
| अमृतवपुस् | ८१४ | आधारनिलय | ९५० |
| अमृतांश | ८१३ | आनन्द | ५२६ |
| अमृतांशूद्भव | २८३ | आनन्दिन् | ५६० |
| अमृत्यु | १९८ | आवर्तन | २२८ |
| अमेयात्मन् | १०२,१७९ | आश्रम | ८५२ |
| अमोघ | ११०,१५४ | इज्य | ४४६ |
| अम्भोनिधि | ५१७ | इन्द्रकर्मन् | ७८६ |
| अयोनिज-वाचस्पति | ५७३ | इष्ट | ३०८ |
| अरविन्दाक्ष | ३४७ | ईशान | ६४ |
| अरौद्र | ९०६ | ईश्वर | ३६,७४ |
| अर्क | ७९५ | उग्र | ४२१ |
| अर्चित | ६३४ | उत्तमज्ञान | ४५४ |
| अर्चिष्मत् | ६३३ | उत्तर | ४९४ |
| अर्थ | ४३० | उत्तारण | ९२३ |
| अर्ह | ८७३ | उदारधीवाचस्पति | २१७ |
| अविज्ञातृ | ४८२ | उदीर्ण | ६२४ |
| अविधेयात्मन् | ६२१ | उदुम्बर | ८२३ |
| अविशिष्ट | ३०९ | उद्भव | ३७३,७९० |
| अव्यक्त | ७२२ | उपेन्द्र | १५१ |
| अव्यङ्ग | १२९ | ऊर्जित | १५६ |
| अव्यय | १३ | ऊर्जितशासन | ९१० |
| अव्ययनिधि | ३० | ऊर्ध्वग | ९५४ |
| अव्ययबीज | ४२९ | ऋतु | ४१६ |
| अशोक | ३३६ | ऋद्ध | २७८,३५१ |
| अश्वत्थ | ८२४ | एक | ७२५ |
| असंख्येय | २४७ | एकपाद् | ७७२ |
| असत् | ४७९ | एकात्मन् | ९६५ |
| असंमित | १०८ | ओजस्तेजोद्युतिधर | २७५ |
| अहन् | ९० | औषध | २८७ |
| अहस्संवर्तक | २३२ | क | ७२८ |
| आत्मयोनि | ९८५ | कथित | ८४८ |
| आत्मवत् | ८४ | | |
| आदित्य | ३९,५६३ | | |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| कनकाङ्गदिन् | ५४१ |
| कपि | ८९९ |
| कपिल | ८९८ |
| कपीन्द्र | ५०१ |
| करण | ३७८ |
| कर्तृ | ३८० |
| कवि | १३२ |
| कान्त | २९६,६५४ |
| काम | २९७ |
| कामकृत् | २९५ |
| कामदेव | ६५१ |
| कामपाल | ६५२ |
| कामप्रद | २९८ |
| कामहन् | २९४ |
| कामिन् | ६५३ |
| कारण | ३७९ |
| काल | ४१८ |
| कालनेमिनिहन् | ६४२ |
| किम् | ७२९ |
| कुण्डलिन् | ९०७ |
| कुन्द | ८०९ |
| कुन्दर | ८०८ |
| कुमुद | ५८९,८०७ |
| कुम्भ | ६३५ |
| कुवलेशय | ५९० |
| कृतकर्मन् | ७८८ |
| कृतज्ञ | ८२,५३२ |
| कृतलक्षण | ४८५ |
| कृताकृत | १३६ |
| कृतागम | ६५५,७८९ |
| कृतान्तकृत् | ५३७ |
| कृति | ८३ |
| कृश | ८३७ |
| कृष्ण | ५७,५५० |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| केशव | २३,६४८ |
| केशिहन् | ६४९ |
| क्रतु | ४४८ |
| क्रम | ७९ |
| क्रोधकृत्कर्तृ | ३१५ |
| क्रोधहन् | ३१४ |
| क्षम | ४४२ |
| क्षमिणां वर | ९१९ |
| क्षर | ४८० |
| क्षाम | ४४३,८५४ |
| क्षितीश | ९९१ |
| क्षेत्रज्ञ | १६ |
| क्षेमकृत् | ५९९ |
| क्षोभण | ३७४ |
| खण्डपरशु | ५६८ |
| गतिसत्तम | ५६६ |
| गदाग्रज | ७६४ |
| गदाधर | ९९७ |
| गभस्तिनेमि | ४८६ |
| गभीर | ५४३ |
| गभीरात्मन् | ९३७ |
| गरुडध्वज | ३५४ |
| गहन | ३८२,५४४ |
| गुणभृत् | ८३९ |
| गुप्त | ५४५ |
| गुरु | २०९ |
| गुरुतम | २१० |
| गुह | ३८३ |
| गुह्य | ५४२ |
| गोपति | ४९५,५९२ |
| गोप्तृ | ४९६,५९३ |
| गोविदां पति | १८८ |
| गोविन्द | १८७,५३९ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| गोहित | ५९१ |
| ग्रामणी | २१९ |
| घृताशिस् | ७४४ |
| चक्रगदाधर | ५४६ |
| चक्रिन् | ९०८,९९५ |
| चतुरस्र | ९३६ |
| चतुरात्मन् | १३७,७६९ |
| चतुर्गति | ७६८ |
| चतुर्दंष्ट्र | १३९ |
| चतुर्बाहु | ७६६ |
| चतुर्भाव | ७७० |
| चतुर्भुज | १४० |
| चतुर्मूर्ति | ७६५ |
| चतुर्वेदविद् | ७७१ |
| चतुर्व्यूह | १३८,७६७ |
| चन्दनाङ्गदिन् | ७४० |
| चन्द्रांशु | २८१ |
| चल | ७४६ |
| चाणूरान्ध्रनिषूदन | ८२५ |
| छिन्नसंशय | ६२३ |
| जगत: सेतु | २८८ |
| जगदादिज | १४५ |
| जनजन्मादि | ९४७ |
| जनन | ९४६ |
| जनार्दन | १२६ |
| जनेश्वर | ३४१ |
| जन्ममृत्युजरातिग | ९६६ |
| जय | ५०९ |
| जयन्त | ७९८ |
| जह्नु | २४४ |
| जितक्रोध | ४६२ |
| जितमन्यु | ९३४ |
| जितामित्र | ५२४ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| जीव | ५१३ |
| जीवन | ९३० |
| जेतृ | १४८ |
| ज्ञान उत्तम | ४५४ |
| ज्ञानगम्य | ४९७ |
| ज्येष्ठ | ६७ |
| ज्योतिरादित्य | ५६४ |
| ज्योतिर्गणेश्वर | ६१९ |
| ज्योतिस् | ८७७ |
| तत्त्व | ९६३ |
| तत्त्वविद् | ९६४ |
| तद् | ७३१ |
| तन्तुवर्धन | ७८५ |
| तार | ३३८,९६८ |
| तारण | ३३७ |
| तीर्थकर | ६९१ |
| तुष्ट | ३९१ |
| तेजोवृष | ७५७ |
| त्रिककुब्धामन् | ६१ |
| त्रिदशाध्यक्ष | ५३५ |
| त्रिपद | ५३४ |
| त्रिलोकधृक् | ७५१ |
| त्रिलोकात्मन् | ६४६ |
| त्रिलोकेश | ६४७ |
| त्रिविक्रम | ५३० |
| त्रिसामन् | ५७४ |
| त्वष्टृ | ५२ |
| दक्ष | ४२३,९१७ |
| दक्षिण | ९१८ |
| दण्ड | ८५९ |
| दम | ८६१ |
| दमन | १९० |
| दमयितृ | ८६० |
| दर्पद | ७१३ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| दर्पहन् | ७१२ |
| दामोदर | ३६७ |
| दारुण | ५६९ |
| दाशार्ह | ५११ |
| दिव:स्पृश् | ५७१ |
| दिश | ९४० |
| दीप्तमूर्ति | ७१९ |
| दु:स्वप्ननाशन | ९२६ |
| दुरतिक्रम | ७७६ |
| दुराधर्ष | ८१ |
| दुरारिहन् | ७८१ |
| दुरावास | ७८० |
| दुर्ग | ७७९ |
| दुर्गम | ७७८ |
| दुर्जय | ७७५ |
| दुर्धर | २६६,७१५ |
| दुर्मर्षण | २०५ |
| दुर्लभ | ७७७ |
| दुष्कृतिहन् | ९२४ |
| दृढ | ५५१ |
| दृप्त | ७१४ |
| देव | ३७५ |
| देवकीनन्दन | ९८९ |
| देवभृद्गुरु | ४९३ |
| देवेश | ४९२ |
| द्युतिधर | ७५८ |
| द्रविणप्रद | ५७० |
| धनंजय | ६६० |
| धनुर्धर | ८५७ |
| धनुर्वेद | ८५८ |
| धनेश्वर | ४७४ |
| धन्य | ७५४ |
| धन्विन् | ७६ |
| धरणीधर | २३५ |
| धराधर | ७५६ |
| धर्म | ४०३ |
| धर्मकृत् | ४७६ |
| धर्मगुप् | ४७५ |
| धर्मयूप | ४३८ |
| धर्मविदुत्तम | ४०४ |
| धर्माध्यक्ष | १३५ |
| धर्मिन् | ४७७ |
| धातु उत्तम | ४५ |
| धातृ | ४३ |
| धामन् | २११ |
| धुर्य | ३२९ |
| धृतात्मन् | १६० |
| ध्रुव | ३८८ |
| नक्षत्रनेमि | ४४० |
| नक्षत्रिन् | ४४१ |
| नन्द | ५२८ |
| नन्दकिन् | ९९४ |
| नन्दन | ५२७ |
| नन्दि | ६१८ |
| नय | ३९९ |
| नर | २४६ |
| नहुष | ३१२ |
| नारसिंहवपुस् | २१ |
| नारायण | २४५ |
| निग्रह | ७६१ |
| निधि अव्यय | ३० |
| निमिष | २१४ |
| नियन्तृ | ८६४ |
| नियम | १६१,८६५ |
| निर्गुण | ८४० |
| निर्वाण | ५७७ |
| निवृत्तात्मन् | २२९,५९७ |
| निष्ठा | ५८३ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| नेतृ | २२२ |
| नेय | ३९८ |
| नैक | ७२६ |
| नैककर्मकृत् | ४६९ |
| नैकज | ८९० |
| नैकमाय | ३०२ |
| नैकरूप | २७१ |
| नैकशृङ्ग | ७६३ |
| नैकात्मन् | ४६८ |
| न्यग्रोध | ८२२ |
| न्याय | २२१ |
| पण | ९५८ |
| पद अनुत्तम | ७३२ |
| पद्मगर्भ | ३४८ |
| पद्मनाभ | ४८,१९६,३४६ |
| पद्मनिभेक्षण | ३४५ |
| पद्मिन् | ३४४ |
| परमङ्गल | ६३ |
| परमस्पष्ट | ३९० |
| परमात्मन् | ११ |
| परमेश्वर | ३७७ |
| परमेष्ठिन् | ४१९ |
| परर्द्धि | ३८९ |
| परायण | ५८५ |
| परिग्रह | ४२० |
| पर्जन्य | ८१० |
| पर्यवस्थित | ९३१ |
| पवन | २९१ |
| पवित्र | ६२ |
| पापनाशन | ९९२ |
| पावन | २९२,८११ |
| पुण्डरीकाक्ष | १११ |
| पुण्य | ६८७,९२५ |
| पुण्यकीर्ति | ६८८ |
| पुण्यश्रवणकीर्तन | ९२२ |
| पुनर्वसु | १५० |
| पुरंदर | ३३५ |
| पुरातन | ४९८ |
| पुरुजित् | ५०६ |
| पुरुष | १४,४०६ |
| पुरुषोत्तम | २४ |
| पुरुसत्तम | ५०७ |
| पुष्कराक्ष | ४०,५५६ |
| पुष्ट | ३९२ |
| पुष्पहास | ९५२ |
| पूतात्मन् | १० |
| पूरयितृ | ६८६ |
| पूर्ण | ६८५ |
| पृथु | ४१० |
| पेशल | ९१६ |
| प्रकाशन | २७४ |
| प्रकाशात्मन् | २७६ |
| प्रग्रह | ७६० |
| प्रजागर | ९५३ |
| प्रजापति | ६९,१९७ |
| प्रजाभव | ८९ |
| प्रणव | ४०९,९५७ |
| प्रतर्दन | ५९ |
| प्रतापन | २७७ |
| प्रतिष्ठित | ३२६ |
| प्रत्यय | ९३ |
| प्रथित | ३१९ |
| प्रद्युम्न | ६४० |
| प्रधानपुरुषेश्वर | २० |
| प्रपितामह | ९७० |
| प्रभव | ३४ |
| प्रभु | ३५,२९९ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| प्रभूत | ६० |
| प्रमाण | ४२८,९५९ |
| प्रमोदन | ५२५ |
| प्रसन्नात्मन् | २३७ |
| प्रांशु | १५३ |
| प्राग्वंश | ८४५ |
| प्राण | ६६,३२०,४०७ |
| प्राणजीवन | ९६२ |
| प्राणद | ६५,३२१,४०८,९५६ |
| प्राणनिलय | ९६० |
| प्राणभृत् | ९६१ |
| प्रियकृत् | ८७४ |
| प्रियार्ह | ८७२ |
| प्रीतिवर्धन | ८७५ |
| बभ्रु | ११६ |
| बहुशिरस् | ११५ |
| बीज अव्यय | ४२९ |
| बृहत् | ८३६ |
| बृहद्भानु | ३३३ |
| बृहद्रूप | २७२ |
| ब्रह्मकृत् | ६६२ |
| ब्रह्मज्ञ | ६६९ |
| ब्रह्मण्य | ६६१ |
| ब्रह्मन् | ६६४ |
| ब्रह्मविद् | ६६६ |
| ब्रह्मविवर्धन | ६६५ |
| ब्रह्मा | ६६३ |
| ब्रह्मिन् | ६६८ |
| ब्राह्मण | ६६७ |
| ब्राह्मणप्रिय | ६७० |
| भक्तवत्सल | ७३६ |
| भगवत् | ५५८ |
| भगहन् | ५५९ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| भयकृत् | ८३३ |
| भयनाशन | ८३४ |
| भयापह | ९३५ |
| भर्तृ | ३३ |
| भानु | २८४ |
| भारभृत् | ८४७ |
| भाव | ७ |
| भावन | ३२ |
| भास्करद्युति | २८२ |
| भिषज् | ५७९ |
| भीम | ३५७,९४८ |
| भीमपराक्रम | ९४९ |
| भुजगोत्तम | १९३ |
| भूगर्भ | ७१ |
| भूतकृत् | ५ |
| भूतभव्यभवत्प्रभु | ४ |
| भूतभव्यभवन्नाथ | २९० |
| भूतभावन | ९ |
| भूतभृत् | ६ |
| भूतमहेश्वर | ४८९ |
| भूतात्मन् | ८ |
| भूतादि | २९ |
| भूतावास | ७०८ |
| भूति | ६३० |
| भूरिदक्षिण | ५०२ |
| भूर्भुव | ९४२ |
| भूर्भुवःस्वस्तरु | ९६७ |
| भूशय | ६२८ |
| भूषण | ६२९ |
| भेषज | ५७८ |
| भोक्तृ | १४३,५००,८८८ |
| भोजन | १४२ |
| भ्राजिष्णु | १४१ |
| मङ्गल पर | ६३ |

| नाम | क्रमांक | नाम | क्रमांक |
|---|---|---|---|
| मधु | १६८ | महार्ह | ५२२ |
| मधुसूदन | ७३ | महावराह | ५३८ |
| मनु | ५१ | महावीर्य | १७४ |
| मनोजव | ६९० | महाशक्ति | १७५ |
| मनोहर | ४६१ | महाशन | ३०३ |
| मन्त्र | २८० | महाशृङ्ग | ५३६ |
| मरीचि | १८९ | महास्वन | ४१ |
| महत् | ८४१ | महाहविस् | ६७८ |
| महर्द्धि | ३५० | महाह्रद | ८०३ |
| महर्षिकपिलाचार्य | ५३१ | महीधर | ३१७,३६९ |
| महाकर्मन् | ६७२,७८७ | महीभर्तृ | १८२ |
| महाकोश | ४३२ | महेज्य | ४४७ |
| महाक्रतु | ६७५ | महेन्द्र | २६८ |
| महाक्रम | ६७१ | महेष्वास | १८१ |
| महाक्ष | ३५३ | महोत्साह | १७१ |
| महागर्त | ८०४ | महोदधिशय | ५१९ |
| महातपस् | १२२ | महोरग | ६७४ |
| महातेजस् | ६७३ | माधव | ७२,१६७,७३५ |
| महादेव | ४९१ | मानद | ७४८ |
| महाद्युति | १७६ | मान्य | ७४९ |
| महाद्रिधृक् | १८० | मार्ग | ३६५,३९७ |
| महाधन | ४३४ | मुकुन्द | ५१५ |
| महानिधि | ८०६ | मुक्तानां परमा गति | १२ |
| महाबल | १७२ | मेदिनीपति | ५३३ |
| महाबुद्धि | १७३ | मेधज | ७५३ |
| महाभाग | ३७० | मेधाविन् | ७७ |
| महाभूत | ८०५ | यज्ञ | ४४५,९७१ |
| महाभोग | ४३३ | यज्ञकृत् | ९७७ |
| महामख | ४३९ | यज्ञगुह्य | ९८२ |
| महामनस् | ५५७ | यज्ञपति | ९७२ |
| महामाय | १७० | यज्ञभुज् | ९७९ |
| महामूर्ति | ७१८ | यज्ञभृत् | ९७६ |
| महायज्वन् | ६७६ | यज्ञवाहन | ९७५ |
| महायज्ञ | ६७७ | यज्ञसाधन | ९८० |

| नाम | क्रमांक | नाम | क्रमांक |
|---|---|---|---|
| यज्ञाङ्ग | ९७४ | वंशवर्धन | ८४६ |
| यज्ञान्तकृत् | ९८१ | वत्सर | ४७० |
| यज्ञिन् | ९७८ | वत्सल | ४७१ |
| यज्वन् | ९७३ | वत्सिन् | ४७२ |
| यद् | ७३० | वनमालिन् | ५६१ |
| यदुश्रेष्ठ | ७०५ | वरद | ३३० |
| यम | १६२,८६६ | वराङ्ग | ७३९ |
| युगादिकृत् | ३०० | वरारोह | १२१ |
| युगावर्त | ३०१ | वरुण | ५५३ |
| योग | १८ | वर्धन | २६१ |
| योगविदां नेतृ | १९ | वर्धमान | २६२ |
| योगिन् | ८४९ | वषट्कार | ३ |
| योगीश | ८५० | वसु | १०४,२७०,६९६ |
| रक्षण | ९२८ | वसुद | २६९ |
| रणप्रिय | ६८४ | वसुप्रद | ६९३ |
| रत्नगर्भ | ४७३ | वसुप्रद | ६९४ |
| रत्ननाभ | ७९३ | वसुमनस् | १०५,६९७ |
| रथाङ्गपाणि | ९९८ | वसुरेतस् | ६९२ |
| रवि | ८८१ | वह्नि | २३३ |
| रविलोचन | ८८५ | वाग्मिन् | २६७ |
| राम | ३९४ | वाचस्पति अयोनिज | ५७३ |
| रुचिराङ्गद | ९४५ | वाचस्पति उदारधी | २१७ |
| रुद्र | ११४ | वाजसन | ७९६ |
| रोहित | ३६४ | वामन | १५२ |
| लक्ष्मी | ९४३ | वायु | ४१४ |
| लक्ष्मीवत् | ३६१ | वायुवाहन | ३३१,८५६ |
| लोकत्रयाश्रय | ६१४ | वारुण | ५५४ |
| लोकनाथ | ७३४ | वासवानुज | ३२२ |
| लोकबन्धु | ७३३ | वासुदेव | ३३२,६९५,७०९ |
| लोकसारङ्ग | ७८३ | विकर्तृ | ३८१ |
| लोकस्वामिन् | ७५० | विक्रम | ७८ |
| लोकाधिष्ठान | ८९४ | विक्रमिन् | ७५,९०९ |
| लोकाध्यक्ष | १३३ | विक्षर | ३६३ |
| लोहिताक्ष | ५८ | विजय | १४७ |

| नाम | क्रमांक | नाम | क्रमांक |
|---|---|---|---|
| विजितात्मन् | ६२० | वीतभय | ९२१ |
| विदारण | ४६४ | वीर | ४०१,६४३,६५८ |
| विदिश | ९३८ | वीरबाहु | ४६३ |
| विद्वत्तम | ९२० | वीरहन् | १६६,७४१,९२७ |
| विधातृ | ४४,४८४ | वृक्ष | ५५५ |
| विनय | ५०८ | वृद्धात्मन् | ३५२ |
| विनयितासाक्षिन् | ५१४ | वृष | ३१३ |
| विभु | २४०,८८० | वृषकर्मन् | ११२ |
| विमुक्तात्मन् | ४५२ | वृषपर्वन् | २५९ |
| विरज | ३९६ | वृषप्रिय | ५९५ |
| विराम | ३९५ | वृषभ | २५७ |
| विरोचन | ८८२ | वृषभाक्ष | ५९४ |
| विविक्त | २६३ | वृषाकपि | १०१ |
| विशिष्ट | २४९ | वृषाकृति | ११३ |
| विशुद्धात्मन् | ६३६ | वृषाहिन् | २५६ |
| विशोक | ६३१ | वृषोदर | २६० |
| विशोधन | ६३७ | वेगवत् | ३७१ |
| विश्राम | ४२४ | वेद | १२७ |
| विश्रुतात्मन् | २०७ | वेदविद् | १२८,१३१ |
| विश्व | १ | वेदाङ्ग | १३० |
| विश्वकर्मन् | ५० | वेद्य | १६३ |
| विश्वदक्षिण | ४२५ | वेधस् | ५४७ |
| विश्वधृक् | २३८ | वैकुण्ठ | ४०५ |
| विश्वबाहु | ३१६ | वैखान | ९८७ |
| विश्वभुज् | २३९ | वैद्य | १६४ |
| विश्वमूर्ति | ७१७ | व्यक्तरूप | ३०५ |
| विश्वयोनि | ११७,१४९ | व्यग्र | ७६२ |
| विश्वरेतस् | ८८ | व्यवसाय | ३८४ |
| विश्वात्मन् | २२५ | व्यवस्थान | ३८५ |
| विषम | ७४२ | व्यादिश | ९३९ |
| विष्णु | २,२५८,६५७ | व्यापिन् | ४६७ |
| विष्वक्सेन | १२५ | व्याप्त | ४१३ |
| विस्तार | ४२६ | व्याल | ९२ |
| विहायसगति | ८७६ | शक्तिमतां श्रेष्ठ | ४०२ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| शंखभृत् | ९९३ |
| शतमूर्ति | ७२३ |
| शतानन | ७२४ |
| शतानन्द | ६१७ |
| शतावर्त | ३४३ |
| शत्रुघ्न | ४१२ |
| शत्रुजित् | ८२० |
| शत्रुतापन | ८२१ |
| शब्दसह | ९१२ |
| शब्दातिग | ९११ |
| शम | ५८१ |
| शंभु | ३८ |
| शरण | ८६ |
| शरभ | ३५६ |
| शरीरभूतभृत् | ४९९ |
| शरीरभृत् | ३४९ |
| शर्मन् | ८७ |
| शर्व | २६ |
| शर्वरीकर | ९१४ |
| शशबिन्दु | २८५ |
| शान्त | ५८२ |
| शान्ति | ५८४ |
| शान्तिद | ५८७ |
| शार्ङ्गधन्वन् | ९९६ |
| शाश्वत | ५६ |
| शाश्वतस्थाणु | १२० |
| शाश्वतस्थिर | ६२७ |
| शास्तृ | २०६ |
| शिखण्डिन् | ३११ |
| शिपिविष्ट | २७३ |
| शिव | २७,६०० |
| शिशिर | ९१३ |
| शिष्टकृत् | २५० |
| शिष्टेष्ट | ३१० |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| शुचि | १५५,२५१ |
| शुचिश्रवस् | ११८ |
| शुभाङ्ग | ५८६,७८२ |
| शुभेक्षण | ३९३ |
| शून्य | ७४३ |
| शूर | ३३९ |
| शूरजनेश्वर | ६४५ |
| शूरसेन | ७०४ |
| शृङ्गिन् | ७९७ |
| शोकनाशन | ६३२ |
| शौरि | ३४०,६४४ |
| श्रमण | ८५३ |
| श्रीकर | ६११ |
| श्रीगर्भ | ३७६ |
| श्रीद | ६०५ |
| श्रीधर | ६१० |
| श्रीनिधि | ६०८ |
| श्रीनिवास | १८३,६०७ |
| श्रीपति | ६०३ |
| श्रीमत् | २२,१७८,२२०,६१३ |
| श्रीमतां वर | ६०४ |
| श्रीवत्सवक्षस् | ६०१ |
| श्रीवास | ६०२ |
| श्रीविभावन | ६०९ |
| श्रीश | ६०६ |
| श्रुतिसागर | २६४ |
| श्रेयस् | ६१२ |
| श्रेष्ठ | ६८ |
| संवत्सर | १९१,४२२ |
| संवृत | २३० |
| संस्थान | ३८६ |
| संकर्षण अच्युत | ५५२ |
| संक्षेप्तृ | ५९८ |
| संग्रह | १५८ |

| नाम | क्रमांक |
| --- | --- |
| सत् | ४७८ |
| सतां गति | १८४,४५० |
| सत्कर्तृ | २४१ |
| सत्कीर्ति | ६२२ |
| सत्कृत | २४२ |
| सत्कृति | ७०० |
| सत्ता | ७०१ |
| सत्पथाचार | ९५५ |
| सत्परायण | ७०३ |
| सत्य | १०६,२१२,८६९ |
| सत्यधर्मन् | ५२९ |
| सत्यधर्मपराक्रम | २८९ |
| सत्यधर्मपरायण | ८७० |
| सत्यपराक्रम | २१३ |
| सत्यमेधस् | ७५५ |
| सत्यसंध | ५१० |
| सत्र | ४४९ |
| सत्त्ववत् | ८६७ |
| सत्त्वस्थ | ४८७ |
| सदामर्षिन् | ८९३ |
| सदायोगिन् | १६५ |
| सद्गति | ६९९ |
| सद्भूति | ७०२ |
| सनात् | ८९६ |
| सनातनतम | ८९७ |
| संधातृ | २०१ |
| संधिमत् | २०२ |
| सन्त | ९२९ |
| सन्निवास | ७०६ |
| संन्यासकृत् | ५८० |
| सपितृ | ९६९ |
| सप्तजिह्व | ८२७ |
| सप्तवाहन | ८२९ |
| सप्तैधस् | ८२८ |
| सम | १०९ |
| समयज्ञ | ३५८ |
| समात्मन् | १०७ |
| समावर्त | ७७३ |
| समितिंजय | ३६२ |
| समीरण | २२३ |
| समीहन | ४४४ |
| संप्रमर्दन | २३१ |
| संभव | ३१ |
| संमित | १०८ |
| सर्ग | १५९ |
| सर्व | २५ |
| सर्वकामद | ८५१ |
| सर्वग | १२३ |
| सर्वज्ञ | ४५३,८१५ |
| सर्वतश्चक्षुस् | ६२५ |
| सर्वतोमुख | ८१६ |
| सर्वदर्शन | ९४ |
| सर्वदर्शिन् | ४५१ |
| सर्वदृग्व्यास | ५७२ |
| सर्वदृश् | १९९ |
| सर्वप्रहरणायुध | १००० |
| सर्वयोगविनिःसृत | १०३ |
| सर्वलक्षणलक्षण्य | ३६० |
| सर्ववागीश्वरेश्वर | ८०२ |
| सर्वविज्जयिन् | ७९९ |
| सर्वविद्भानु | १२४ |
| सर्वशस्त्रभृतां वर | ७५९ |
| सर्वसह | ८६३ |
| सर्वादि | ९९ |
| सर्वासुनिलय | ७१० |
| सर्वेश्वर | ९६ |
| सव | ७२७ |
| सवितृ | ८८४ |

| नाम | क्रमांक | नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| सह | ३६८ | सुमेधस् | ७५२ |
| सहस्रजित् | ३०६ | सुयामुन | ७०७ |
| सहस्रपाद् | २२७ | सुराध्यक्ष | १३४ |
| सहस्रमूर्धन् | २२४ | सुरानन्द | १८६ |
| सहस्रांशु | ४८३ | सुरारिहन् | २०८ |
| सहस्राक्ष | २२६ | सुरुचि | ८७८ |
| सहस्रार्चिस् | ८२६ | सुरेश | ८५ |
| सहिष्णु | १४४,५६५ | सुरेश्वर | २८६ |
| साक्षिन् | १५ | सुलभ | ८१७ |
| सात्त्विक | ८६८ | सुलोचन | ७९४ |
| सात्वतां पति | ५१२ | सुवर्णबिन्दु | ८०० |
| साधु | २४३ | सुवर्णवर्ण | ७३७ |
| सामग | ५७५ | सुवीर | ९४४ |
| सामगायन | ९८८ | सुव्रत | ४५५,८१८ |
| सामन् | ५७६ | सुषेण | ५४० |
| सिंह | २००,४८८ | सुहृद् | ४६० |
| सिद्ध | ९७,८१९ | सूक्ष्म | ४५७ |
| सिद्धसंकल्प | २५३ | सूर्य | ८८३ |
| सिद्धार्थ | २५२ | सोम | ५०५ |
| सिद्धि | ९८ | सोमप | ५०३ |
| सिद्धिद | २५४ | स्कन्द | ३२७ |
| सिद्धिसाधन | २५५ | स्कन्दधर | ३२८ |
| सुखद | ४५९,८८९ | स्तवप्रिय | ६८० |
| सुघोष | ४५८ | स्तव्य | ६७९ |
| सुतन्तु | ७८४ | स्तुति | ६८२ |
| सुतपस् | १९५ | स्तोतृ | ६८३ |
| सुदर्शन | ४१७ | स्तोत्र | ६८१ |
| सुधन्वन् | ५६७ | स्थविरध्रुव | ५४ |
| सुन्द | ७९२ | स्थविष्ठ | ५३,४३६ |
| सुन्दर | ७९१ | स्थाणु | २८ |
| सुपर्ण | १९२,८५५ | स्थानद | ३८७ |
| सुप्रसाद | २३६ | स्थावरस्थाणु | ४२७ |
| सुभुज | २६५ | स्थिर | २०३ |
| सुमुख | ४५६ | स्थूल | ८३८ |

| नाम | क्रमांक |
|---|---|
| स्पष्टाक्षर | २७९ |
| स्रग्विन् | २१६ |
| स्रष्टृ | ५८८,९९० |
| स्वक्ष | ६१५ |
| स्वङ्ग | ६१६ |
| स्वधृत | ८४३ |
| स्वयंजात | ९८६ |
| स्वयंभू | ३७ |
| स्ववश | ४६६ |
| स्वस्ति | ९०३ |
| स्वस्तिकृत् | ९०२ |
| स्वस्तिद | ९०१ |
| स्वस्तिदक्षिण | ९०५ |
| स्वस्तिभुज् | ९०४ |
| स्वाङ्ग | ५४८ |
| स्वापन | ४६५ |
| स्वाभाव्य | ५२३ |
| स्वास्य | ८४४ |
| हंस | १९१ |
| हरि | ६५० |
| हलायुध | ५६२ |
| हविर्हरि | ३५९ |
| हविस् | ६९८ |
| हिरण्यगर्भ | ७०,४११ |
| हिरण्यनाभ | १९४ |
| हुतभुज् | ८७९,८८७ |
| हृषीकेश | ४७ |
| हेतु | ३६६ |
| हेमाङ्ग | ७३८ |


ॐ श्रीः 卐

✡ ✡ ✡

प.पू. स्वामी वरदानंद भारती (पूर्वाश्रमीचे प्राचार्य श्री. अनंतराव आठवले) यांची ग्रंथसंपदा

| | श्रीराधादामोदर प्रतिष्ठानची प्रकाशने | आवृत्ती | मूल्य रु. |
|---|---|---|---|
| १) | अनुवाद ज्ञानेश्वरी | सहावी | ३००/– |
| २) | अप्रकाशित वाङ्मय (गद्यखंड) | पहिली | १५०/– |
| ३) | अप्रकाशित वाङ्मय (पद्यखंड) | पहिली | १२०/– |
| ४) | आत्मसंयमयोग (भ.गीता अ. ६ वा) | तिसरी | १४०/– |
| ५) | आत्मानुसंधान | चौथी | १५/– |
| ६) | आयुर्वेदीय व्याधिविनिश्चय | दुसरी | ६५०/– |
| ७) | उपनिषदर्थ कौमुदी – खंड १ ला | दुसरी | १५०/– |
| ८) | उपनिषदर्थ कौमुदी – खंड २ रा | दुसरी | २२०/– |
| ९) | उपनिषदर्थ कौमुदी – खंड ३ रा | दुसरी | ३००/– |
| १०) | उपनिषदर्थ कौमुदी – खंड ४ था | दुसरी | २४०/– |
| ११) | उपनिषदर्थ कौमुदी – खंड ५ वा | दुसरी | २६०/– |
| १२) | कर्मयोग (भ.गीता अ. ३ रा) | पाचवी | १६०/– |
| १३) | कुटुंब–व्यवस्था | पहिली | १५/– |
| १४) | खरा ब्राह्मण | दुसरी | १०/– |
| १५) | जीवनसाधना (भ.गीता अ. १८ वा) | पाचवी | १७५/– |
| १६) | जीवनसाधना (हिंदी अनुवाद) | पहिली | १२५/– |
| १७) | तत्त्वविज्ञान (भ.गीता अ. १३ वा) | दुसरी | ५०/– |
| १८) | तेजाचं चांदणं (प.पू. स्वामी वरदानंद भारतींचे जीवनचरित्र) | दुसरी | ४००/– |
| १९) | तैत्तिरीयोपनिषद् | पहिली | ५०/– |
| २०) | ब्रह्मसूत्रार्थ दर्शिनी | दुसरी | २५०/– |
| २१) | भगवान् श्रीकृष्ण – एक दर्शन | पाचवी | १६०/– |
| २२) | भावार्चना | तिसरी | ११०/– |
| २३) | मनुस्मृति–भूमिका | दुसरी | ५०/– |
| २४) | मनोबोध | अकरावी | २५०/– |
| २५) | मनोबोध (हिंदी अनुवाद) | दुसरी | १५०/– |
| २६) | **Manobodh** (इंग्रजी अनुवाद) | पहिली | ६५०/– |
| २७) | महाभारताचे वास्तव दर्शन | चौथी | १५०/– |
| २८) | रुक्मिणी स्वयंवर (कीर्तनोपयोगी) | दुसरी | २५/– |
| २९) | वाटा आपल्या हिताच्या | पाचवी | ८०/– |
| ३०) | विराण्या | तिसरी | १०/– |
| ३१) | साधकाची चिंतनिका | चौथी | १५/– |
| ३२) | श्रीकृष्णकथामृत | सहावी | २५०/– |
| ३३) | श्रीमनुस्मृति–सार्थ–सभाष्य | तिसरी | ६००/– |
| ३४) | श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्र (पाठसंहिता) | दहावी | ५/– |
| ३५) | श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्र (सार्थ) | अकरावी | ५०/– |
| ३६) | श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्र (सार्थ–हिंदी) | पहिली | २५/– |
| ३७) | श्रीसद्गुरु षोडशोपचार पूजा | पाचवी | ५/– |

## समग्र ग्रंथ मिळण्याची ठिकाणे

(१) श्रीराधादामोदर प्रतिष्ठान :
श्री. वामन वि. मेहेंदळे (मोबा. : ०९४२०४ ९५३०८)
श्री. प्र. वि. मेहेंदळे (मोबा. : ०९९७५९ ६६१८१)
'प्रतीक' ४०३/१ शनिवार पेठ, मेहुणपुरा, पुणे ४११०३०.

(२) श्री दासगणू महाराज प्रतिष्ठान :
कु. गार्गी देशपांडे (मोबा. : ०९४२१९ ०१०९८)
मु. पो. गोरटे– ४३१८०७, व्हाया उमरी, जिल्हा नांदेड.

(३) वि.वा. कल्याणी माधव नामजोशी (दूरध्वनी : ०२०–२५६५४८६६)
'पुष्कराज', मित्रनगर, १०१२/४ शिवाजीनगर,
पुणे – ४११०१६.

(४) यशवंत प्रकाशन, (दूरध्वनी : ०२०–२४४७ ०५३३)
७५३ सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणे ४११०३०.

(५) न्यू नेर्लेकर बुक सेलर्स (मोबा : ०९४२३५ ८०८३७)
२६१/१अ/१, बुधवार चौक, पुणे ४११००२.

(६) सौ. मीना रमेश वाटवे, (दूरध्वनी : ०२५३–२३१३२६२)
जयप्रसाद रेसिडेन्सी, ब्लॉक क्र. १७,
जुनी पंडित कॉलनी, नाशिक ४२२००२.

(७) डॉ. स्वाती शिरडकर, (मोबा. : ०९८९०८ ९८०७८)
'मानस', १३/१ विनायक नगर,
हेडगेवार हॉस्पिटल जवळ, त्रिमूर्ती चौक,
औरंगाबाद ४३१००३.

(८) श्री. दिगंबर सेंदूरवाडकर, (दूरध्वनी : ०२४५२–२३२०५९)
'श्रीसाई गजानन', त्रिमूर्ती नगर, परभणी ४३१४०१.

(९) देबडवार पुस्तक भांडार (मोबा. : ०९४२३६ १५१२७)
महावीर चौक, नांदेड ४३१६०१.

(१०) श्री. प्रशांत रघुनाथ सबनीस (मोबा. : ९४२०२ ६०५१४)
मु.पो. सज्जनगड – ४१५०१३, जि. सातारा.